|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : २८/२९ सोमवार दि. ०६ जुलै २०२० ते रविवार दि. १२ जुलै २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## दुकानदाराच्या क्रूर विकृतीचा कळस झाला ग्राहक महिलेला ठार मारून बलात्कार केला

नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

सध्याच्या कोरोनाच्या प्रकोपात सलग तीन महिने सुरु असलेल्या लॉकडाऊनमुळे माणसाच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झालाय. त्यामुळे माणूस एकदम चिडचिडा झालाय. त्याला छोट्या छोट्या गोष्टीत संताप येतोय, अशावेळी त्याला कोणी डिवचले तर तो प्रशुब्ध होतोय आणि मग याच मनस्थीतीमधून त्याच्यातला सैतान जागा होऊन माणसातला हा सैतानाच त्याला कोणतेही अमानवी कृत्य करायला लावतोय. तसे पाहता दुकानदार आणि ग्राहक यांच्यात मालाच्या किमतीवरून वाद होण्याच्या घटना काही नवीन नाहीत. पण नालासोपारा पुर्वे येथील झालावाड पार्क येथे घडलेल्या घटनेने संपूर्ण वसई, विरार, नालासोपाऱ्याला हादरवून टाकलेय. या ठिकाणी एका कॉस्मेटिक दुकानात समान खरेदी करायला गेलेल्या महिलेचे दुकानदाराशी शुल्लक कारणावरून भांडण झाले. मात्र तो दुकानदार त्या ग्राहक महिलेवर इतका चिडला कि त्याने तिचे केस धरून तिला आत फरफटत नेले आणि तिची गळा दाबून तसेच चाकूचे वार करून हत्या केली. पण त्याच्या अंगात शिरलेला सैतान एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने मृत महिलेच्या मृतदेहावर लैंगिक अत्याचार केले. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेने पोलीसही हादरून गेले असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





नालासोपारा येथील संयुक्त नगर परिसरात राहणारी नगीना आशिष यादव हि महिला २७ जून रोजी दुकानावर जाते असे सांगून जी घरातून बाहेर पडली ती परतलीच नाही. त्यामुळे तिच्या पतीने तिची मिसिंगची तक्रार तुळींज पोलीस ठाण्यात नोंदवली होती. त्यानंतर तपास सुरु झाला, पण तिचा काही शोध लागत नव्हता. अखेर चंदनसार नाका येथे एका बंद असलेल्या एमएच ०४ डीएस ००९० क्रमांकाच्या पिकअप टेम्पोमध्ये प्लास्टिकच्या गोणीत तिचा मृतदेह सापडला. त्यामुळे मोठी खळबळ माजली. ...पान ६ वर

## कोरोनाच्या मागे पोलीस धावले नालासोपाऱ्यात गुन्हेगारांचे फावले





नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गेल्या तीन महिन्यांपासून राज्यात जे लॉकडाऊन सुरु आहे त्या लॉकडाऊनमुळे अनेक उद्योग धंदे बंद पडलेत. परिणामी लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्यात. त्यामुळे लोकांच्या हातात पैसा राहिलेला नाही. त्यांच्या मुला बाळांवर उपासमारीची पाळी आली आहे आणि या सगळ्यांमुळे लोकांचे मानसिक स्वस्थ बिघडले असून चिडलेले लोकं आता रस्त्यावर उतरून गुन्हेगारीचा मार्ग अवलंबत आहेत. तर काही लोकं निराशेत आपल्या मुला बाळांना ठार मारून आत्महत्या करीत आहेत. लॉकडाऊनमुळे लोकं घरात कोंडून अक्षरशः गुन्हेगार बनत चालले आहेत.

नालासोपारा येथे लॉकडाऊनच्या काळात अशाच गुन्हेगारीच्या दोन भयंकर घटना घडल्या आहेत. नालासोपारा पुर्वेच्या बाबुलपाडा येथे पत्नी भांडण करून माहेरी गेल्याने एका इसमाने आपल्या तीन मुलांना ठार मारून आत्महत्या केली, तर नालासोपारा प्रगतीनगर येथे दिवसा धावळ्या तलवारी घेवून रस्त्यावर उतरलेल्या गुंडांनी भांडण सोडवायला गेलेल्या एका तरुणावर प्राणघातक हल्ला केला त्यात तो गंभीर जखमी झालाय. लॉकडाऊनच्या काळात घडलेल्या या घटनांमुळे नालासोपारा परिसरात भीतीचे वातावरण असून लॉकडाऊनच्या काळात नोकरीधंदा गेल्यामुळेच लोकांची मानसिक स्थिती बिघडली आहे आणि त्यातूनच अशा भयंकर घटना घडत आहेत आणि यापुढे तर यापेक्षाही भयंकर घटना घडू शकतात. कारण लोकांच्या हाताला काम नाही. खिशात पैसा नाही, खायला अन्न ...पान ६ वर

## मुलीची बाजू घेणे आईला भारी पडले जावयाने सासूला मातीतच गाडले

बीड/क्राईम रिपोर्टर

मुलीच्या लग्न नंतर ती एकदा का सासरी नांदायला गेली कि माहेरच्या माणसांनी तिच्या संसारात ढवळा ढवळ करायची नसते. पण काही मुलींच्या माहेरची माणसे सतत सासरच्या मंडळी विरुद्ध मुलीचे कान फुंकत असतात. खास करून मुलीची आई सासरी नांदायला गेलेल्या मुलीला नवऱ्याला कसे मुठीत ठेवायचे सासू-सासऱ्यांवर कसा धाक जमवायचा याचे सतत धडे देत असते आणि मुलगीही मग आईच्या शिकवणीनुसार सासरच्या मंडळींशी फटकून वागते. त्यातून भांडणे होतात आणि सुखी संसारात वादळ निर्माण होते आणि या वादळातून निर्माण झालेल्या वादात एखाद्याचा जीवही जावू शकतो. बीड जिल्ह्यातील मांडवखेल येथेही अशीच घटना घडली. पती पत्नीच्या वादात सतत पत्नीची आई नाक खुपसून जावयाला शिवीगाळ करीत असे. त्यामुळे चिडलेल्या जावयाने सासूचा काटा काढण्याचा निर्णय घेतला आणि तिला ट्रॅक्टरच्या धडकेत ठार मारून वडिलांच्या मदतीने जमिनीत गाडून टाकले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पिता पुत्रांना अटक केली आहे.







पती पत्नीच्या वादात सासूची नेहमीच त्रासदायक मध्यस्ती जावयाला वेदनादायी ठरत होती. पती पत्नीच्या वादात आगीत तेल टाकून वाद कसा वाढेल? यावर टपून बसणाऱ्या सासूचा जावयाने कायमचा अंत केल्याची घटना मे महिन्यात बिड जिल्हयात घडली होती. संतप्त जावयाने सासूला ट्रॅक्टरखाली चिरडून तिचे शव जमीनीत पुरुन पुरावा नष्ट करण्याचा प्रकार घडला होता. घटनेनंतर तब्बल तेरा दिवसांनी हे प्रकरण उघडकीस आले. ...पान २ वर

## शय्या सोबतीसाठी प्रियकराला पटवले कमजोर पतीला तिने मार्गातून हटवले

बसवन बागेवाडी/क्राईम रिपोर्टर

वासनेच्या मोहात फक्त पुरुषच पागल होतो असे नाही, तर काही चंचल बायकांनाही वासनेने बेभान होवून शिकार शोधत असतात. अशावेळी त्यांना कुणाचीही भीती वाटत नाही. त्यामुळे त्या कुणाचीही परवा करीत नाहीत. आपली तहान भागवण्यासाठी कोणालाही जवळ करण्याची त्यांची तयारी असते आणि एकदा का त्यांना मनाजोगता सशक्त इसम मिळाला कि मग पतीलाही सोडायची किंवा त्याचा जीव घेण्याची त्यांची तयारी असते. अशा व्यभिचारी महिलांनी प्रियकराच्या मदतीने पतीचा जीव घेतल्याच्या अनेक घटना यापूर्वी सुद्धा घडल्या आहेत. बसवन बंगेवादीच्या मुतंगी येथेही एका व्यभिचारी पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी तिला तिचा प्रियकर आणि त्याच्या मित्राला अटक केली आहे.



मयत शशीकिरण



बसवन बागेवाडी जवळील मुतगी येथील शशीकिरण रायगोंडा याचा विवाह गेल्या काही वर्षापुर्वी चंद्रलेखा बरोबर झाला होता. ती ही नावाप्रमाणे दिसायला देखणी आणि सेक्सी होती. अलिकडच्या काही वर्षात अल्लमअट्टी धरणामुळे हा भाग सुपीक बनला आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्याच्या हातात आपल्या शेतीतील उत्पन्नामुळे बऱ्यापैकी पैसा खेळु लागला आहे.शशीकिरण याची देखिल बऱ्यापैकी शेती असल्याने तो आपल्या शेतात काम करून आपल्या कुंटुंबाचा ...पान २ वर

## सूड घेण्यासाठी टपलेल्यांनी साधला नेम जेल मधून सुटलेल्या गुंडाचा केला गेम










इस्लामपूर/क्राईम रिपोर्टर

आजच्या तरुण पिढीला भाईगिरीचे मोठे आकर्षण आहे. कारण सिनेमात भाईगिरी करणाऱ्या हिरो प्रमाणेच आपणही दुसऱ्यावर हुकुमत गाजवून रुबाबात जगायचे याच भावनेतून काही तरुणांची पावले गुन्हेगारीकडे वळत आहेत आणि त्यातून गुन्हेगारी टोळ्यांचा जन्म होत आहे. या गुन्हेगारी टोळ्यांमध्ये वर्चस्वाच्या लढाई मधून गँगवॉर उसळत असतात. त्यात एखाद्याला जीव गमवावा लागला कि मग त्याचा बदला घेण्यासाठी विरोधी टोळीतील लोकंही खून खराब करायला सुरवात करतात. इस्लामपूरमध्ये अशाच दोन टोळ्यांमधील दुश्मनीतून एका नामचीन गुंडाचा गेम करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

इस्लामपुरातील निनाई नगर येथे संतोष कदम हा ...पान २ वर

## रक्ताचे नाते कलंकित झाले मुलानेच बापाला ठार केले

चाकूर/सुरेश फरकांडे

शेतकऱ्यांसाठी जमिनीचे महत्व सोन्या पेक्षाही अधिक असते. त्यामुळे कुठलाही शेतकरी आपली एक इंच जमीनही कुणाला सोडत नाही. जमिनीच्या वादातून रक्ताची नातीही कलंकित झाली आहेत. जमिनीच्या वादातून भावाने भावाचा, बापाने मुलाचा मुलाने बापाचा खून केल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. जमिनीची वाटणी हा ग्रामीण भागातील जनतेसाठी कळीचा विषय असतो. त्यामुळे जमिनीचे वाद न्यायालयापर्यंत जातात. चाकूर तालुक्यातील लातूर रोड येथे एक इसम आपल्या बापाकडे जमिनीची वाटणी करा अशी मागणी करीत होता, पण बाप ऐकायला तयार नव्हता. अखेर त्या नराधम पुत्राने बापाची निर्घुण हत्या केली. या घटनेने संपूर्ण तालुका हादरून गेला. कारण ज्याची हत्या झाली ते चाकूर पंचायत समितीचे माजी सभापती होते. मात्र मुलानेच बापाला ठार मारल्याने तालुका हादरला असून आरोपी मुलाला अटक करण्यात आली आहे.






१९ जून २०२० रोजी लातूर रोड शिवारातील शेतात पंचायत समितीचे माझी सभापती चंद्रकांत मारापल्ले व त्यांचा मुलगा धनंजय मारापल्ले या पिता- पुत्रात जमीन वाटणीवरून जोराचे भांडण झाल्याची वार्ता चाकूर तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली. पान २ वर

## प्रेमातील सुखाच्या बंद करताच वाटा मुलीने काढला आई वडिलांचा काटा

नागपूर/एस.कुमार

मुले मोठी झाली आणि एकदा का त्यांच्या पंखात बळ आले कि मग त्यांना आई-वडिलांची गरज भासत नाही. पालकांच्या उपकारांची जाणीव राहत नाही आणि मग त्यांची मनमानी सुरु होते. प्रेमाच्या नावाखाली वासनेचे खेळ सुरु होतात. अशावेळी तरुण मुले जात पात बघत नाही. तारुण्यात पदार्पण करणारी एखाद्या तरुणाच्या प्रेमात पडताना त्याचा धर्म किंवा जात न बघता त्याचे व्यक्तिमत्व आणि रुबाबावर भाळते. अशावेळी त्यांच्या प्रेमाच्या आड जर कुणी येत असेल तर त्यांचा काटा काढायलाही ते प्रेमी युगल मागे पुढे पहत नाहीत. अशाच एका दत्तक मुलीने आपल्या मुस्लीम प्रियकराच्या मदतीने त्यांच्या प्रेमाला विरोध करणाऱ्या आपल्या आई वडिलांचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रेमी युगुलाला अटक केली आहे.

नागपूर येथे दत्तवाडी परिसरात शंकर अतुलचंद्र चंपाती व सीमा शंकर चंपाती हे वृद्ध दापत्य राहत होते. त्यांना ऐश्वर्या नावाची २३ वर्षाची मुलगी होती. ती आयटी इंजिनिअर करीत होती. आयटी इंजिनिअर असलेल्या या मुलीचा चंपाती दाम्पत्याना ...पान २ वर

## संतापाच्या भरात पतीचा तोल गेला पत्नीसह त्याने मुलांचाही खून केला









बीड/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंध माणसाचा संसार आणि आयुष्यही उध्वस्त करून टाकतात. कारण असे संबंध सहसा लपून राहत नाहीत आणि जेंव्हा ते उघडकीस येतात, तेंव्हा समाजात माणसाला तोंड दाखवायला जागा राहत नाही. खास करून ज्या पुरुषाच्या पत्नीचे बाहेर अनैतिक संबंध असतात तो पुरुष मानसिक दृष्ट्या पूर्णपणे उध्वस्त होतो. अशावेळी त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि मग रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. बीड मधील अशाच एका घटनेत एका पॅरिलेसिस झालेल्या इसमाच्या पत्नीचे बाहेर अनैतिक संबंध होते. मात्र या संबंधाची माहिती मिळताच तिला पतीने अनेक वेळा समजावले, नातेवाईकांनी समजावले. प्रकरण पोलिसांपर्यंत जाताच पोलिसांनी समजावले. पण ती ऐकत नव्हती. त्यामुळे हतबल झालेल्या पतीच्या डोक्यात संतापाची लाट उसळली आणि एके रात्री रागाच्या भरात त्याने पत्नी आणि दोन मुलांनाही ठार मारले. पत्नी वरील रागामुळे दोन चिमुकल्यांना जीव गमवावा लागला.

सोलापूर येथील संगिता सोबत संतोषचा विवाह सोळा वर्षापुर्वी झाला होता. या सोळा वर्षाच्या कालावधीत दोघांचे वैवाहीक जिवन तसे चांगले सुरु होते. मोलमजुरी करुन संतोष आपल्या परिवाराच्या संसाराचा गाडा हाकत होता. बिड शहराच्या शुक्रवार पेठ भागात संतोष कोकणे पत्नी संगिता व तिन मुलांसह रहात होता. बिड शहरातील पवनसुत ट्रेडींग कंपनीत संतोष सेल्समन म्हणून काम ...पान ६ वर

## पतीला जेंव्हा सहन नाही झाले सुपारी देऊन पत्नीला ठार केले

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत निता

सुखी संसारात पती पत्नीने जबाबदारीने वागायचे असते, तरच संसार आणि पती पत्नीतील नाते टिकून राहते. पण माणसाला सगळ्या सुखसोयी आणि एशोआराम मिळू लागला कि त्याची पावले चुकीच्या मार्गावर पडू लागतात आणि त्याच्या हातून अशा काही चुका घडतात कि त्या चुकाच त्याच्या जीवनाचा शेवट करतात. नाशिक मधील उद्योजक नारायण चिते याची पत्नी नीता हिच्या बाबतीतही तसेच झाले. दोन मोठी मुले असताना नीताला बाहेरची चटक लागली आणि ती वेगवेगळ्या पुरुषांना जवळ करू लागली. त्यामुळे नारायणच्या इज्जतीचा पंचनामा होण्याची पाळी आली. अखेर आपली इज्जत वाचवण्यासाठी त्याने पत्नीची सुपारी देऊन हत्या केली. मात्र हत्त्येचा हा कट उघडकीस आला आणि सुपारी किलर्ससह नारायणही पोलिसांच्या जाळ्यात सापडला.



उद्योजक नारायण चित्ते याने नाशिक शहरातील व्यावसायिक क्षेत्रात चांगला जम बसवला होता. यामाहा या दुचाकी वाहनांचे नाशिक शहरात त्याचे दोन शो रुम आहेत. पत्नी, एक मुलगा असा नारायणचा चौकोनी परिवार होता. बाहेरच्या व्यावसायीक झगमगाटात वावरणारा नारायण घरात मात्र दुखी: होता. घरगुती नाजुक कारण त्याच्या मनातल्या मनात सलत होते. त्याची पत्नी निता हिचे परपुरुषांसोबत अनैतिक संबंध ...पान ६ वर

06 TO 12 JULY 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 04/07/2020 7:16 PM Page 1



पान १ वरून....

## मुलीची बाजू घेणे आईला भारी पडले...

सचिन तुकाराम कदम हा खासगी वाहनावरील चालक होता. ठाणे जिल्हयातील मानपाडा येथे तो नोकरी निमित्त रहात होता. विवाहित सचिन हा बिड जिल्हयाच्या मांडवखेल येथील मुळ रहिवासी होता. पत्नी निकीता व मुलगी असा त्याचा परिवार होता. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे त्याचा कामधंदा बंद झाला होता. त्यामुळे तो परिवारासह आपल्या मुळ गावी मांडवखेल येथे राहण्यास आला होता. बिड शहरातील अंकुश नगर भागात त्याची सासरवाडी होती. संसार म्हटला म्हणजे पती पत्नीत वाद हे होतच असतात. वाद झाल्याशिवाय पती पत्नीचा संसार पुर्ण होत नाही असे देखील म्हटले जाते. संसारात भांड्याला भांडे लागतच असते असे देखील म्हणतात. मात्र प्रत्येक भांडणात मध्यस्ती करण्यासाठी पत्नीने आपल्या आईला बोलावणे योग्य नसते. घरातील पती पत्नीचा वाद चार भिंतीत मिटायला हवा. मात्र सचिन व निकिता यांच्या संसारात तसे होत नव्हते. कोणताही वाद झाला म्हणजे सचिनची पत्नी निकीता लागलीच तिची आई अलका हिस मोबाईलद्वार कळवत असे. त्यामुळे पती पत्नीतील प्रत्येक वादाचे अपडेट अलका जोगदंड या तिच्या सासूला मिळत होते. हा प्रकार सचिन यास आवडत नव्हता. आजकाल मोबाईल कंपन्यांनी अनलिमिटेड टॉक टाईम दिला आहे. त्यामुळे बहुतांश विवाहीता आपल्या माहेरी तासनतास बोलत असल्याचे दिसून येते. आपल्या मुलीचे जावयासोबत वाद झाल्याचे समजताच निकिताची आई अलका जोगदंड तात्काळ पती पत्नीच्या समक्ष हजर होत असे. प्रत्येक वेळी ती मुलीला समजावण्या ऐवजी ती जावयाला शिवीगाळ व मारहाण देखील करत असे. हा प्रकार सचिन यास आवडत नव्हता. गेल्या वर्षी नजिकच्या खंडेश्वरी यात्रेत सचिन त्याच्या पत्नी व लहान भावासह गेला होता. त्यावेळी यात्रेत त्यांना सचिनची सासू भेटली होती. भेटी दरम्यान सर्वाचे चहापान झाले. त्यानंतर सर्व जण आपापल्या घरी निघाले. वाटेत सचिनची पत्नी निकीता आईकडे जाण्याचा हट्ट करु लागली. त्यामुळे सचिन व निकिता यांच्यात परतीच्या प्रवासादरम्यान वाद निर्माण झाला. या वादाची हकीकत लागलीच निकीताने मोबाईलद्वारे तिच्या आईला कळवली. आपल्या मुलीचे जावई सचिन सोबत वाद झाल्याचे समजताच सासू अलका त्याठिकाणी देखील काही वेळात हजर झाली. अलका जोगदंड हिने तिची मुलगी, संगीताला समजावण्या एवजी तिने थेट सचिन यास शिवीगाळ सुरु केली. एवढ्यावरच ती थांबली नाही तर तिने सचिनची कॉलर पकडून त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. या प्रकाराने सचिन अस्वस्थ झाला. त्याच्या मनात सासू अलका जोगदंड बद्दल रागाची भावना निर्माण झाली. हा प्रकार त्याने त्याचे वडील तुकाराम कदम यांना कळवला. त्यानंतर २२ मे रोजी सचिन दिवसभर शेतात मशागतीचे काम करत होता. तो थकून भागून घरी आला. त्याने संगीताला जेवण मागितले. मात्र तिने त्याला जेवण देण्यास नकार दिला. तिने सचिनला जेवण देण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे पुन्हा दोघात वाद सुरु झाला. संतापाच्या भरात सचिनने तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. या मारहाणीमुळे संगीताच्या पोटात वेदना सुरु झाल्या. त्यामुळे त्याने रात्री तिला नेकनूर येथील सरकारी दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी तिची सोनोग्राफी करण्याचा सल्ला दिला. रात्र बरीच झालेली होती. त्यामुळे तिला सकाळी दवाखान्यात घेवून जाण्याचे निश्चित केले. उद्या सकाळी संगीताची आई पुन्हा येणार आणि वाद घालणार हे निश्चित होते. संगीताच्या आईला हा प्रकार समजला होता. त्यामुळे तिने सचिन यास फोन करत मी उद्या येते व तुला बघते अशी धमकी दिली होती. आता पुन्हा वाद होणार याची कल्पना सचिन यास आली होती. सचिन व त्याचे वडील तुकाराम कदम यांनी एकत्र येत अलका जोगदंड हिचा कायमचा काटा काढण्याचे ठरवले. पिता पुत्राने एकत्र येत तिला मांडवखेल शिवारातील शेतात भांडण मिटवण्यासाठी बोलावण्याचे नियोजन केले. यावेळी तिचा कायमचा काटा काढण्याचे ठरले. ठरल्यानुसार २३ मे रोजी शेतातील नांगरणीसाठी सचिन ट्रॅक्टर घेवून सकाळीच लवकर निघून गेला होता. काही वेळाने त्याला दहा ते साडे दहा वाजेच्या सुमारास त्याचे वडील व सासू अलका जोगदंड असे दोघे जण येतांना दिसले. जावई सचिन दिसताच सासूने हातात दगड घेवून त्याला फेकून मारण्यास सुरुवात केली. इकडे सचिन देखील संतापातच होता. त्याने भरधाव वेगाने ताब्यातील ट्रॅक्टर तिच्याजवळ आणले व तिला जोरदार धडक दिली. ट्रॅक्टरच्या धडकेत ती खाली पडली. ती खाली पडताच बाजूला पडलेला दगड सचिनने उचलला व तिच्या डोक्यात हाणला. डोक्यात दगडाचा घाव बसल्यामुळे ती जागीच गतप्राण झाली. ती ठार झाल्याची खात्री होताच सचिन व त्याचे वडील तुकाराम यांनी तिचा मृतदेह चटईत गुंडाळला. चटईत गुंडाळलेला तो मृतदेह त्यांनी जवळच असलेल्या गायरान जमीनीतील खोल खड्ड्यात पुरला. दगड व माती टाकून बुजलेल्या त्या खड्ड्यावर काटे पसरवण्यात आले. त्यानंतर सचिनचे वडील तुकाराम कदम घरी निघून गेले व सचिन शेतातच थांबून राहिला. दरम्यानच्या काळात घरातून बाहेर गेलेली अलका जोगदंड गेल्या काही दिवसांपासून घरी परत आलेली नव्हती. २ मे रोजी ती बेपत्ता झाल्याची नोंद तिच्या पतीने नेकनुर पोलिस स्टेशनला केली होती. या मिसींगचा तपास सुरु होता. या कालावधीत ती मुलीच्या सासरी गेल्याची माहिती तपासात पोलिसांना समजली. तपासाचा भाग म्हणून पोलिसांच्या दृष्टीने बेपत्ता अलका जोगदंड हिचा जावई सचिन व व्याही तुकाराम कदम यांची चौकशी करण्यात आली. मात्र दोघेही उडवाउडवीची उत्तरे पोलिसांना देत होते. अखेर पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. घटनेच्या तब्बल १४ दिवसानंतर पोलिसांनी जमिनीत पुरलेला अलकाचा मृतदेह बाहेर काढला. मयत अलका जोगदंड या महिलेचा मृतदेह बाहेर काढण्यासाठी बीडचे तहसीलदार, अतिरिक्त पोलीस अध्यक्ष कबाडे, उपाध्यक्ष सावंत, नेकनूर पोलीस स्टेशनचे ए.पी.आय. केंद्रे, पो.हे.कॉ. अदटराव, शिंदे, युनुस बागवान, नागरगोजे आदींनी घटनास्थळी धाव घेत पुढील कार्यवाही केली. या प्रकरणी दोघांविरुद्ध खूनाचा गुन्हा नेकनूर पोलिस स्टेशनला दाखल करण्यात आला. पती पत्नीच्या भांडणात सासूची नेहमी होणारी मध्यस्ती जावयाला आवडत नव्हती. तसेच सासू जावयाच्या अंगावर धावून जाणे, त्याला शिवीगाळ करणे या प्रकाराने जावई सचिन कदम त्रस्त झाला होता. त्यातून त्याने सासू अलका जोगदंड हिची ट्रॅक्टर खाली चिरडून हत्या केल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली. या कामात त्याला त्याचे वडील तुकाराम कदम यांची साथ लाभली. या खूनाचा पुढील तपास सुरु आहे.

## सहाय्य सोबतीसाठी प्रियकराला पटवले...

उदरनिर्वाह करत होता.दिवसभर तो शेतात काम करीत असल्याने रात्री तो दमुन भागुन आपल्या बिछान्यावर आडवा होत होता. त्यावेळी त्याच्या शेजारी त्याची सुंदर देखणी पत्नी चंद्रलेखा ही त्याला मिठी मारुन झोपत होती. पण तो दमुन भागुन घरी येत असल्याने त्याला कधी एकदा आपण झोपतो असे होत होते. त्यामुळे तो तिला हात ही लावत नव्हता. नवरा आपल्या अंगाला हात लावत नसल्याने तिच्या जवानीची आणि अंगाची काहिली होत होती. ती त्याला हलवुन जागी करत होती. पण तो तिला बाजुला सारत होता. दिवसा मागुन दिवस असेच जात होते.त्याच्या लग्नाला पाच सात वर्ष झाली होती. परंतु तरीही चंद्रलेखाची कुस काही अजुन भरलेली नव्हती. तशी तिची जवानी उठुन दिसत असल्याने तिच्यावर गावातील बरेच तरूण लाईन मारत होते. ती ही गावातुन शेताकडे जात असताना अनेकांना लाईन देत जात असल्याने प्रत्येक जण ती आपल्या गळाला लागते का नाही याची चाचपणी करत होता. त्यातच ती गावातील कुमार पाटील याच्याबरोबर येता जाता बोलत होती.तो ही तिच्यावर लाईन मारत असल्याने तो तिला खुणावत होता. कुमार पाटील ही तरूण होता.त्याला ही हिची कुस अजुन भरलेली नाही.तिचा नवरा तिला कमी पडत आहे याची माहिती होती. म्हणुनच तो तिला कन्नडमध्ये वहिनी म्हणत तिच्यावर जाळे फेकीत होता. कधी एकदा तिला आपल्या अंगाखाली घेतो आणि तिची जवानी ओरबाडुन काढतो असे त्याला झाले होते. तो त्या सधीची वाट पाहत होता. तिच्याशी गुलगुल बोलत होता.तिला ही त्याच्या मनातील कळाले असल्याने एकदा घरात कुणी नसताना तिने त्याला फोन करुन बोलावुन घेतले होते. तिने आपल्याला का बोलावले आहे हे न समजण्या इतपत तो काही खुळा नव्हता. घरात गेल्यावर तिच्याशी लाडी गोडी करत त्याने तिला आपल्या मिठीत दाबुन धरल होते. तिची मोठी कबुतरे त्याच्या छातीला दाबत होती.तिच्या तोंडात तोड घालून तो तिच्या मांडीवरून हात फिरवु लागला होता. तशी ती ही तापली होती. बघता बघता ते दोघे निर्वस्त्र झाले होते. तो तिच्या नागडया अंगावर पडुन आपला कार्यभार साधत होता. त्याच्या सामनाला तिने आत घेऊन ती त्याला आपल्या अंगावर ओढून घेत होती. त्याचा एक एक दणका तिला सुखावत होता. तिच्या चेहऱ्यावर ही समाधानाची लकेर दिसत होती. त्याने ही तिला असे काही सुख दिले होते की ती त्याच्या शारीरिक सुखात न्हाऊन निघाली होती. त्या दिवसापासुन त्या दोघांचा तो खेळ बिनधास्तपणे चालु असायचा.ती आता त्याला त्या कामासाठी सारखी बोलावुन घेत होती. त्याला ही तेच पाहिजे होते.त्या दोघांचे विवाहबाह्य संबंध वाढीस लागले होते. परंतु काही झाले तरी असे संबंध हे कधी ना कधी उघड होत असतात. मुतगी गावात ही त्या दोघांच्या संबंधाची चर्चा रंगत होती. ही चर्चा तिचा नवरा शशीकिरण याच्या कानावर ही आली होती. तो त्या दोघांच्यावर ही नजर ठेवुन होता. एकदा तर ते दोघे ही त्याच्या घरातच रंगेहात सापडले होते. आपली पत्नी आपल्या माघारी दुसऱ्या पुरूषाच्या नादाला लागुन नको तो कारभार करत आहे याचा त्याला राग आलेला होता. त्यावेळी त्याने त्या दोघांना ही समज दिलेली होती.भांडणात त्याने पत्नी चंद्रलेखा हिला जबर मारहाण केली होती. एवढे करुन आणि रंगेहात नवऱ्याला सापडुन ही ती गप्प बसणाऱ्यातील नव्हती. त्या दोघा नवरा बायकोचे संबंध ताणले गेले होते. त्याचा संसार तुटण्याच्या मार्गावर होता. त्याने तिला याबाबत बरेच समजावुस सांगुन कुमार पाटील याच्या बरोबरचे संबंध तोडुन टाकण्यास सांगितले होते. पण ती त्याचे काही ऐकत नव्हती. तिला आपल्या नवऱ्यापेक्षा आपला प्रियकरच भारी वाटत असल्याने तिने त्याला भांडणात एकवेळ मी तुला सोडेन पण त्याला सोडणार नाही असे ठणकावूनद सांगितले होते. त्यामुळे शशीकिरण ही त्या दोघांच्यावर चिडुन होता.त्याच्या घरच्या लोकांनी ही तिला याबाबत समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. पण ती त्या संबंधात इतकी वाहवत गेली होती की तिला आता नवरा नकोच वाटत होता. तिला कुमार पाटीलच त्या कामासाठी पाहिजे होता.त्याने ही तिला तशी चटक लावल्याने ती काही त्याला सोडायला तयार नव्हती. या कारणातुन शशीकिरण व चंद्रलेखा याच्यामध्ये सारखी भांडणे होत होती. ती ही त्याला उलट उत्तरे देत होती. बायकोच्या अशा वागण्याने अलिकडे तो पुर्णता दारुच्या आहारी गेला होता. बायको सांगुन ही ऐकत नाही याचे शल्य त्याला होत होते.तरीही तो दारु पिऊन घरी आला की चंद्रलेखा बरोबर भांडुन काढुन तिला मारहाण करीत होता.ती ही आता वैतागलेली होती.एकदा भांडणात त्याने तिला तु जर कुमार याला भेटायला गेलीस की तुला संपवुन टाकतो अशी धमकी दिली होती.त्याने तिला त्याला भेटायला मज्जाव केला होता.या गोष्टीची तिला ही चिड येत होती. म्हणुन तिने आता आपल्या त्या संबंधात अडसर ठरणाऱ्या नवऱ्याचा कायमचा काटा काढायचा असे ठरवले होते. तिने तसे आपला प्रियकर कुमार याला देखिल तसे सांगितले होते. तो ही ती सांगेल ते करायला तयार होता. म्हणुन त्या दोघांनी त्याला मारण्याचा कट रचला आणि तो अमंलात आणला. दि. १२ मे २०२० रोजी शशीकिरण हा नेहमी दारू पिऊन घराकडे आला होता.त्याला दारुची नशा जास्त झाली होती. तो तिच्याबरोबर भांडण काढत तिला मारहाण करत होता.ती ही त्या भांडणात जशास तसे उत्तर देत होती.रात्री जेवण न करताच तो नशेत तसाच झोपला होता. नेमकी हिच संधी हेरून चंद्रलेखाने प्रियकर कुमार पाटील याला फोन करुन बोलावुन घेतले होते. त्याने ही येताना आपल्या बरोबर एका अल्पवयीन मित्राला बरोबर घेतले होते. रात्री ११च्या सुमाराला चंद्रलेखाने त्या दोघांना घरात घेतले होते. पती शशीकिरण झोपलेल्या खोलीत तिने त्या दोघांना नेले. शशीकिरण हा दारुच्या नशेत घोरत पडला होता.त्यावेळी झोपलेल्या शशीकिरण याचे हातपाय तिने व अल्पवयीन मित्राने दाबुन धरले होते. तर कुमार पाटील याने शशीकिरण याचा जोरात गळा आवळायला सुरूवात केली. तो त्याच्या तावडीतुन सुटण्याचा प्रयत्न करत होता. परंतु त्या तिघांच्या ताकदीपुढे तो कमी पडत होता. त्यातच तो जास्त दारु पिला असल्याने नशेत तो काहीच करु शकत नव्हता. काही क्षणातच तो टाचा घासत शांत झाला होता. त्याचा मृत्यु झाल्याचे लक्षात येताच कुमार पाटील आणि त्याच्या अल्पवयीन मित्राने घरातुन काढता पाय घेतला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी चंद्रलेखाने नवरा शशीकिरण याचा मृत्यु जास्त दारु पिला असल्याने झोपत झाला असल्याचे घरच्या लोकांना व शेजार पाजाऱ्याना सांगुन नवऱ्याच्या मृत्युचे नाटक केले होते. परंतु घरच्या लोकांना शशीकिरण याचा मृत्यु हा नैसग्रिक नसुन त्याचा घातपात आहे याची शंका येत होती. म्हणुन त्यांनी या घटनेची माहिती कुडगी पोलीसांना दिली होती.पोलीस ही तातडीने घटना स्थळी दाखल झाले होते. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो शवविच्छेदनासाठी पाठवून दिला होता. मयत शशीकिरण याच्या गळ्यावर गळा आवळल्याच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या.तसा शवविच्छेदनाचा अहवाल ही पोलीसाना मिळाला होता. पोलीसांनी या घटनेची चौकशी चंद्रलेखा हिच्याकडे करत असताना ती पोलीसाना उडवा उडवीचे उत्तरे देत होती. तिच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत असल्याने महिला पोलीसाकरवी तिला पोलीसी खाक्या दाखवला असता, तिने आपला गुन्हा कबुल करून आपले कुमार पाटील याच्याबरोबरचे विवाहबाहय संबंध मान्य केले.आपल्या त्या संबंधात नवऱ्याचा अडसर ठरत होता. म्हणुन आपल्या नवऱ्याचा गळा दाबुन खुन केल्याचे ही मान्य केले. या कामात तिला प्रियकर कुमार पाटील आणि त्याच्या अल्पवयीन मित्राने मदत केल्याचे पोलीसाना सांगितले. तिने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या गुन्हयातील कुमार पाटील आणि त्याचा अल्पवयीन मित्र मंजु कोठ याना ही ताब्यात घेतले होते. शशीकिरण श्रीशैल रायगोंडा (वय ३२) याच्या खुन प्रकरणी पत्नी चंद्रलेखा (वय २७) तिचा प्रियकर कुमार पाटील (वय ३०)आणि अल्पवीन मित्र मंजु कोठ (वय १७) याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवुन त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा पुढील तपास कुडगी पोलीस करत आहेत. विवाहबाहय संबंधात महिला जर भरकटत गेली तर ती कोणत्या थराला जाते हेच या घटनेवरुन दिसुन येते.

## सूड घेण्यासाठी टपलेल्यांनी साधला नेम...

आपल्या कुंटुंबासह राहयला आहे. तसा तो गुन्हेगारी प्रवृतीचा असल्याने त्याचे मित्र ही तसेच होते. त्याची तशी साखळी होती.मिळेल तेव्हा काम करणे एरवी दारु पिणे मस्तपैकी पार्टया करणे एवढाच त्याचा उदयोग होता. जहॉ चार यार मिल जाए वही रात हो गुलजार म्हणत ते पार्टीची मैफील जमवत होते.त्यामध्ये एकमेकाला शिव्या देऊन बोलावणे, किरकोळ कारणातुन एकमेकाबरोबर भांडण करणे हे, त्याचे नित्याचेच बनले होते. त्याच्यात चेष्टा मस्करी ही चालायची. ते सर्वजण एकमेकांचे सख्ये मित्र असल्याचे दाखवत असले तरी त्याच्यात अंतर्गत दुश्मनी ही घुसमसत होती. अजित पाटील, सुरज जाधव आणि प्रतिक पाटील हे संतोषवर चिडुन होते. हे तिघेही सराईत गुन्हेगार होते. त्या तिघांना ही सतोंष याचा कायमचा काटा काढयचा होता. त्याला कारण ही तसेच होते. खुन का बदला खून म्हणून ते त्याचा वचपा काढणार होते. पण त्याना तशी संधी मिळत नव्हती. कारण संतोष ही नेहमी हत्यारबंद असायचा हे त्याना माहित होते. सतोषवर वेगवेगळया पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंद आहेत हे त्याना ही माहित होते.सन २०१३साली खून आणि सन २०१८ साली खूनाचा प्रयत्न करणे असे दोन गुन्हे त्याच्यावर होते. तर अजित पाटील, प्रतिक पाटील, सुरज जाधव याच्यावर ही इस्लामपूर पोलीस ठाण्यात खूनाचा प्रयत्न करणे, मालमत्ता नुकसान करणे, जाळपोळ करणे असे गुन्हे होते. या तिघांच्यावर ही तडीपारची कारवाई करण्यात आली होती. सन २०१३ साली निनाई नगर येथील आण्णा लोहार याच्या खून प्रकरणी संतोष कदम याच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला होता. या प्रकरणात तो मुख्य आरोपी होता. गेल्या एक वर्षापुर्वीच त्याची या गुन्हायातुन मा.न्यायालयाने सबळ पुराव्याच्या अधारे निर्दोष सुटका करण्यात आली होती. तेव्हापासून तो मोकाटच होता. आण्णा लोहार हा अजित पाटील आणि प्रतिक पाटील याच्या गॅंगशी संबंधीत होता. त्याच्या खूनाचा बदला त्याना संतोष याचा खून करून घ्यायचा होता. कारण संतोष याने त्यावेळी आण्णा लोहार याचा खून किरकोळ कारणातून केला होता.आपल्या मित्राला त्याने विनाकारण मारून टाकले अशी त्याची भावना झाली होती. या एकाच कारणातून ते त्याच्यावर डुख धरून होते.कधी एकदा संतोष याची गेम करुन आपण खुन का बदला खुन घेतो असे त्याना झाले होते. त्यासाठी ते संधीच्या शोधात होते. तशी त्याना संधी भेटत ही होती.कारण ते आणि संतोष हे जेवणाची आणि दारूची पार्टी सारखे करत होते.फक्त ते संतोषला संपवण्यासाठी वेगळेच कारण शोधत होते. रविवार दि.२८ जून २०२० रोजी रात्री संतोष हा दारू पिऊन पुल्ल होता. त्याचवेळी औद्योगीक वसाहतीच्या एका रिकाम्या शेडमध्ये अजित पाटील आणि सुरज जाधव हे दोघेजण दारूची आणि जेवणाची पार्टी करून गाडीवरून भरघाव येत होते. बहे रोडवरील डॉ.संग्राम पाटील याच्या दवाखान्यासमारे या दोघांनी मुद्दामच संतोष कदम याच्या गाडीच्या आडवी गाडी घालून त्याला दादागिरी करत शिवीगाळ केली.त्यावेळी हे तिघेही दारूच्या नशेत असल्याने एकमेकांच्या अंगावर धावून जात होते.त्यावेळी तेथे पेट्रोलिंग करणाऱ्या पोलीसाने त्याना हटकल्याने ते तिघे ही वाद करून तेथून निघुन गेले होते. नेमकी हिच संधी आता संतोष याला संपविण्याची आहे हे ओळखुन अजित पाटील आणि सुरज जाधव या दोघांनी जमाव जमवुन संतोष राहत असलेल्या निनाईनगर येथील घराकडे गेले. त्यावेळी रात्रीचे बारा साडेबारा वाजले होते. त्याच्या घरासमोर जावून त्यांनी संतोष याला शिव्या देऊन घरातुन बाहेर बोलावून घेतले. सतोंष याच्या पोटात ही आक्काबाई शिरली असल्याने तो ही तसाच निर्भीडपणे बाहेर आला होता. तो ही मी एकटाच वाघ आहे.तुम्हाला बघून घेतो असे म्हणत त्याच्यसमोर येऊन थांबला होता. त्यावेळी रागाच्या भरात असणाऱ्या अजित पाटील याने व त्याचा मित्र प्रतिक उर्फ पिल्ल्या पाटील याने त्याला धरून खाली पाडले. त्याला लाथा बुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली होती.रात्रीच्या वेळी निनाई चौकात मोठा गोंधळ आणि गोंगाट चालु होता. झोपलेले लोक ही बाहेर काय तमाशा चालला आहे हे बघायला आले होते. सतोंष कदम याला काही तरूण मारहाण करीत आहेत हे सर्वजण सराईत गुन्हेगार हे बघुन कुणी ही त्याला सोडवायला पुढे आले नाही.त्याचवेळी सुरज जाधव आणि अजित पाटील यांनी आपल्या खिशातील चाकू काढून संतोष कदम याच्या मानेवर तोंडावर आणि छातीवर वर्मी घाव घालत होते. या मारहाणीत संतोष हा गंभीर झाला होता. तो आपला जीव वाचविण्यासाठी शेजारीच राहणाऱ्या चौकातून पळत जात शरद कदम याच्या घरात शिरला होता.परंतु चाकुचे वर्मी घाव त्याच्याछातीवर बसले असल्याने तो तडफडत होता. पुढे तेथुन ही त्याला त्या तिघांनी बाहेर काढून त्याच्यावर वार करण्यास सुरूवात केली. त्यावेळी तो रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडला होता. या घटनेत संतोष हा नक्कीच संपला आहे याची अजित पाटील प्रतिक पाटील आणि सुरज जाधव याना खात्री झाली.ते सर्व जण त्याला मारून घटनास्थळावरून पळून गेले. या घटनेनंतर संतोषचे घरचे लोक धावत पळत घटनास्थळी आले होते. तो पर्यत सगळा खेळ संपला होता. जमीनीवर संतोष हा रक्तताच्या थारोळ्यात शेवटच्या घटका मोजत होता. त्याला लगेच त्याच्या घरच्या लोकांनी उचलून रिक्षात घातले आणि उपचारासाठी एका खाजगी दवाखान्यात नेले.तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापुर्वीच मृत्यु झाल्याचे घोषीत केले. या घटनेची माहिती मिळताच इस्लामपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख हे आपल्या सहकार्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले.घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक कृष्णांत पिंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली होती.त्यांनी या घटनेतील आरोपीना तातडीने जेरबंद करण्याच्या सुचना पोलीसांना दिल्या. घटनास्थळी मयत संतोष कदम याच्या चप्पला,आणि मारेकऱ्यांनी गुन्हयात वापरलेले चाकुचे कव्हर पडले होते. स.पो.नि गणेशप्रसाद भरते आणि पो.ना. शरद जाधव यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपासाला सुरूवात केली. घटनास्थळावरून मारेकरी पळून गेले होते. पोलीसांना ही घटना कोणत्या कारणातून घडली आणि संतोष कदम याचे मारेकरी कोण आहेत याची माहिती मिळाली होती.पोलीस त्याचा कसून शोध घेत असताना सोमवार दुपारी त्याना ताब्यात घेण्यात पोलीसाना यश आले होते.या घटनेची लेखी फिर्याद शरद वंसत कदम यांनी इस्लामपुर पोलीस ठाण्यात दिली.त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी संतोष रखमाजी कदम वय २४ याच्या खून प्रकरणी अजित हणमंत पाटील (वय२८रा.शिवाजी चौक), सुरज उर्फ पांडया जाधव (वय२६ रा.उदय चौक), आणि प्रतिक उफ पिल्या पाटील (वय १९,) याचेसह इतर तीन चार जणांवर भा.दं.वी.कलम ३०२ आणि इतर गुन्हायाखाली गुन्हा नोंद केला होता. या घटनेतील बाकी चार जणांचा शोध कथा शब्द बध्द होईपर्यत सुरू होता.अजित पाटील सुरज जाधव आणि प्रतिक उर्फ पिल्या पाटील या तिघांना पोलीसांनी सोमवार दि.२९ रोजी मा.न्यायालयासमोर उभे केले असता. मा.न्यायालयाने त्याना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान या तिघांनी ही आपला गुन्हा कबुल केला होता. त्यांनी गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकली आणि चाकु जप्त केला होता. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.नारायण देशमुख करीत आहेत. सराईत गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला नसल्याने ते गुन्हा करायला मागे पुढे कचरत नसतात. त्याना फक्त बदल्याची भाषा समजत असते. म्हणूनच ते खुन का बदला खून या न्यायाने वागत असतात. खटक्यावर बोट आणि जागेवर पलटी असा त्याचा खाक्या असल्याने खून, मारामारी धमक्या देणे हे त्याच्या अंगवळणी पडलेले असते. म्हणूनच ते सराईत गुन्हेगार म्हणून परिचित असतात. त्याच्या नादाला कुणी लागत नाही हे त्याना माहित असल्याने एखाद्याची गेम ते सहजच करतात. आणि त्याच्या त्या गेममध्ये संतोष कदम सारखे गुन्हेगार ही बळी पडत असतात.

## रक्ताचे नाते कलंकित झाले...

धनंजय मारापल्ले यानं वडीलाच्या डोक्यात फरशी टूकडे मारून वडीलाला गंभीर जखमी केले होते. ही वार्ता कळताच चंद्रकांत मारापल्ले यांच्या शेता शेजारीच आसणारे चंद्रकांत मारापल्ले यांचा भाऊ उत्तम मारापल्ले यांनी शेतवस्तीकडे धाव घेतली. चंद्रकांत मारापल्ले रक्ताच्या थारोळ्यात एका चारपाईवर पडले होते.बाजूल त्यांचा पासूनच जवळच त्यांचा मुलगा धनंजय त्याची बायको थांबली होती. मी माझ्या बापाला मारलो तो दवाखान्यात पर्यंत देखील जावू शकत नाही, एवढा जोराचा मार मारलाव म्हणून किंचाळत होता. त्याला कुणीच दवाखान्यात न्याच नाही! म्हणून दम भरत होता. तेथे उपस्थित आसलेल्या नातेवाईकांनी धनंजयची समजूत काढू त्याला बाजूला सारले. उत्तम मारापल्ले यांनी चारपाईवर पडलेल्या चंद्रकांत मारापल्ले यांना उठविण्याचा प्रयत्न केला मात्र ते बेशुद्ध आवस्थेत होते. दरम्यानच्या काळात आजूबाजूचे शेतकरी घटनास्थळी आले. त्याच्या मदतीने गंभीर जखमी झालेल्या चंद्रकांत मारापल्ले यांना उपचारासाठी चाकूर येथील एका खाजगी रूग्णालयात आणले.तेथील डॉंक्टरांनी प्रथम उपचार करून गंभीर मार आसल्याचे सांगत पुढील उपचारासाठी लातूरला जाण्याचा सल्ला दिला. उत्तम मारापल्ले व त्याच्या मुलाने एका खाजगी वहानातून काही वेळातच लातूर गाठून येथील सह्याद्री हाँस्पिटल मधये चंद्रकांत मारापल्ले यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान २० जून २०२० रोजी पहाटे चंद्रकांत मारापल्ले यांच म्रुत्यु झाला. दवाखान्यातून चाकूर पोलिसांना घटनेची माहीती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच चाकूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जयवत चव्हण यांनी तात्काळ या घटनेची प्राथमिक माहीती जाणून घेतली. मयत चंद्रकांत मारापल्ले यांचा भाऊ उत्तम गुंडाप्पा मारापल्ले यांच्या फिर्यदीवरून चाकुर पोलिस ठाण्यात धनंजय मारापल्ले याच्या विरोधात गुरन २०८/ २०२० कलम ३०२ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आल. जिल्हा पोलीस अधीक्षक राजेंद्र माने, अप्पर पोलिस अधीक्षक हिम्मत जाधव, चाकूर उपविभागीय पोलिस अधीकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सर्व सुत्र चाकूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जयवंत चव्हाण यांच्या हाती देण्यात आले. पोलिसांनी तपासाचे चक्रे गतिमान करून या प्रकरणातील प्राथमिक माहीती जाणून घेण्यासाठी लातूर रोड गाठले. चाकूर तालुक्यातील लातूर रोड भागात चंद्रकांत मारापल्ले हे आपल्या कुटूंबासह राहत होते.त्यांना दोन मुले होती. एक मुलगा शिक्षक म्हणून बाहेरगावी राहत होता तर धनांजय हा गावातच राहत होता. चंद्रकांत मारापल्ले यांनी धनजय आणी रवि या आपल्या दोनही मुलांचे लग्न मोठ्या थाटामाटात केले होते.चाकूर तालुक्यातील राजकारणात चंद्रकांत मारापल्ले यांची चांगलीच छाप होती. त्यानी राजकारणात सक्रीय आसताना चाकूर पंचायत समीतीचे सभापतीपद भूषविले होते. एक मन मिळावू जन सामान्याचा नेता अशी त्यांची ओळख होती. चंद्रकांत मारापल्ले यांचा मुलगा धनंजय याचा लग्नानंतर त्याचा संसार सुखात गेला. मात्र गेल्या काही वर्षापुर्वी त्याला दारूचे व्यासन जडले. दररोज दारू पिऊन वडीलांशी जमीनीची वाटणी करून मागू लागला. पण वडील चंद्रकांत मारापल्ले यांनी त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत त्याची वेळोवेळी समजूत काढली. तुझा एक भाऊ नोकरी निम्मीत बाहेरगावी आहे तु येथेच आहेस तूला कशाला वाटणी हे सगळ तुच बघ आसही बोलत होते. मात्र धनंजयलावाटणी पाहीजे होती तो बाजूला राहयचय मला वाटणी द्या अस सारख म्हणत होता. या कारणातून बाप लेकात अनेकदा वादही झाले होते. वडील वाटणी देत नसल्यामुळे धनंजय मनात राग ठेवून होता. मला वाटणी द्या नाहीतर तुम्हाला जिवे मारीन अशीही धमकी धनंजयने वडीलांला दिली होती.मात्र दररोज दारू पिऊन धनंजय बोलत आसल्याने चंद्रकांत मारापल्ले यांनी त्याकडे विशेष लक्ष दिले नाही. एवढी माहीती पोलिसानी हास्तगत केली. या प्रकरणातील संशयीत आरोपी धनंजय मारापल्ले याचा मागावर चाकूर पोलिसांचे एक पथक पाठविण्यात आले या पथकात पीएसआय निलम घोरपडे,पोकॉ. हाणमंत आरदवाड, पीसी. गोरोबा जोशी, पोना बाळू आरदवाड, दत्ता थोरमोटे, मारूती तुडमे, यांचा समावेश करण्यात आला. या पोलिस पथकाने लातूर रोड परीसर पिंजून काढला मात्र धनंजयचा पत्ता लागला नाही. एका गुप्त माहीती वरून पोलिसांनी लातूर रोड रेल्वे स्थानक परीसरात सापळा लावला आसता धनंजय मारापल्ले पळून जाण्याच्या बेतात आसतान पोलिसांनी झडप घालून त्याला शिताफिने पकडले. त्याला चाकूर पोलिस ठाण्यात हजर केले असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबूल दिली. वडील जमीनीची वाटणी मागुनही देत नसल्याने मनात राग ठेवून त्याचा कायमचा काटा काढल्याचे त्यांने पोलिसांना सांगितले. १९ जुन २०२ रोजी सकाळी ११ वाजता चंद्रकांत मारापल्ले नेहमीप्रमाणे शेतात आसताना त्यांनी धनंजय याने वडीलांना गाठून मला आत्ताच्या आताजमीन वाटणी पाहीजे असा हाटट धरला. चंद्रकांत मारापल्ले यांनी त्याचा बोलण्याकडे दुर्लक्ष केले. नेहमीच धनंजयच्या बोलण्याकडे चंद्रकांत मारपल्ले दुर्लक्ष करीत आसल्याचा राग धनंजयला आला. त्यातून दोघात शाब्दीक चकमक झाली.त्यातून हाणामारी उफळली मनात राग ठेवून आसलेल्या धनंजयने बाजूल आसलीली फरशी उचलून बेसावध आसलेल्या चंद्रकांत मारापल्ले यांच्या डोक्यात फोडली. फरशीचा घाव वर्मी लागल्याने चंद्रकात जमीनीवर कोसळले. रक्ताच्या धारा वाहू लागल्या व चंद्रकांत बेशुध्द पडले. तरीही धनंजयचा राग शांत झाला नव्हता. तो ओरडुन सांगत होता मी माझ्या बापाला मारले तो दवाखान्यापर्यांतही जावून शकत नाही. पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासात आरोपीने खुन करण्यासाठी वापरलेली फरशी, रक्ताने माखलेले कपडे जप्त केल असून या प्रकरणात अन्य कोणाचा सहभाग आहे का याचाही तपास करीत आहेत.या प्रकरणाचा पुढील तपास चाकूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जयवंत चव्हाण करीत आहेत.

## प्रेमातील सुखाच्या बंद करताच वाटा...

खूप अभिमान होता. आपल्या एकुलत्या एक मुलीने चांगले नाव कमवावे असे त्यांना वाटत होते. या मुलीसाठी योग्य आणि तिचा इतका शिकलेला मुलगा मिळावा अशी ऐश्वर्या वडिलांची इच्छा होती. आता त्याचे वय झाले होते ते थकले होते. ७२ वर्षाचे शंकर चंपाती हे वेकोली कंपनीतून निवृत्ती झाले होते. आता ते आपली पत्नी सीमा आणि मुलीसह सुखा समाधानाने आयुष्य जगत होते. ऐश्वर्या ही त्यांची दत्तक मुलगी. ८ वर्षाची असताना तिचे आई-वडील एका अपघातात मरण पावले होते. त्यानंतर शंकर चंपाती आणि सीमा चंपाती यांनी तिला दत्तक घेतले. तिचे लाड कोडात संगोपन केले. ती मुळातच हुशार असल्याने तिच्या आवडीप्रमाणे तिला शिक्षण घेऊ दिले. आता ती नागपुर मधील आयटी पार्कमध्ये नोकरी करू लागली होती. आपल्या मुलीचे भविष्य उज्वल आहे. तिचे लग्न करताना तिला साजेल असा आणि तिच्या सारखाच उच्चशिक्षित वर शोधून तिचे लग्न करून द्यायचे. असा त्यांचा विचार सुरू असताना त्यांना ऐश्वर्याबाबत बाहेरून काहीतरी ऐकायला मिळाले. शंकर चंपाती यांच्या ओळखीच्या माणसाने ऐश्वर्याला एका मुस्लिम मुलासोबत फिरताना पाहिले होते. त्याने ही माहिती शंकर चंपाती यांना सांगितली होती. मुलगा आपल्या धर्मातील नाही असे सांगितल्यावर शंकर चंपाती यांच्या पायाखालची जमीन सरकली. आपल्या शिकलेल्या मुलीने कोणताही आताताई निर्णय घेऊन आपले आयुष्य बरबाद करु नये असे त्यांना वाटत होते. याबद्दल त्यांनी आपल्या मुलीशी चर्चा केली. तू ज्या मुलासोबत फिरते, तो मुलगा कोण? त्याचं नाव काय? तो कुठे राहतो? या संदर्भात विचारले असता तिने मुलाचे नाव इखलाख खान असे सांगितले. ते ऐकून ऐश्वर्याच्या आई-वडील तिच्यावर रागावले. तू ज्या मुलावर प्रेम करते तो मुलगा आपल्या धर्मातील नाही आणि त्याच्यासोबत लग्न करायला निघाली आहे? आपल्या नातेवाईक काय म्हणतील? प्रेम करताना याचा विचार तरी करायला हवा होतास! अंग आई आता जमाना बदललाय आहे. काळाची पावले ओळखून पुढे जायला हवे. आपण धर्म, जात याचा विचार करत चुकीचा आहे. तुम्ही चांगल्या सुशिक्षित असताना असा विचार कसा काय करता? असे ऐश्वर्याने आपले मत व्यक्त केल्यावर तिची आई म्हणाली, अगं ज्या समाजात आपण राहतो तो अजूनही लग्न करताना जात, धर्म याचा विचार करतो. परक्या मुलाशी लग्न करताना समाज काय म्हणेल याचा विचार केला का तू? आई आता मला इखलाख खान याच्याशी लग्न करायचे आहे. इखलाख खान हा माझा आठवीपासूनचा मित्र आहे. त्याची आणि माझी चांगली मैत्री आहे. तसेच तो चांगला क्रिकेटपटू आहे. २०१४मध्ये तो विदर्भकडून अंडर १९ खेळला आहे. काही दिवसांपूर्वी तो नौरबीला गेला होता. सद्या तो कसौटीची तयारी करीत आहेत. त्यामुळे तो मला फार आवडतो आमच्या ट्रेनिंग चांगलं जमलं आहे आणि मी लग्न करीन तर त्याच्याशी बाकी मला समजावण्याच्या भानगडीत पडू नका. असे ऐश्वर्याने आईला सुनावले. त्यामुळे तिच्या आई-वडिलांना धक्का बसला. काय करावे काही सुचेना. शेवटी त्यांनी नागपूर सोडण्याचा निर्णय घेतला. येथून आपण दुसरीकडे राहायला गेल्यावर या दोघांची गाठ भेट होणार नाही तसेच या दोघांतील प्रेम कमी होईल असा विचार त्याने केला. ऐश्वर्या घरी नसताना त्यांनी यावर विचार केला आणि दत्त वाडीतील आपले स्वतःचे घर विकून पैसे घेऊन पुण्याला स्थायिक व्हायला पाहिजे तिथे ऐश्वर्याला जॉब मिळू शकेल. एकदा ती नोकरीला लागली की तिला इखलाख खान याला भेटायला वेळ मिळणार नाही. मग ते दोघे एकमेकांना विसरून जातील असा विचार त्यांनी केला. ऐश्वर्याच्या आई-वडिलांनी घर विकायचे ठरवल्यानंतर शंकर यांनी गुप्तपणे बाहेर याविषयी बोलणी करण्यास सुरुवात केली. अंदाजे दीड कोटी या घराची किंमत होती. त्यामुळे आपले पुढील आयुष्य सुखात जाईल असा त्यांचा विचार होता. एके दिवशी ऐश्वर्या आपल्या खोलीत असताना त्यांनी आपली पत्नी सीमाला याबाबत सांगितले. आता आपण नागपूरचे घर विकून पुण्याला जाऊ. इथे आपल्या घराला चांगली किंमत येईल. अगदी दीड कोटी रुपये मिळतील. यातील काही पैशातून पुण्यात एखादा छानसा रूम घेऊ. बाकीचे पैसे मुलीच्या आणि आपल्या नाव ठेवून उरलेले आयुष्य आनंदात घालू. तसेच ऐश्वर्या साठी पुण्याला एखादा चांगला मुलगा शोधून तिचे लग्न करून टाकू. सीमा आणि शंकर चंपाती हे दोघे घरात बोलत बसले होते. त्यांना वाटत होते की आपल्या संभाषण ऐश्वर्याने ऐकलं नसेल पण काहीतरी कामानिमित्त ती आपल्या आई-वडिलांच्या रूम जवळ आली असता, तिला हे संभाषण ऐकू आले आणि तिने तिथून काढता पाय घेऊन ती आपल्या खोलीत गेली. आपण प्रियकर इखलाक खान याला सोडणार नाही म्हटल्यावर आपल्या आई-वडिलांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला आहे हे ऐकून ती चक्रावून गेली. तीला ईखलाखाशी संबंध तोडायचे नव्हते. म्हणून त्या दिवशी काहीतरी निमित्त काढून बाहेर पडली आणि इखलाख याला भेटली. त्यादिवशी तिने आई-वडिलांमध्ये काय बोलणे झाले आहे ते सांगितले. यावर इखलाखने खूप विचार केला. ऐश्वर्याचा नाद सोडणे त्याला परवडणारे नव्हते. कारण ती चंपाती दाम्पत्याची एकुलती एक मुलगी होती. तिचे आई-वडील आपल्या बरोबर तीचे लग्न करून देणार नाही हे त्याला समजून चुकले होते. एक तर त्या दोघांना आपल्या मार्गातून बाहेर काढल्याशिवाय ऐश्वर्या आपली होणार नाही आणि घर विकून जे दिड कोटी मिळतील त्यातील हिस्सा आपल्याला मिळणार नाही. यावर विचार करत असताना त्याला कल्पना सुचली. त्याने ऐश्वर्याला समजून सांगितले. ऐश्वर्याला सुरुवातीला हे पटले नाही, पण इखलाख खानने तिला समजावून सांगितल्यावर ती तयार झाली. या सर्व बेताची अंमलबजावणी १४ एप्रिल रोजी करण्याचे त्यांनी ठरविले. दिनांक १४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजताचा सुमार असावा. बाहेर कडक उन असल्यामुळे प्रत्येक जण घरात बसने पसंद करत असत. सगळीकडे शांत होती. याचा संधीचा इखलाख खान याने फायदा घेतला. ऐश्वर्याच्या वडिलांनी उन्हामुळे खाण्यासाठी खरबूज आणून ठेवले होते. ऐश्वर्याने ते फ्रीज मधून काढून त्या खरबूज तुकडे केले. ते एका प्लेटमध्ये आपल्या आई वडिलांना खायला दिले. आपल्या मुलीने दिलेले ते खरबूज या दाम्पत्याने आनंदाने खाल्ले. थोड्याच वेळात त्या दाम्पत्याला गुंगी येऊ लागली. आपल्या दिलेल्या औषधाचा परिणाम झाल्याचे दिसताच ऐश्वर्या घराबाहेर आली. बाहेर इखलाख आधीपासूनच उभा होता. त्याला तिने इशारा केला. तो फाटक उघडून घरात येण्याआधीच फटकाजवळ बांधलेल्या कुत्रा जवळ ती येऊन उभी राहिली. कारण अनोळखी माणूस घरात शिरू लागतात घरातील कुत्रा भूकतो याची ऐश्वर्याला कल्पना होती. कुत्राच्या आवाजानं आई-वडील जागी होतील असे तिला वाटले म्हणून ती त्याच्या जवळ उभी राहिली. इखलाख घरात शिरतात तीही त्याच्या पाठोपाठ आत गेली. त्याला आपले आई-वडील कुठे बेशुद्ध पडले आहे ते दाखवले आणि घराबाहेर येऊन ती मोपेड घेऊन जवळ असलेल्या ब्युटी पार्लर कडे गेली आणि नंतर बिग बाजार येथे राहणाऱ्या आपल्या चुलत बहिणीकडे गेली. इकडे घरामध्ये एकलाख बेशुद्ध पडलेल्या शंकर आणि सीमा चंपाती जवळ उभा होता. त्याच्याकडे पाहून त्याला संताप आला. घर विकून पुण्याला जातात काय? माझ्यापासून ऐश्वर्याला दूर करतात काय? तिला मी बरं सोडून देईल... ती गेली की दिड कोटी गेले. पैसे असे मी हातचे जाऊ देणार नाही असे म्हणत त्याने, धारदार संतूर बाहेर काढला. प्रथम शंकर चांपती यांच्या गळ्यावर तो फिरवला. संतूरचा वार बसताच ते जागे झाले. त्यांनी त्याच्याकडे पाहिले तेव्हा रागाने इखलाखने त्याच्या डोक्यावर सपासप वार केले. क्षणात ते मरण पावले. त्यानंतर त्याने सीमा यांच्यावर अशा रीतीने वार केले. त्याही मरण पावल्या. दोघांचा मृत्यू झाल्याची खात्री पटताच इखलाखा तेथून पसार झाला. दरम्यान चुलत बहिणीकडे गेली ऐश्वर्या रात्री साडेआठ वाजता घरी परतली. घरातील साहित्य अस्ताव्यस्त होते. आई-वडील रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. सर्व काही मनाप्रमाणे घडले होते. आता तिने आरडाओरडा करायला सुरवात केली. शेजारील लोक व त्यांचे भाडेकरू त्या आवाजाने घरात आले. घरातील दृश्य पाहून मुलीला धीर दिला आणि कुणीतरी पोलिसांना याची माहिती दिली. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त नीलेश भरणे यांच्यासह पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पंचनामा करून पोलिसांनी मृतदेह रुग्णालयात रवाना केला. घरामध्ये चोरीच्या उद्देशाने हा खून केल्याचे प्रथमदर्शनी दिसत होते. घरातील साहित्य अस्ताव्यस्त झाल्यामुळे तसे वाटत होते. पण पोलिसांनी चहूबाजूनी तपास केल्यामुळे खरा प्रकार बाहेर पडला. ऐश्वर्या आणि तिचा प्रियकर इखलाख खान या दोघांनी ऐश्वर्याच्या आई-वडिलांनी लग्नाच्या विरोध केल्यामुळे व दिड कोटी रुपयांचे घर विकून ते पुण्याला स्थायिक होणार असल्यामुळे आपली ताटातूट होणार या उद्देशाने या प्रियकर प्रेयसीने बेत रचून ऐश्वर्याचे वडील शंकर अतुलचंद्र चंपाती व आई सीमा शंकर चंपाती या वृद्ध दाम्पत्याची अत्यन्त क्रूर पध्दतीने खून केला. या प्रकरणी पोलिसांनी मोहम्मद इखलाख खान व ऐश्वर्या या दोघांना अटक केली.

### कर्जत तालुक्यांतील नेरळमध्ये मातृत्वाला काळिमा

# नवजात बालकाला रस्त्यावर सोडुन मातेचे पलायन!



**कर्जत/प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यांत आज सकाळी मातृत्वाला काळिमा फासणारी धक्कादायक आणि तितकीच हृदयद्रावक घटना उघडकीस आला आहे. कर्जत तालुक्यांतील नेरळ परीसरात एका नवजात बालकास रसत्यावर सोडुन एका अज्ञात मातेने पलायन केल्याने प्रंचड खळबळ माजली आहे. ही घटना ग्रामस्थांचा लक्षात निदर्शनास आल्याने याचा पर्दाफाश झाला आहे. या घटनेने मात्र संताप पसरला असुन या नवजात बालकावर रुग्णालयात उपचार सुरु करण्यात आले आहे. या घटने संबघात नेरळ पोलिसांत गुन्हा दाखल करणेत आला आहे.

या बाबत अधिक माहीती अशी की, रायगड जिल्ह्यातील नेरळ येथिल कोमलवाडी परीसरात रस्त्यावर आज सकाळच्या सुमारास एका नागरीकाला रस्त्यावर कोणीतरी लहान बालकाचा रडण्याचा आवाज आल्याने त्या दिशेने हा नागरीक पोहोचला. तेव्हा तेथे रस्त्यावर एक नवजात चिमुकला असल्याचे त्यांचा निदर्शनास आले आहे. तेव्हा या नागरीकाने आपल्या पत्नीस बोलावले, तेव्हा या चिमुकल्यास त्या स्त्रीने उचलून घेवुन नेरळ येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले, मात्र येथे सोयी सुविधा नसल्याने या बालकास येथिल खाजगी लहान बालकांचा रुग्णालयात नेणेत आले होते. येथे उपचार केल्यानंतर या बालकास एमजीएम रुग्णालयात पाठविण्यात येणार असल्याची माहीती नेरळ पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक श्री. तात्या सांवजी यांनी दिली आहे. तसेच हे बालक नवजात असल्याचा निर्वाला येथिल वैद्यकीय तज्ञांनी दिला आहे. जन्मानंतर अजून नीट डोळेही न उघडू शकणारा हा नवजात चिमुकला जन्मताच आनाथ झाला आहे, त्यामुळे सर्वत्र हलहल व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे लग्नांनंतर १० वर्ष उलटुनही मातृत्वाचे सुख नसणाऱ्या एका नवदाम्पत्याने या चिमुकल्याचे पालन पोषण करण्याची तयारीही दर्शविली आहे. येथिल काही ग्रामस्थांचीही तशी मागणी असल्याचे त्या ग्रामस्थांनी सांगितले आहे. त्यामुळे बाल विकास खाते याबाबत काय भुमिका घेते? याकडे लक्ष लागुन आहे.

विशेष म्हणजे कर्जत तालुक्यांतील नेरळ परीसरातील कोमलवाडी हद्दीत नवजात बालकाला निर्दयपणे रस्त्यावर सोडुन देणाऱ्या या मातेचा शोध नेरळ पोलिसांनी घेवुन या मातेला कठोर शिक्षा करण्यात यावी असा संतप्त सुरु काढला जात आहे. तर हे नवजात बालक अनैतिक संबंधांतुन जन्मेल असण्याची शक्यताही काहीजण वर्तवित आहेत. या घटनेने नेरळ परीसरात या निर्दयी माता पिता बद्दल संताप व्यक्त होत आहे. हे नवजात बालक कोणी आणि का रसत्यावर टाकले असावे? याबाबत नेरळ परीसरात तर्क वितर्क लढविले जात आहेत.

दरम्यान या नवजात बालकाचा पालनपोषण करण्याची सर्व जबाबदारी येथे एक अपत्य नसणारे दाम्पत्य घेण्यास तयार असुन या नवजात बालकाला त्यांचा तांब्यात देणेत येते की कसे? याकडेच साऱ्यांचे लक्ष लागुन राहीले आहे. या घटनेचा अधिक तपास नेरळ पोलिस करीत आहेत. नेरळ पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असुन पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या निर्दयी मातेविरोधात भादवि कलम ३१७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेचा अध्क तपास नेरळचे पोलिस उपनिरीक्षक तात्या सांवजी हे करीत आहेत. या घटनेने मात्र नेरळ शहर व परीसर हादरुन गेले आहे. बाल विकासचे कर्मचारीही या घटनेकडे लक्ष ठेवुन आहेत. या बालकावर सध्या दवाखाण्यात उपचार सुरु असुन आता या नवजात बालका संबंधी काय निर्णय होतो? बाल विकास खात्याची भुमिका काय असेन? हे बालक त्या दाम्पत्याकडे सोपविली जाणार की कसे? याची उत्सुकता आता सर्वांना लागुन राहीली असल्याचे दिसुन येत आहे.

# महाराष्ट्र सायबर विभाग लॉकडाऊन काळात ५१५ गुन्हे दाखल; तर २७३ लोकांना अटक

**मुंबई/प्रतिनिधी**

लॉकडाऊनच्या काळात राज्यामध्ये, काही गुन्हेगार व समाजकंटक गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सायबर विभागाने कठोर पाऊले उचलली आहेत. राज्यात सायबर संदर्भात ५१५ गुन्हे दाखल झाले असून २७३ व्यक्तींना अटक केली आहे. अशी माहिती महाराष्ट्र सायबर विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध पोलीस स्टेशन मध्ये एकूण १५१ गुन्ह्यांची (ज्यापैकी ३९ N.C आहेत) नोंद १ जुलै २०२० पर्यंत झाली आहे.

या सर्व गुन्ह्यांचे महाराष्ट्र सायबरने जेव्हा विश्लेषण केले तेव्हा असे निदर्शनास आले की आक्षेपार्ह व्हॉट्सअँप मेसेजेस फॉरवर्ड केल्या प्रकरणी १९७ गुन्हे दाखल झाले आहेत,तर आक्षेपार्ह फेसबुक पोस्ट्स शेअर केल्या प्रकरणी २१४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, ंिळझींझ विडिओ शेअर प्रकरणी २८ गुन्हे दाखल झाले आहेत व ट्विटर द्वारे आक्षेपार्ह ट्विट केल्या प्रकरणी ११ गुन्हे दाखल झाले आहेत, इंस्टाग्रामवरून चुकीच्या पोस्ट टाकल्याप्रकरणी ४ गुन्हे दाखल झाले आहेत .तर अन्य सोशल मीडियाचा (ऑडिओ क्लिप्स, Youtube) गैरवापर केल्या प्रकरणी ६१ गुन्हे दाखल झाले आहेत व त्यामध्ये आतापर्यंत २७३ आरोपींना अटक केली आहे. तर यापैकी १०८ आक्षेपार्ह पोस्ट्स takedown करण्यात यश आले आहे.

जळगाव जिल्ह्यातील बाझारपेठ पोलीस स्टेशनमध्ये एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे त्यामुळे जिल्ह्यातील नोंदणीकृत गुन्ह्यांची संख्या ३५ वर गेली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीने कोरोना महामारीच्या काळात धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट शेयर केली होती व त्यामुळे परिसरातील शांतता भंग होऊन, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकला असता.

सध्याच्या काळात फेसबुक, व्हॉट्सअँप इत्यादी सोशल मिडियावर कोरोना महामारीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, अनेकजण वेगळे उपचार आपल्या भारतीय इतिहासात सांगितले आहेत करून, चुकीची माहिती असणारे मेसेजेस व पोस्ट्स फॉरवर्ड किंवा शेअर करत आहेत. महाराष्ट्र सायबर सर्व नागरिकांना विनंती करते की, कृपया कोणीही अशा मेसेज व पोस्टवर विश्वास ठेवून स्वतःवर किंवा आपल्या घरातील इतरांवर कोणतेही प्रयोग करू नका. तसेच अशा मेसेज मधील माहितीची खातरजमा तज्ज्ञ डॉक्टरांकडून करून घ्या. असे मेसेज फॉरवर्ड करू नये, कारण खोटीं माहिती व अफवा पसरविणे कायद्याने गुन्हा आहे. अशी माहिती महाराष्ट्र सायबर विभागामार्फत देण्यात आली आहे.

## श्रीमती कांताबाई हांडे यांना सेवानिवृत्तीबद्दल निरोप



**लातूर/प्रतिनिधी**

जलसंपदा विभाग लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड कार्यालय उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग क्र.३ लातूर येथे कार्यरत असलेल्या श्रीमती कांताबाई जिजाभाऊ हांडे या मंगळवार, ३० जून रोजी सेवानिवृत्त झाल्याबद्दल श्री विठ्ठलाची प्रतीमा भेट देवून उपकार्यकारी अभियंता योगीराज माने, उपविभागीय अधिकारी सुधाकर कोंगे व शाखा अभियंता नितीन पाटील, श्रीमती अलका लोंढे, स्वाती तपसे यांच्या हस्ते सत्कार करुन भावपूर्ण निरोप देण्यात आला.याप्रसंगी शशीकांत जाधव, मोहन हिप्परगे महाराज, जयकुमार जोशी, सोनकांबळे, जाधव यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## चिकन घेण्याच्या वादातून तरुणांनी केला हवेत गोळीबार

**वसई/प्रतिनिधी**

चिकन विकत घेण्याच्या वादावरून दोन तरुणांनी नकली बंदुकीने विक्रेत्यावर दोन गोळ्या झाडल्या. मात्र यामुळे परिसरात भीती निर्माण होऊन रहिवाशांमध्ये घबराट पसरली. याप्रकरणी दोन आरोपींना माणिकपूर पोलिसांनी अटक केली आहे.

वसई पुर्वेच्या सिताराम बाप्पा नगर येथे ईरफान कुरेशी यांचे चिकन विक्रीचे दुकान आहे. रविवारी रात्री ९ च्या सुमारास तीन तरुण चिकन घेण्यासाठी आले. दुकान बंद करण्याची वेळ होती तरी दुकानदाराने दिड किलो चिकन कापून दिले. मात्र त्या तरुणांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यातून विक्रेते आणि त्या तरुणांमध्ये बाचाबाची झाली. त्यावेळी एका तरुणाने खिशातून चाकू काढला आणि बंदूकीतून दोन गोळ्या हवेत झाडल्या. गोळीबाराचा आवाज ऐकून परिसरात घबराट पसरली आणि लोकं सैरावैरा धावू लागले. माणिकपूर पोलिसांनी या प्रकरणी सचिन सिंग (४५), किरण सकपाळ (३३) आणि जयेश सिंग या तिघांवर धमकावून लुट केल्याप्रकरणी भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३८६ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दोन आरोपींना अटक केली असून एक आरोपी फरार आहे.

दुकानदार आणि काही तरुणांमध्ये वाद सुरू होता. मात्र अचानक गोळीबार झाल्याचा आवाजा झाल्याने आम्हाला काही सुचले नाही आणि आम्ही पळत सुटलो, असे एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले. अशाप्रकारच्या खेळण्याच्या नकली बंदूकीचा वापर गुन्ह्यांसाठी होत असेल तर हा गंभीर प्रकार असून अशा बंदुकीवर बंदी आणायला हवी असे त्याने सांगितले. ही खेळण्यातील नकली बंदूक होती. मात्र त्यातून झाडलेल्या गोळ्यांचा आवाज खरोखरचा वाटल्याने लोकं घाबरले असल्याचे पोलिसांनी सांगितले. एअर गन



किंवा खेळण्याच्या नकली बंदुकीसाठी परवाना लागत नसल्याने अनेक जण ती बाळगतात असेही पोलीस म्हणाले. घटनेला ४८ तास उलटून गेल्यानंतरही खरी बंदुक की खेळण्यातील नकली बंदूक यातील फरक पोलीस सांगू शकले नाहीत.

### रावेरमध्ये टिव्हीएस क्रेडिट फायनांस कंपनीच्या दलालांचा धुमाकुळ

# हप्ते भरूनही ग्राहकांचे मोबाईल केले 'लॉक'

**रावेर/हमीद तडवी**

रावेर तालुक्यात टिव्हीएस क्रेडिट फायनांस कंपनीच्या दलालांचा धुमाकुळ सुरु असुन तालुक्यात काही नागरिकांनी ५००० ते ६००० रुपये डाऊन पेमेंट भरुन ईएमआयवर सँमसंग कंपनीचे मोबाईल घेतले आहेत आणि लॉकडाऊन काळात आरबीआयने ईएमआयची स्थगिती दिली होती. तरीही काही टिव्हीएस ग्राहकांनी ईएमआय हप्ते भरले आहेत. माञ ईएमआयचे हप्ते भरुन सुद्धा टिव्हीएस क्रेडीट फायनांस कंपनीने ग्राहकांचे मोबाईल लॉक केले आहेत व या ग्राहकांची दिशाभुल करुन ईएमआयचे हप्ते पँनल्टी सहित वसुल करण्याचा धंदा सुरु आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक या टिव्हीएस क्रेडिट कंपनीकडुन ईएमआयवर मोबाईल घेऊन खुप मोठ्या संकटात सापडला आहे. म्हणजेच या ग्राहकांची अवस्था इकडे आड, तिकडे विहीर अशी अवस्था पाहावयास मिळत आहे आणि तालुक्यात टिव्हीएस क्रेडीट कंपनीच्या एजंटांचा हप्ता वसुली धुमाकुळ सुरु आहे. ग्राहकांनी हप्ते भरुन ग्राहक म्हणतो आमचे मोबाईल तर सुरु करा? अशा कंपनीच्या एजंटांकडे वारंवार विनवण्याकरुन देखील टिव्हीएस क्रेडिट फायनांस कंपनीने धुमाकुळ घातला आहे आणि ईएमआय भरलेल्या ग्राहकांचे मोबाईल अजुनही ३ ते ४ महिन्यांपासुन लॉक केले आहेत, ते मोबाईल केव्हा अनलॉक होतील याची मात्र रावेर तालुक्यातील ग्राहक आतुरतेने व मोठ्या आशेने वाट बघत आहेत. तसेच या टिव्हीएस क्रेडीट कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे टिव्हीएस ग्राहकांमधे नाराजीची व संतापाची लाट पसरल्याचे चित्र रावेर तालुक्यातील नागरिकांमधे दिसत आहे. त्याचबरोबर सुरवातीला जेव्हा ही टिव्हीएस क्रेडिट कंपनी रावेर तालुक्यात आली तेव्हा या कंपनीने जाहिरात बाजी करुन ग्राहकांना आकर्षित केले. तेव्हा नवीन कंपनी पाहुन बऱ्याच मोबाईल शॉपी डिलरांनी ग्राहकांना टिव्हीएस क्रेडिट कंपनीकडे वळवुन त्या




ग्राहकांना मोठ्या ब्रँडेट कंपनीचा मोबाईल मोठ्या किमतीचा मोबाईल साधारण १८ हजार रुपयांपासुन पुढे अशा मोठ्या किंमतीचे मोबाईल सर्वसामान्य नागरिकांना घेण्यास भाग पाडले आहेत. तसेच रावेर तालुक्यातील जनतेकडुन असेही ऐकवण्यास मिळत आहे, की आम्ही ईएमआयवर घेतलेले मोबाईल जर हप्ते भरल्यावरही सुरु केले नाही तर आम्ही मोबाईल मोबाईल फोडुन टाकु, तोडुन टाकु, नाहीतर आम्ही भरलेले डाऊनपेंमेंट व हप्ते आम्हा ग्राहकांना परत द्यावे? अशीही चर्चा तालुक्यात ऐकवण्यास मिळत आहे. तसेच या संपुर्ण प्रकाराकडे संबधित विभागाने व टिव्हीएस कंपनीच्या संबधित अधिकारी कर्मचाऱ्यांनी यांनी गांभीर्याने लक्ष देऊन ईएमएआय मोबाईल लॉक बाबतीत ग्राहकांना योग्य ती सेवा पुरवावी. अशी रास्त स्वरुपाची मागणी तालुक्यातील जनतेकडुन व ग्राहकांकडुन करण्यात आली आहे.

# कामगारांच्या विविध मागण्यासाठी भिवंडीत प्रांत कार्यालयाबाहेर निदर्शने




**भिवंडी/प्रतिनिधी**

कोरोना विषाणू मुळे कोणतेही नियोजन न करता संपूर्ण देशभरात २५ मार्च पासून लॉकडाऊन घोषित करून संपूर्ण देश आर्थिक संकटाच्या खाईत लोटण्याचे काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले असून या लॉकडाऊन काळात उद्योग व्यवसाय बंद पडल्याने लाखो कामगार कष्टकरी जनतेवर उपासमारीची वेळ आली असून त्यासाठी केंद्र सरकारने आयकर लागू नसलेल्या गरीब कुटुंबियांना तात्काळ दहा हजार रुपयांची मदत करावी. प्रत्येक व्यक्ती मागे दहा किलो धान्य मोफत द्यावे, मनरेगाची कामे किमान २०० दिवस उपलब्ध करून द्यावीत, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी रद्द करावी, पेट्रोल डिझेलची दरवाढ तात्काळ थांबवावी अशा विविध मागण्यासाठी सिटू या केंद्रीय समितीच्या नेतृत्वाखालील लालबावटा पॉवर लूम कामगार व बिडी कामगार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कॉम्रेड सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालय बाहेर सोशल डिस्टेनसिंग पळत तोंडाला मास्क हातात हातमोजे घालून हे आंदोलन केले. त्यानंतर आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदार शशिकांत गायकवाड यांना सुपूर्द केले.



06 TO 12 JULY 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 04/07/2020 7:17 PM Page 1



# कोरोनग्रस्तांचे मारेकरी ड्रग माफिया

जगात विज्ञानाने आज इतकी प्रगती केलीय की कोणत्याही क्षेत्रात माणसाला काहीच अशक्य नाही. सुई पासून अवजड अशा बोईंग विमनापर्यंत माणसाच्या गरजेच्या सर्व वस्तू माणसाने बनवल्यात. त्याचबरोबर साध्या सर्दी-खोकल्यापासून ते कॅन्सरसारख्या असाध्य रोगापर्यंत सर्व प्रकारच्या रोगांवर रोग प्रतिबंधक औषधे शोधण्यात विज्ञान युगातील माणसाला यश आले आहे. माणूस चंद्रासारख्या परग्रहावर जाऊन पोहचला. एवढी माणसाने प्रगती केलेली असताना जगातल्या लाखो शास्त्रज्ञांना कोरोनाची लस सापडू शकली नाही, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. जवळपास ५ महिने उलटून गेले तरीही कोरोनावर औषध सापडत नाही यावर काहीतरी भयंकर मोठे कारस्थान किंवा मोठे जागतिक राजकारण असावे असा आता संशय यायला लागलाय. कदाचित या मागे ड्रग माफिया असावेत असे आता वाटायला लागले. कारण आज जगात कोरोनाग्रस्तांची संख्या १ कोटी ५ लाख इतकी झाली आहे. त्यामुळे कोरोनाच्या औषधाला उशीर होईल तितका ड्रग माफियांना फायदा आहे. कारण आजवर जितका पैसा या लोकांनी इतर औषध विक्री मधून कमावला नसेल त्याच्या १०० पट पैसा या कोरोनाच्या औषधातून त्यांना कमवायचा आहे आणि म्हणूनच कोरोनाचे औषध मार्केट मध्ये लवकर येवू नये असे त्यांना वाटतेय. कारण जेवढा उशीर होईल तेवढी त्या औषधाची किंमत जास्तीत जास्त वाढवता येईल, असे त्यांचे व्यावसायिक गणित आहे. अर्थात हा प्रकार म्हणजे प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार आहे. पण जे संकटात संधी शोधणारे असतात त्यांच्यासाठी संकटे हा तर कमाईचा विषय असतो आणि संपूर्ण जगात ड्रग माफिया लोकांची संघटना इतकी स्ट्राँग आहे की जगातले कुठलेही सरकार त्यांचे काहीच वाकडे करू शकत नाही. या ड्रग माफियांना डब्ल्यूएचओ म्हणजेच वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन या जागतिक आरोग्य संघटने छुपा पाठिंबा असावा असे आता वाटायला लागले आहे. कारण कोरोना वरचे औषध लवकर निघणार नाही असे जागतिक आरोग्य संघटनेने दोन महिन्यापूर्वीच सांगितले होते. त्यामुळे ड्रग माफिया आणि जागतिक आरोग्य संघटना यांचे कुठेतरी साटेलोटे असण्याची शक्यता आहे. संपूर्ण जगात कोरोनाने ४ लाखांहून अधिक बळी घेतले आहेत. एकट्या भारता पुरते जरी बोलायचे झाल्यास भारतात कोरोणानें १९ हजार लोकांचा जीव घेतलाय, तर ६ लाखांहून अधिक कोरोना बाधित आहेत. पण अजून कोरोनाची लस मार्केटमध्ये आलेली नाही आणि आणखी किती काळ येणार नाही याचीही कुणालाही कल्पना नाही. आज कोरोना बाबत बोलायचे झाल्यास कोरोना वरील औषधाची जगाला तातडीची गरज आहे, अशावेळी जर कुणी आयुर्वेदाच्या माध्यमातून कोरोनावर औषध शोधले असेल तर त्याचे आवश्यक ते निकष तपासून त्याला परवानगी द्यायला हवी. पण पतंजलीच्या कोरॉनील या कोरोनावरील औषधाचा मार्ग रोखण्यात आला. अर्थात रामदेव बाबांची विश्वसनीयता संशयास्पद असल्याने त्यांच्या पतंजलीने बनवलेले औषध किती परिणामकारक आहे हा संशोधनाचा विषय आहे. पण रामदेव बाबांनी जे आरोप केले आहेत ते गंभीर आहेत. त्यांच्या म्हणणं नुसार आपण कोरोनावर जे औषध आणले ते खूप परिणामकारक आहे आणि तीन ते सात दिवसात कोरोना बाधित बरा होऊ शकतो, पण मल्टी नॅशनल औषध कंपन्यांनी एकत्र येवुन आपल्या तिजोऱ्या भरण्यासाठी पतंजलीच्या औषधाला विरोध केला आहे. रामदेवबाबांच्या या आरोपात जर तथ्य असेल तर ती एक खरोखरच गंभीर बाब असून जगातील सगळ्याच देशांनी याची चौकशी करणे गरजेचे आहे. कोरोना व्हायरस चीनच्या लष्करी लॅब मधून हेतुपुरस्सर वेल प्लॅन लीक करण्यात आला ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. म्हणून तर संपूर्ण जग आज चीनच्या विरोधात युद्धासाठी सज्ज आहे, पण चीनने जरी कोरोना व्हायरस बनवून लिक केलेला असला तरी त्यावर औषध सुद्धा त्यांनी शोधलेले असणार आणि हे औषध मल्टी नॅशनल ड्रग कंपन्यांच्या मार्फत जगात आणून अब्जावधी रुपये कमावण्याची योजनाही चीनचीच असणार आणि याच कारस्थनाचा जगाने शोध घेणे गरजेचे आहे. जगात कोरोनाचे औषध लवकर येवू नये आणि जगातील सर्व देश कोरोनाचा औषधासाठी वाटेल तेवढी किंमत द्यायला मजबूर होतील अशी परिस्थिती निर्माण करणारी ड्रग माफियाची एक मोठी साखळी सध्या जगात सक्रिय आहे आणि या साखळीनेच कोरोनाच्या औषधाचा मार्ग रोखून धरले आहे. त्यामुळे जोवर ड्रग माफियांच्या या साखळीचा शोध लागत नाही आणि ही साखळी तुटत नाही तोवर कोरोना प्रतिबंधक लस मार्केटमध्ये येणार नाही आणि लाखो कोरोनाग्रस्तांचे प्राणही वाचणार नाहीत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या अमेरिका आणि इटलीत कोरोनाचा सर्वाधिक प्रभाव जाणवला ते दोन्ही देश वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत पुढारलेले देश म्हणून ओळखले जातात असे असतानाही तिथल्या संशोधकांना कोरोनावर औषध शोधण्यात यश आलेले नाही आणि हीच बाब माणसाला खटकणारी आहे यात कुठेतरी काहीतरी पाणी मुरते आहे आणि त्याचा शोध घेणे ऐवजी जग भलतीकडेच भरकटत चालली आहे. आजवर कुठल्याही संसर्गजन्य रोगाने १ कोटी लोकांना संक्रमित केले नव्हते. त्यामुळे कोरोना हे संकट किती भीषण आहे याची जगातील प्रत्येक राज्यकर्त्यांना जाणीव असायला हवी. कारण कोरोनाने केवळ माणसेच मारलेली नाहीत तर संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था उध्वस्त करून टाकली आहे. जगात बेरोजगारी आणि महागाई वाढवली आहे. त्यामुळे हे संकट टाळण्यासाठी कोरोनावर लवकरात लवकर प्रतिबंधक औषध सापडणे गरजेचे आहे. अन्यथा जगाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे या परिस्थितीला चीन इतकाच आणखी जे कोण जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही औषधांचा काळाबाजार करणारे हे मानवतेचे शत्रू आहेत. त्यामुळे कोरोना वर औषध उपलब्ध झालेले असेल पण केवळ भरमसाठ किंमत वाढवून त्याचा काळाबाजार करण्यासाठीच जर कुणी ते औषध इतक्यात मार्केटमध्ये यायला देत नसतील तर त्यांना जगण्याचा अधिकार नाही. अशा लोकांना ठार मारून त्यांचे हे भयंकर कारस्थान जगाने उलथवून टाकावे. त्याच बरोबर कोरोनाचा जन्मदाता असलेल्या चीनला आता जगाच्या नकाशावरून नष्ट करणे हीच काळाची खरी गरज आहे.

# तीन तिघाडा काम बिघाडा!



**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

राजकारण हा आता निर्लज्ज लोकांचा एक अड्डा बनला आहे आणि राजकारणाचे हे व्यसन दारू आणि अमली पदार्थाच्या व्यसनापेक्षाही भयंकर आहे. त्यामुळे राजकारण्यांना राजकारण करण्यासाठी वेळ, काळ, संकटे, आपत्ती या पैकी कशाचेही भान नसते. सध्या जगात काय चालले आहे आणि आमचे राजकारणी काय करतायत हे पाहिल्यावर हसावे की यांच्या नावाने रडावे हेच कळत नाही. आज संपूर्ण महाराष्ट्र कोरोनाच्या विळख्यात आहे. कोरोना रुग्णांची संख्या इतकी वाढत चालली आहे की नव्या रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये बेड शिल्लक नाहीत आणि लोकांच्या याच अडचणीचा फायदा खाजगी रुग्णालये घेत असून या संकटाच्या काळात अक्षरशः लोकांचे गळे कापत आहेत. गेल्या तीन महिन्यापासून लॉकडाऊनच्या काळात माणूस घरात अडकून पडलाय, त्यांच्याकडे अन्न खायला पैसे नाहीत आणि अशा माणसांकडून खाजगी रुग्णालये लाखो रुपये उकळण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या सगळ्या गोष्टींकडे लक्ष देवून लोकांची या दुष्टचक्रातून सुटका करायची सोडून सत्ताधारी आणि विरोधक आपआपल्या राजकारणात व्यस्त आहेत. जणू काही पूर्वीचीच परिस्थिती आहे असे त्यांना वाटतेय. आता काय म्हणावे या लोकांना? महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या महविकास आघाडीचे सरकार आहे. हे सरकार बनवताना तब्बल दोन महिने जो राजकीय तमाशा महाराष्ट्राच्या जनतेने पहिला त्यापुढे काळू बाळू आणि विठाबाई नारायण गावकर यांचाही तमाशा फिका होता. त्यानंतर वाटले होते हळूहळू सर्व काही ठीक होईल, पण कसले काय तीन तिघाडा आणि काम बिघाडा! असाच प्रकार आता बघायला मिळत आहे. कारण काही दिवसांपूर्वी विधान परिषदेच्या ९ जागांवरून आघाडीत जी ठिणगी पडली होती ती विजलेली नव्हती.

त्यामुळे आग धुमसत होती आणि आता ही आग हळूहळू पसरत चालली आहे. कारण आतापर्यंत शिवसेनेवर फक्त काँग्रेस नाराज होती, पण आता राष्ट्रवादी सुद्धा नाराज आहे. कारण लॉकडाऊन वाढवण्याचा निर्णय घेताना मुख्यमंत्र्यांनी म्हणे राष्ट्रवादीला विश्वासात घेतले नाही. वास्तविक सरकार तीन पक्षाचे असल्याने जनतेच्या दैनंदिनी जीवनाशी संबंधित असलेले कोणतेही मोठे निर्णय घेताना आघाडीतील तिन्ही पक्षांनी एकत्रितपणे चर्चा करूनच निर्णय घ्यायला हवेत. पण सत्तेसाठी जेंव्हा अशा तकलादू आघाड्या अस्तित्वात येतात तेंव्हा प्रत्येक पक्षाला स्वतःचे राजकारण साधायचे असते. मग अशावेळी जरी एखाद्या विषयाबाबत चर्चा झाली आणि अशा चर्चेमध्ये नाराजीचे सूर उमटले तरी मग घेतलेला निर्णय कोणाच्या पचनी पडत नाही. लॉकडाऊन सतत वाढवण्यास जनतेचा ठाम विरोध आहे. कारण या सततच्या लॉकडाऊनमुळे लोकांचा कामधंदा गेलाय. त्यामुळे लोकांवर उपासमारीची पाळी आलीय, अशावेळी सरकारही मदत करायला तयार नाही आणि सरकार मदत तरी कुठून करणार? सरकारचीच तिजोरी रिकामी आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार कपात करण्याची सरकारवर वेळ आलीय. केवळ वैद्यकीय क्षेत्रातील लोकांनाच या महिन्याचा पगार मिळणार आहे आणि याला कारणीभूत आहे. सरकारच लॉकडाऊन बाबतचा चुकीचं धोरण! लॉकडाऊनमुळे गेल्या तीन महिन्यांपासून उद्योगधंदे बंद आहेत. अशावेळी सरकारला महसूल कुठून मिळणार? आणि महसूल मिळाला नाही तर सरकार चालवणार कसे? कोरोनाच्या भीतीने किती दिवस लोकांना घरात डांबून ठेवणार आहात? सरकार सांगतेय की अर्थचक्र सुरू करण्यासाठी ५० हजार उद्योग धंदे सुरू करायला परवानगी दिलीय. अरे पण हे उद्योग धंदे कामगारांशिवाय सुरू होतील का? तुम्ही एकीकडे उद्योगधंदे सुरू करीत असल्याचे सांगताय आणि दुसरीकडे सार्वजनिक परिवहन सेवा बंद करून ठेवलीत. मग विरारला राहणारा माणूस चर्चगेटला काय चालत कामाला जाईल? आणि आता लॉकडाऊनचा हाच विषय महाविकास आघाडीत मतभेदाचे कारण ठरतोय. कारण लॉकडाऊनमुळे लोक इतके चिडलेत की चहू कडून आघाडीतल्या नेत्यांवर जोडे पडायला लागले आहेत. त्यामुळे आपआपली चामडी वाचवण्यासाठी हे लोक आता एकमेकांकडे बोट दाखवायला लागले आहेत ही आहे आजची महाराष्ट्राची राजकीय स्थिती! लोक आज नोकरी धंद्याच्या चिंतेत आहेत आणि सत्तेतले राजकारणी खुर्च्या टिकवण्यासाठी चिंतेत आहेत आणि अशा लोकांच्या भरोश्यावर महाराष्ट्रातील जनता कोरोना मुक्त होण्याची वाट बघतेय. पण हे लोक खरोखरच लोकांना कोरोनाच्या संकटातून वाचवतील का? आणि समजा भलेही आज कोरोनाच्या संकटातून माणूस वाचला तर समोर जे भयानक बेरोजगारी आणि प्रचंड महागाईचे संकट उभे राहणार आहे त्यातून कसे वाचणार? कोरोनाच्या या संकट काळात सुद्धा महाराष्ट्रात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे जे घाणेरडे राजकारण सुरू आहे त्याचा लोकांना वीट आलाय. कारण या लोकांच्या राजकारणात सामान्य माणसाचे जगण्या मरण्याचे मुख्य प्रश्न बाजूलाच राहिलेत. बरे लोकशाहीत जर सत्ताधारी पक्ष बेजबाबदारपणे वागत असेल तर त्यावर अंकुश लावण्याचे काम विरोधी पक्षाचे असते, पण आज विरोधी पक्षालाही त्यांच्या जबाबदारीचे भान राहिलेले नाही. म्हणून तर लॉकडाऊन असताना त्यांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबला त्यांना एवढं तरी कळायला हवं होत की कोणत्याही आंदोलनासाठी गर्दी जमवावी लागते. त्यासाठी लोकांची गरज असते, पण लोकांना तर घरात कोंडून ठेवण्यात आले आहे मग लोक आंदोलनासाठी बाहेर येतील कसे? आणि जरी बाहेर आले तरी सोशल डिस्टसिंगचे बंधन त्यांना पाळता येईल का? आणि हे सगळ ठावूक असतानाही विरोधी पक्ष जर आंदोलन करीत असेल तर काय म्हणावे अशा विरोधी पक्षाल? महाराष्ट्रासारख्या पुरोगामी वैचारिक दृष्ट्या प्रगत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात आज सत्ताधारी पक्ष ही सक्षम नाही, विरोधी पक्षाला ही जबाबदारीने वागणे जमलेले नाही आणि हीच या महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेची शोकांतिका आहे.

# कृषी क्षेत्रात वसंतराव नाईक यांचे अमुल्य योगदान!

**पालघर/प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी अन्नधान्याच्या बाबतीत राज्याला स्वयंपुर्ण बनवले असून त्यांच्या प्रयत्नाने राज्यात धवलक्रांती घडली आहे. कृषीक्षेत्रासाठी विविध योजना राबवून शेतकरी बांधवांना स्वयंपुर्ण बनवले असून कृषी क्षेत्रात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे अमुल्य योगदान असल्याचे जिल्हा माहिती अधिकारी राहुल भालेराव यांनी सांगितले. वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ येथे वसंतराव नाईक यांच्या जन्म दिनानिमित्त कृषी दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी राहुल भालेराव बोलत होते.



अन्नधान्याच्या समस्येवर, व संकटावर मात करण्यासाठी त्यांनी 'जय जवान जय किसान' असा नारा देऊन महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत त्यांनी स्वयंपूर्ण करून दाखवला. शेतकऱ्यांना हायब्रीड बियाणे उपलब्ध करून दिले. कापूस एकाधिकार योजना राबविली. महाराष्ट्र दुधाची गरज पूर्ण करण्यासाठी गुजरात वर अवलंबून होता. त्यावर मात करण्यासाठी वसंतरावांनी कृषिमंत्री बाळासाहेब सावंत यांच्या मदतीने संकरित गाईंची खरेदी केली आणि दुग्धोत्पादनासाठी शेतकऱ्याना बँकेकडून कर्ज उपलब्ध करून दिले. त्यांच्या या प्रयत्नामुळे, अल्पावधीतच महाराष्ट्रात धवलक्रांती घडुन आली. शेतीला आधुनिक स्वरूप देण्यासाठी त्यांनी कृषी विद्यापीठाची स्थापना केली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, मराठवाडा कृषी विद्यापीठ, कोकण कृषी विद्यापीठ या विद्यापीठांतील संशोधनामुळे महाराष्ट्राच्या कृषी विषयक ध्येयधोरणात वसंतरावांच्या काळात आमूलाग्र बदल घडून आला. उजनी, जायकवाडी, चासकमान, पेंच, अप्पर वर्धा, धोम ही धरणे आणि पारस, खापरखेडा, कोराडी भुसावळ ही औष्णिक विद्युत प्रकल्प वसंतराव नाईक यांच्या प्रयत्नातूनच उभी राहिली. विकासासाठी आवश्यक असणाऱ्या वीज आणि पाणी या मूलभूत गरजांची त्यांनी सोय केली. 'पाणी अडवा - पाणी जिरवा' ही योजना त्यांच्याच काळातील. दुष्काळावर मात करण्यासाठी वि. स. पागे यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेली रोजगार हमी योजना वसंतरावांनी उचलून धरली. १९७२ च्या दुष्काळात जलसंधारणाची मोठ्या प्रमाणात कामे रोजगार हमी योजने अंतर्गत करण्यात आली. पुढे केंद्राने देखील या योजनेची दखल घेऊन महात्मा गांधी रोजगार हमी योजना म्हणून हि योजना देशभरात राबविली जात असल्याचे राहुल भालेराव यांनी सांगितले.

मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी वसंतरावांची महत्त्वाची भुमीका होती. महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पंचायत राज समितीचे अध्यक्षपद वसंतराव नाईक यांच्याकडे होते. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी केलेल्या पंचायत राज विषयीच्या शिफारशीनुसारच आजच्या जिल्हापरिषद, पंचायत समिती चा कारभार चालू असल्याचे राहुल भालेराव यांनी सांगितले. कृषी क्षेत्रा विषयी अत्यंत आवड असल्यामुळे नाईक यांच्या प्रयत्नामुळे १५ लाख टन धान्य अधिक उत्पादन वाढले. त्यातून दि. १९ एप्रिल १९६९ साली पंजाबराव कृषी विद्यालयाची स्थापना करुन शेतकी व्यवसायात भर टाकण्यात मदत केली. १० मे १९६८ रोजी गुन्हेगारांना मुक्त जगता, यावे यासाठी पहिले खुले कारागृह पैठण येथे स्थापन केले व गुन्हेगारांना माणूस म्हणून जगण्यास मार्ग दाखविला. सन १९७० साली शहरी जीवनात वाढ व्हावी, गोरगरीब मध्यमवर्गीयांना शहरात नौकरी करता यावी, शासनातर्फे लोकांच्या मदतीला हातभार लागावा म्हणून सिडकोची स्थापना केली. त्यातून लोकांना निवारा मिळाला असे राहुल भालेराव यांनी सांगितले.

कृषी दिनानिमित्त वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या ज्योती कांबळे यांनी महामंडळाच्या कार्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि भटके विमुक्त जनजाती विकास परिषदेचे कार्याध्यक्ष रवि राठोड, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे लालजी अटारा, महिला व बालविकास विभागाच्या डिम्पल पाटील, राष्ट्रीय बंजारा टायगर्स चे राहुल चव्हाण, जिल्हा माहिती कार्यालयातील गंगाधर जामनिक, लौकिक जाधव, योगेश गायकवाड, बाबु पवार, राजीराम कोरडा, चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळाच्या नेहा पाटील, समाज कल्याण विभागाचे रमेश राठोड, बंजारा समाज संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुभाष राठोड आदि उपस्थित होते.

# बेरोजगार युवक व युवतींसाठी ऑनलाईन रोजगार मेळावा

## पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध -जिल्हाधिकारी

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात परप्रांतीय व महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील कामगार आपल्या राज्यात परत स्थलांतरीत झाले आहे. या मुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले. जल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रा मार्फत बेरोजगार युवक युवतींसाठी ऑनलाईन रोजगार मेळाव्याची सुवर्णसंधी पालघर जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात परप्रांतीय व महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील कामगार आपल्या राज्यात परत स्थलांतरीत झाले आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील सुरु झालेल्या औद्योगिक कंपन्यांना मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष कौशल्य विकास कार्यकारी समिती पालघर जिल्हा यांच्या सुचनेनुसार जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर या कार्यालयाच्या वतीने नोकरी इच्छुक बेरोजगार युवक-युवतींसाठी ऑनलाईन रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून, पालघर जिल्ह्यातील नामांकित आस्थापना/कंपन्यांमधील विविध प्रकारच्या रिक्त पदांव्दारे मोठी सुवर्णसंधी निर्माण झालेली आहे. नोकरीसाठी इच्छुक बेरोजगार उमेदवारांनी या विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेब पोर्टलवर आपली आधार लिंक नाव नोंदणी करावी, त्यामध्ये अद्यावत मोबाईल नं. ई-मेल व शैक्षणिक पात्रता तसेच अनुभवाची नोंद करावी व ज्यांनी यापूर्वी नोंदणी केली असेल त्यांनी वरील गोष्टी अद्यावत कराव्यात असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले.

जिल्ह्यातील विविध खाजगी आस्थापनांवरील रिक्त असलेल्या जागांवर नोकरीची संधी प्राप्त होऊ शकते. या ऑनलाईन मेळाव्यांतर्गत पालघर जिल्ह्यातील विविध उद्योजकांकडील सर्वसाधारणपणे ITI Turner, Fitter, Welder come Fitter, Helper, Electrical, Refrigeration, Mechanical, Items Machinist, microbiology, B.Sc chemistry, QC Microbiologist Officer, CNC Operator Chemist Pharmacist या पदासाठी आवश्यक ती पात्रताधारक तसेच B.Pharm. M.Pharm, B.Sc Chemistry. M.Sc Diploma/Degree in Mechanical उमेदवारांसाठी १२०० पेक्षा अधिक रिक्तपदे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सदरच्या ऑनलाईन मेळाव्यामध्ये सहभाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबासाईटवर नोंदवीलेल्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड ने लॉगीन करावे व पंडित दिनदयाल उपादध्याय रोजगार मेळावा यावर क्लिक करुन पालघर जिल्हा निवडून उपलब्ध कंपनीला अप्लाय करावे (Employment->.Job seeker-> jobseeker login with Registration no. & Password -> Pandit Dindayal Upadhyay Job Fair->District Palghar->(View Job Fair Details)Vacancy Listing (View Company Vacancies) -> Click on I Agree ->Apply for suitable Vacancies). सदर मेळाव्यामध्ये उमेदवार एकापेक्षा जास्त कंपर्नीचा पर्याय निवडू शकतो, ऑनलाईन सहभागी असलेल्या कंपनीला वरील पध्दतीने पसंतीक्रमानुसार अर्ज केलेल्या उमेदवारांना उद्योजकांच्या सोईनुसार त्यांच्या मुलाखतीचे ठिकाण दिनांक व वेळ एसएमएस अलर्टव्दारे किंवा ई-मेल व्दारे कळविण्यात येईल व शक्य असेल तिथे ऑफलाईन किंवा ऑनलाईन मुलाखतींचे आयोजन करण्यात येईल. तरी इच्छुक युवक व युवतींनी दिनांक ०४ जूलै २०२० पर्यंत अर्ज करावे. तसेच स्वत: बद्दलची माहिती संबंधित वेब पोर्टलवर अद्ययावत करताना काही अडचण उद्भवल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, या कार्यालयाच्या दूरध्वनी क्र.७०५८४३५७१४ किंवा या कार्यालयाचे ईमेल-palgharrojgargmail.com वर संपर्क साधावा आणि या संधीचा जास्तीत जास्त बेरोजगार युवक युवतींनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

06 TO 12 JULY 2020 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 04/07/2020 7:18 PM Page 1



## देवणीच्या एसबीआय बँकेत एक महिन्यापासुन मॅनेजरचे पद रिक्त

# पिक कर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ



**देवणी/शकिल मनियार**

तालुक्यात स्टेट बँक ऑफ इंडियाची एकच शाखा देवणी शहरात आहे. तालुक्यातील ५६ गावचा अर्थिक व्यवहार याच बँकेशी निगडित आहे. कोरोना १९ या महामारीमुळे शासनाने चार महिन्यापासुन देशभरात लॉकडाऊन केल्याने शेतकरी व व्यावसायिकांना आर्थिक अडचणीला समोरे जावे लागत असल्याने सध्या पावसाळा चालू झाल्याने शेतकऱ्यांना खते व बि बियाणे घेण्यासाठी शासनस्तरावुन शेतकऱ्यांना पिक कर्जे ताबडतोब देण्यात यावे. शेतकऱ्यांची कसल्याच प्रकारची हाल अपेष्टा होता कामा नये. तसेच छोटया मोठ्या व्यावसायीकांना कर्ज देण्यात यावे असे सक्त आदेश शासनस्तरावुन वांरवार देऊन देखील देवणी येथील एसबीआय बँकेचे शाखा अधिकारी (मँनेजर) यांचे पद गेल्या एक महिन्यापासून रिक्त असल्याने शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी, तर छोट्या मोठ्या व्यावसायिकांना कर्ज घेण्यासाठी बँकेत दररोज हेलपाटे मारावे लागत आहे. पिककर्ज व व्यवसाय कर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांची व व्यावसायींकाची मोठ्या प्रमाणात तारांबळ होत आहे. त्यातच कहर म्हणून बँकेने दरवाजे बंद करून घेऊन बँकेचे व्यवहार सेवकामार्फत व वॉचमन कडुन खिडकीतून करून घेतले जात असल्याने नागरीकांतुन तीव्र संताप व्यक्त केले जात आहे. रेड झोनमध्ये आलेल्या तालुक्यात बँकेचे दरवाजे खुले ठेवून व्यवहार केले जात आहे. मात्र देवणी तालुका ग्रीनझोनमध्ये आसतानाही येथील बँकेचे कर्मचारी बँकेचे दरवाजे बंद करून खिडकीतून सेवक व वाचमनतर्फे व्यवहार करून घेतले जात आहे. तरी संबंधित प्रशासन व जिल्हाअधिकारी जि श्रीकांत व लातुरचे पालकमंत्री अमित देशमुख यांनी वेळीच लक्ष घालुन शाखा अधिकारी यांचे रिक्त पद लवकरच भरण्यात यावे तसेच ग्राहकांना कसल्याच प्रकारची अडचण होणार नाही याच्या सुचना संबंधित बँकेला देण्यात याव्यात अशी मागणी देवणी तालुक्यातील जनतेतुन होत आहे.

# पतीसमोर पत्नीवर आळीपाळीने केला, बलात्कार, सहा नराधमांना अटक

**वर्धा/प्रतिनिधी**



सेलू तालुक्यातील सिंदी रेल्वे येथील विवाहित महिलेला नौकरीचे आमीष दिले, नंतर पतीला धमकी देत पतीसामोर पत्नीवर सहा आरोपींनी आळीपाळीने बलात्कार केल्याची घटना सेलसुरा येथील शेतात असलेल्या फार्महाऊसवर घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंदी रेल्वे येथील दाम्पत्य लॉकडाऊनमुळे अडचणीत होते. त्यांना काम नसल्यामुळे अनेक जणांकडे कामाची विचारणा करीत होते. अशातच त्यांना नोकरी असल्याचे सांगितले, पती-पत्नी दोघांनाही सावंगी मेघे येथे मुलाखत घेण्यासाठी बोलाविण्यात आले. आरोपींनी मुलाखत न घेता फार्महाऊसवर काम असल्याचे कारण पुढे करीत त्या दोघांना सेलसुरा येथे नेले. तिते, पीडित महिलेच्या पतीला बाहेर थांबवित महिलेला मुलाखती करिता आत घेण्यात आले. त्यातील एका आरोपीने महिलेसोबत अश्लील चाळे करण्यास सुरुवात केली असल्याचे पीडित महिलेच्या पतीला समजताच पतीने आत जाण्याचा प्रयत्न केला. यानंतर, त्याला बांधून मारण्याची धमकी देत त्या विवाहित महिलेवर सहा आरोपींनी आळीपाळीने बलात्कार केला. आरोपींनी बलात्कारानंतर घटनास्थळावरुन पळ काढला. पीडित महिला व तिच्या पतीने सर्व घडलेली माहिती देवळी पोलिसांना सांगितली.

घटना ऐकल्यानंतर पोलिस सुद्धा अचंबीत झाले. देवळी पोलिसांनी सावंगी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार देण्याचे सांगताच दोघांनीही सावंगी पोलिस स्टेशन गाठले. याप्रकरणी सहा आरोपींविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली. देवळी व सावंगी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करीत तपासाला गती देताच आरोपींना रविवार (दि २८) जून रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास पकडण्यात आले. याप्रकरणी शेखर सुरेश चंदनखेडे (वय २४, रा पवनार), लोकेश उर्फ अभिजत गजानन इंगोले (वय २४ रा तुकाराम वार्ड वर्धा), होमराज बाबाराव भोयर (वय ३९ रा धारपुरे लेआऊट सिंदी मेघे), पनींदाकुमार श्रीनिवास बलवा (वय २६ रा सिंदी मेघे), नितीन मारोतराव चावरे (वय २७ रा खरांगणा गोडे) व राहुल बनराज गाडगे (वय २८ रा खरांगणा गोडे) या सहा आरोपींना ताब्यात घेत कलम ३७६ (ड)अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला असून, २ जुलैपर्यत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. सदर कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी पीयूष जगताप यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक रेवचंद शिंगणजुडे, यांच्या सह पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आहे.

# नालासोपाऱ्यात टॅक्सीवरून अंत्ययात्रा, हृदय पिळवटून टाकणारी घटना

**नालासोपारा/प्रतिनिधी**

त्याने जगाचा निरोप घेतला मात्र मृत्यूनंतरही परवड थांबली नाही रुग्णवाहिकेची कोरोना महामारीत सुरु असलेली लूट आणि कुटुंबीयांकडे पैशाची असलेली कमतरता पाहता थेट एका टॅक्सीच्या टपावर तिरडी बांधून त्यावर मृतदेह ठेवत स्मशानभूमीत आणून अत्यंसंस्कार करण्यात आले ही हृदयाला पिळवटून टाकणारी घटना नालासोपारा पूर्व येथे घडली आहे.



नालासोपाऱ्यात राहणाऱ्या एका इसमाचा मृत्यू रविवारी झाला.घरच्यांची रुग्णवाहिकेशी संपर्क साधला मात्र अव्वाच्या अव्वा पैसे मागितले असल्याने नकार दिला. एकीकडे कोसळलेला दुः खाचा डोंगर आणि त्यात अंत्यसंस्कारासाठी मृतदेह नेण्यात येणारी अडचण समोर होती. मग काय कुटूंबियांनी तुळींज येथील स्मशानभूमीत मृतदेह नेण्यासाठी चक्क एका टॅक्सीचा आधार घेतला. टॅक्सीच्यावर तिरडी बांधण्यात आली व पूर्वेकडील तुळींज, टाकीरोड मार्गावरून स्मशानभूमीत नेण्यात आले. कोरोना महामारीमुळे रोजगार, व्यवसायावर झालेले परिणाम, पैशाची चणचण आणि त्यात काही रुग्णवाहिकेकडून सुरु असलेली लूट पाहता अखेर मृतदेह नेण्यासाठी कुटुंबीय पर्याय शोधू लागले आहेत.

# भिवंडी ग्रामीणमधील कोरोना रुग्णांची हेळसांड थांबवा आरोग्य मंत्री यांना शिवसेनेचे निवेदन

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी ग्रामीण मधील रुग्णांसाठी आरोग्य सेवांची कमतरता असून ग्रामीण मधील रुग्णांची कोरोना चाचणी, रुग्णालय सुविधा उपलब्ध करून देण्यात शासकीय यंत्रणा कमी पडत असल्याने ग्रामीण रुग्णांची हेळसांड होत असला बाबतचे निवेदना शिवसेना भिवंडी तालुका ग्रामीणच्या वतीने आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना देण्यात आले. आरोग्य मंत्री भिवंडी महानगरपालिका येथे आढावा बैठकीसाठी आले असता शिवसेना जिल्हा परिषद गट सचिव संदीप पाटील व शिवस्पर्श प्रतिष्ठानचे शेखर फरमन यांनी हे निवेदन देऊन तालुक्याच्या ग्रामीण भागातील कोरोना रुग्णांची व्यथा निवेदनाच्या माध्यमातून समोर मांडली. आरोग्य विभाग शहरातील रुग्णांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देत असताना



ग्रामीण भागातील रुग्णांची उपेक्षा होत असून महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांची चाचणी मोफत होत असताना ग्रामीण भागातील रुग्णांना त्यासाठी पैसे मोजावे लागतात असून एकमात्र आयजीएम रुग्णालयात बेड उपलब्ध न झाल्यास रुग्णांना खाजगी रुग्णालयात पैसे खर्च करून उपचार घ्यावे लागत असताना त्यासाठी ग्रामीण जनतेला कोणतीही आरोग्य सुविधा शासन पातळीवरून मिळत नसल्याने ग्रामीण नागरीकांची हेळसांड तात्काळ थांबवून शहरी व ग्रामीण असा भेदभाव न करता सर्वांना समान आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी मागणी संदीप पाटील यांनी केली असून आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी तात्काळ याबाबत जिल्हाधिकारी यांना लक्ष घालून उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

# एका दिवसात ७४ रुग्ण बरे होऊन घरी सोडले -जिल्हाधिकारी



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात कोरोना रुग्णांची वाढत असलेली संख्या पाहता आज एका दिवसात कोव्हिड-१९ पॉझिटिव्ह ७४ रूग्ण उपचार घेऊन बरे झाले असून त्यांना रूग्णालयातून आज घरी सोडण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले. डेडिकेटेड कोव्हिड हॉस्पिटल रेवेरा ता.विक्रमगड येथिल रूग्णांना जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांच्या उपस्थितीत सोडण्यात आले त्या वेळी ते बोलत होते. विक्रमगड तालुक्यातील डोलारे येथिल १४ रूग्ण, डहाणू येथिल ११ रूग्ण, मोखाडा येथिल ०६ रूग्ण, जव्हार येथिल २६ रूग्ण डेडिकेटेड कोव्हिड हॉस्पिटल रेवेरा येथे उपचार घेत होते. तसेच आयडियल हॉस्पिटल, पोशेरे ता. वाडा येथिल १७ रूग्ण असे एकुण ७४ रूग्ण आज घरी सोडण्यात आले आहेत. कोव्हिड-१९ रूग्ण बरे होऊन घरी परतण्याच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होणार असल्याचा सकारात्मक विश्वास जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला. या कोरोना बाधित रूग्णांवर उपचार करणारे डॉ. प्रशांत राजगुरू, डॉ. गजानन सानप, तसेच रूग्णालयातील परिचारिका व कर्मचारी यांचे अभिनंदन जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी केले. यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक दत्तात्रेय शिंदे, वाडा प्रांत अधिकारी अर्चना कदम, जिल्हाशल्य चिकित्सक डॉ.कांचन वानेरे आदि उपस्थित होते.

## जिल्हयातील खाजगी डॉक्टरांच्या सेवा अधिग्रहीत -जिल्हाधिकारी

पालघर : जिल्ह्यातील खाजगी डॉक्टरांच्या सेवा अधिग्रहीत करण्यात आल्या असुन अधिग्रहित करण्यात आलेले खाजगी डॉक्टर हे जिल्हा शल्य चिकीत्सक पालघर यांच्याशी समन्वय साधून काम करणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले. पालघर जिल्ह्यातील रिवेरा विक्रमगड, आयडीएल वाडा, टिमा, नंडोरे मनोर, साईबाबा हौ.सो. पालघर, जव्हार मुला/मुलींचे वसतीगृह, न्यु तहसिल कार्यालय मोखाडा, डहाणू संतोषी आश्रम शाळा, आयटीआय मोखाडा, उधवा आश्रमशाळा तलासरी या ठिकाणी Covid Care Centre (CCC), Dedicated Covid Health Centre (DCHC) a Dedicated Covid Hospital (DCH) केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. सदर ठिकाणी कोविड-१९ रुग्णांना वेळेवर उपचार देण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात आले असुन जिल्ह्यातील खाजगी डॉक्टरांच्या सेवा अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत. अधिग्रहित करण्यात आलेले खाजगी डॉक्टर हे जिल्हा शल्य चिकीत्सक पालघर यांचेशी समन्वय साधून कामकाज करणार आहेत असे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले. अधिग्रहित करण्यात आलेल्या खाजगी डॉक्टरांच्या निवास, भोजन व भत्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांच्या कडून व्यवस्था करण्यात आली आहे आहे. ज्या खाजगी डॉक्टरांची सेवा अधिग्रहित करण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांना दिलेल्या केंद्रावर आपली सेवा तात्काळ बजविण्याबाबतचे आदेश निर्गमित केले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर,**
**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) पिन कोड : ४००६०१.**

दुरध्वनी क्र. (०२२) २५३३ ३१४४
(०२२) २५३० ४५१४

वेबसाईट : www.mahapwd.com ई-मेल : elthane.ee@mahapwd.com

जा.क्र. : काअ/ठाविवि/निविदा-१/२३१/ सन २०२० दिनंक : २२ जून २०२०

### कोविड-१९ संबंधीत कामांसाठीची ई-निविदा सूचना क्र. ०९ सन २०२०-२०२१

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/ इमारती-२ दिनांक : २७ सप्टेंबर २०१८

कोविड-१९ कोरोना विषाणू प्रादुर्भाव निर्मुलनाकरीता करावयाच्या उपाययोजनांतर्गत खालील कामे ही शासकीय आश्रमशाळा नंदोर ता. पालघर, जि. पालघर विद्युत विषयक बाबींचे असल्याचे कामाचे गांभिर्य, संवेदनशिलता व निकड लक्षात घेता काम तातडीने हाती घेणे व विहित कालावधीतमध्ये पुर्ण करणे आवश्यक असल्याने कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२)२५३३३१४४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत विद्युत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) कोविड-१९ संबंधीत कामांसाठीची ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रुपये | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | Est.No. OW/TESD/TUS/1146/ २०१९-२० Providing additional Electrical Installation at rooms for Quarantine patients due to COVID-19 CORONA virus at Nandor Ashram School, Palghar. | रु. ४,३४,९५९/- | दिनांक ३०/०६/२०२० सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०९/०७/२०२० सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. ४,४००/- निविदा शुल्क रु. ५००/- अधिक वस्तू व सेवा कर | कार्यकारी अभियंता ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम) ठाणे येथे दिनांक १३/०७/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता. शक्य झाल्यास |
| ०२. | Est.No. OW/TESD/TUS/1147/ २०१९-२० Providing additional water purifier, water storage, water heater and street light for Quarantine patients due to COVID-19 CORONA virus at Nandor Ashram School, Palghar. | रु. ३,९९,८३१/- | दिनांक ३०/०६/२०२० सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०९/०७/२०२० सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. ४,४००/- निविदा शुल्क रु. ५००/- अधिक वस्तू व सेवा कर | कार्यकारी अभियंता ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम) ठाणे येथे दिनांक १३/०७/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता. शक्य झाल्यास |
| ०३. | Est.No. OW/TESD/TUS/1148/ २०१९-२० Providing KVA100 DG set with AMF panel, and allied switchgers and cables for Quarantine patients due to COVID-19 CORONA virus at Nandor Ashram School, Palghar. | रु. १०,७७,४०३/- | दिनांक ३०/०६/२०२० सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०९/०७/२०२० सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग ब-१ व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम (DG set with AMF panel) केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. १०,८००/- निविदा शुल्क रु. ५००/- अधिक वस्तू व सेवा कर | कार्यकारी अभियंता ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम) ठाणे येथे दिनांक १३/०७/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता. शक्य झाल्यास |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. www.mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सूचना फलक.
४. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये योग्य त्या वर्गातील नोंदणीधारक विद्युत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदार तत्सम कम यशस्वीपणे पुर्ण केलेले अनुभवी कंत्राटदार ई-निविदा सादर करू शकतात.

सही/-
(प्र.अ. दोडे)
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, ठाणे

जिमाका/पालघर/जाहि ०४/३२४/२०२० दिनांक : २३/०६/२०२०

06 TO 12 JULY 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 04/07/2020 7:19 PM Page 1



## पान १ वरून...

### दुकानदाराच्या क्रूर विकृतीचा कळस...

मात्र पोलिसांनी कोणताही ठोस पुरावा नसताना मोठ्या शिताफीने या गुन्ह्याची उकल केली आणि आरोपी शिवा चौधरी याला अटक केली. त्यानंतर चौकशीत त्याने जे सांगितले ते अंगावर काटा आणणारे होते. नगीना हि नालासोपाऱ्यातील प्रेम नोव्हेल्टी कॉस्मेटिक गिफ्ट या दुकानात समान खरेदीसाठी गेली होती. मात्र दुकानदार शिवा चौधरी बरोबर तिचा वस्तूच्या किमतीवरून वाद झाला. त्यानंतर चिडलेल्या शिवाने नगीनाचे केस धरून तिला आतल्या बाजूला नेले आणि तिचा अगोदर गळा आवळला आणि नंतर चाकूचे वार करून ठार मारले आणि त्यानंतर तिच्या मृतदेहावर बलात्कार केला. हे दुष्कृत्य केल्यानंतर त्याने तिचा मृतदेह प्लास्टिकच्या गोणीत भरून टेंपोमध्ये नेऊन टाकला. मात्र दुसऱ्या दिवशी टेम्पोतून दुर्गंधी येऊ लागल्याने टेंपो मालकाने हि बाब टेम्पो युनियनचे अध्यक्ष श्रीधर पाटेकर यांना सांगितली. त्यांनी पोलिसांना कळवले पोलिसांनी घटनास्थळी येऊन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. त्यात महिलेच्या मृतदेहावर बलात्कार केल्याची संतापजनक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर आरोपी शिवा चौधरीला अटक करण्यात आली. चौकशीत त्याने आपला गुन्हा कबुल केला असून या प्रकरणी तुळींज पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी अधिक तपास करीत आहेत.

### कोरोनाच्या मागे पोलीस धावले ...

नाही, त्यामुळे पोट भरण्यासाठी लुटमार करण्याशिवाय लोकांकडे पर्याय उरणार नाही अशी भीती व्यक्त केली जात आहे. नालासोपारा येथील गुन्हेगारीच्या या तीन घटनांपैकी पहिली घटना नालासोपारा पुर्वेच्या दोन लेन परिसरातील बाबुलपाडा येथील आहे. इथल्या एका चाळीत राहणारा कैलास परमार हा हातगाडीवर लसून विकून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा. शेजारीच त्याचे आई वडील आणि बहिण राहायचे. कैलासला तीन मुले होती. मात्र त्याचे पत्नी सोबत नेहमी भांडण व्हायचे. या भांडणाला कंटाळून त्याची पत्नी लॉकडाऊनच्या काळातच कल्याणला तिच्या माहेरी निघून गेली. त्यानंतर तिने एकदाही त्याची किंवा मुलांची विचारपूस केली नाही आणि एकेदिवशी कैलासने तिचा फोटो फेसबुकवर पाहिला. त्यामुळे आपल्या पत्नीचे दुसऱ्याबरोबर प्रेम संबंध असावेत असा त्याला संशय आला म्हणून त्याने निराश होऊन आपली तीन मुले नंदिनी (७), नयना (३) आणि नयन (१२) यांची गळा चिरून हत्या केली आणि स्वतःही गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. एकीकडे लॉकडाऊनमुळे धंदा बसला. खाण्यापिण्याचे वांदे झाले आणि त्यात पत्नी सोडून गेली. त्यामुळेच कैलासने हे भयंकर पाऊल उचलले. दुसरी घटना नालासोपारा पुर्वेच्या हायटेंशन रोडवरची आहे. या ठिकाणी दिवसाधवळ्या हातात तलवारी घेतलेल्या गुंडांनी भर रस्त्यावर हैदोस घातला आणि मित्राच्या भांडणात मध्यस्ती करायला गेलेल्या प्रणव मिश्रा (२२) या तरुणावर तलवारीने वार करून त्याला गंभीर जखमी केले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल होताच परिसरात भीतीचे वातावरण पसरले. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून तिघे फरार आहेत. लॉकडाऊनच्या काळात घडलेल्या या तिन्ही घटनांनी पुन्हा एकदा लॉकडाऊन विषयी लोकांच्या मनात संतापाची भावना पसरली असून लॉकडाऊन मागे घेतला नाही, तर भविष्यात आणखी अशा घटना घडू शकतात.

#### एकाच रात्री तीन दुकाने फोडली

लॉकडाऊनमुळे लोकांचा नोकरी धंदा गेल्याने त्यांच्यावर आता जगण्यासाठी चोऱ्यामाऱ्या करण्याची पाळी आहे. नालासोपाऱ्यातील तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच रात्री तीन किराणा मालाची दुकाने फोडण्यात आली. पोलीस कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या कामात अडकलेले असल्याने चोरांचे फावले आहे. त्यामुळे रात्रीच्या अंधारात दुकाने फोडली जात आहेत. नालासोपाऱ्यांतील एक दुकान रात्रीच्या वेळेस फोडून ६३ हजार लुटण्यात आले. सकाळी जेंव्हा दुकानदार आला आणि त्याने पाहिले कि गल्ल्यातील ६३ हजार चोरीला गेलेत, तेंव्हा तो भोवळ येऊन पडला. मात्र आता अशा घटना घडताच राहण्याची शक्यता असल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### संतापाच्या भरात पतीचा तोल गेला...

करत होता. संतोष रहात असलेल्या वाड्यातच त्याचा भाऊ देखील आपल्या परिवारासह रहात होता. त्याची बहिण देखील गावातच आपल्या पती व मुलांसह रहाते. एकाच वाड्यात भाऊ व गावात बहिण रहात असल्यामुळे सुख दुखा:त सर्व जण एकमेकांच्या मदतीला धावून येत होते. दोन वर्षापूर्वी संतोषला पॅरालीसीसचा आजार बळावला. आजारामुळे तो हतबल झाला होता. तशाही परिस्थितीत तो गोळ्या बिस्कीटे विकून संसाराचा गाडा चालवत होता. संतोषची पत्नी चार ठिकाणी जावून धुणी भांडी करण्यासाठी जात होती. त्या माध्यमातून ती परिवाराचा गाडा हाकण्यासाठी उपयोगी ठरत होती. संतोषची पत्नी नेहमी तिच्यासोबत मोबाईल बाळगत होती. त्याची पत्नी संगीता मात्र बाहेरगावी जात होती. त्यामुळे तिला मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले होते. संतोषच्या एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे त्याची पत्नी संगिता रात्री अपरात्री कुणाशीतरी बोलत असते. तु एवढ्या रात्री एवढा वेळ कुणाशी बोलत असते याची त्याने पती या नात्याने तिला विचारणा केली. मी माझ्या आई व भावासोबत बोलते असे उत्तर देवून तिने त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिच्या उत्तराने संतोषचे समाधान झाले नाही. त्याच्या मनात संशयाची पाल चुकचुकत होती. तो तिच्या फोनवरील बोलण्यावर लक्ष ठेवून रहात होता. ती कधीकधी गुपचूप व्हिडीओ कॉलवर बोलत असल्याचे देखील संतोषच्या लक्षात येवू लागले. तिचे असे वागणे संतोषला संशयास्पद वाटत होते. विचारणा केल्यास तिचे नेहमीचे उत्तर रहात होते की मी माझ्या आई व भावासोबत बोलते. हा प्रकार गेल्या कित्येक दिवसापासून सुरु होता. कधी कधी ती संतोषला न सांगता गुपचूप घरातून निघून जात होती. या सर्व प्रकाराचा संतोषला राग येत होता. मात्र तो ब-याचदा राग गिळून टाकत होता. कधी कधी त्याची राग सहन करण्याची परिसिमा संपून जात होती. त्यामुळे तो तिच्यावर चिड चिड करत होता. आता तो तिच्या मोबाईलवर येणाऱ्या व्हिडीओ कॉलचा शोध घेवू लागला. त्याने तिला येणा-या फोनची विचारणा केली म्हणजे ती सरळ त्याच्यासोबत अरेरावीची भाषाच करत होती. तिच्या अरेरावीच्या शब्दांना व आपल्या इज्जतीला घाबरुन संतोष गप्प बसू लागला. २५ मार्च रोजी ती तिचा लहान मुलगा कल्पेश यास सोबत घेवून न सांगता कुठेतरी निघून गेली. ती सरळ दुस-या दिवशी दुपारीच घरात परत आली. तु कुठे गेली होती असा प्रश्न संतोषने तिला विचारला असता तिने त्याला सांगितले की मी सोलापूर येथे माझ्या आईला भेटण्यासाठी गेली होती. तिच्या बोलण्यावर संतोषला शंका आली होती. त्याने खात्री करण्यासाठी त्याच्या सासू व सास-यांना फोन लावून विचारणा केली. त्यात त्याला तफावत आढळून आली. सर्वच जण आपल्यासोबत खोटे बोलत असल्याचे त्याच्या लक्षात आले. एकंदरीत पत्नी संगीताच्या अशा वागण्यामुळे संतोष त्रस्त झाला. पॅरेलिसीसमुळे तो हतबल होता. तो बाहेर कामाला कुठे जावू देखील शकत नव्हता. तरीदेखील त्याने पत्नी संगीताची माहिती संकलीत करण्यास सुरुवात केली. त्याला समजले की तिचे शहरातील एका तरुणासोबत प्रेम व शारिरीक संबंध आहेत. आपल्या पत्नीचे पर पुरुषासोबत संबंध असल्याचे लक्षात येताच तो मनाने खचला. त्याच्या मनाला वेदना झाल्या. त्याने पत्नी संगीताला समजावले. तु असे चुकीचे काम करु नको आपल्या संसारासाठी ते योग्य नाही अशा प्रकारे त्याने तिला समजावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. मात्र संगिता समजून व ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हती. शेवटी त्याने जवळच्या नातेवाईकांच्या कानावर हा प्रकार टाकला. पत्नी संगीताला समजावण्याची त्याने नातेवाईकांना विनंती केली. नातेवाईकांनी देखील तिला समजावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. मात्र त्याचा फारसा परिणाम झाला नाही. १६ एप्रिल रोजी देखील ती आपल्या लहान मुलाला सोबत घेवून न सांगता कुठे तरी निघून गेली. तिन दिवस वाट बघून देखील ती घरी परत आली नाही. तपास केला असता ती पर पुरुषाच्या घरी असल्याचे त्याला समजले. या बाबत त्याने पेठ बिड पोलिस स्टेशन गाठत तक्रार दिली. २३ एप्रिल रोजी तिला त्या तरुणाच्या घरातून पोलिसांनी बोलावुन आणले. तिला समज देण्यात आली. पोलिसांनी तिला समजावल्यानंतर ती पती संतोषसोबत घरी येण्यास तयार झाली. आता यापुढे आपण संतोषसोबत निट वागणार असल्याचे तिने पोलिसांना सांगितले. काही दिवस चांगले गेले. मात्र पुन्हा ये रे माझ्या मागल्या असे म्हणत तिने आपली जुनी वाट सोडली नाही. २१ मे रोजी ती पुन्हा घरातून निघून गेली. दुसऱ्या दिवशी दुपारीच ती परत आली. यावेळी संतोषने तिला कुठलीही विचारणा केली नाही. दुसऱ्या दिवशी २३ मे रोजी सकाळीच तीने बॅग भरुन आपल्या माहेरचा रस्ता धरला. ती सरळ माहेरी निघून गेली. त्यामुळे हताश झालेला संतोष गावातील आपल्या बहिणीच्या घरी गेला. त्याच दिवशी दुपारी ती त्याच्याजवळ येवून घराची चावी मागू लागली. ती परत आल्याचे बघून तो तिच्यासोबत घरी परत आला. घरी येताच तिने त्याच्या शर्टाची कॉलर पकडून त्याला धक्काबुक्की करु लागली. तुला आता फासावरच लटकवते अशा भाषेत ती त्याच्यासोबत बोलू लागली. बघता बघता पती पत्नीत मोठ्या प्रमाणात शाब्दिक चकमक होवू लागली. हा प्रकार बिचारी मुले निमुटपणे बघत होती. हा प्रकार असहय झाल्यामुळे त्याने पेठ बिड पोलिस स्टेशन गाठले व हकीकत कथन केली. त्यानंतर त्याची घरी जाण्याची इच्छा नव्हती. त्याने मयुरेश नावाच्या मुलाला सोबत घेत पुन्हा बहिणीचे घर गाठले. तेथेच तो मुक्कामी राहिला. त्याच्या मनात पत्नीचे विचार घोंगावत होते. २४ मे रोजी सकाळी चार वाजता त्याला जाग आली. त्याने झोपण्याचा खुप प्रयत्न केला. परंतु त्याला झोप येत नव्हती. सकाळी साडेचार वाजता बहिणीच्या घरातून तो उठला. कुणाला काही न सांगता तो घराकडे आला. त्याने खिडकीतून घरात पाहणी केली. त्याची दोन्ही मुले व पत्नी संगिता असे सर्व जण झोपले होते. त्याने हळूच घराचा दरवाजा उघडून आत गेला. पत्नीच्या वागणुकीची त्याला प्रचंड चीड आली होती. त्याने संतापाच्या भरात घरातील मुलांची खेळण्याची बॅट हातात घेतली. त्या बॅटचा फटका त्याने जोरात संगीताच्या कपाळावर मारला. लाकडी बॅटचा जोरात फटका बसताच ती रक्तबंबाळ झाली. नेमके काय झाले हे तिला लवकर कळलेच नाही. ती उठण्याचा प्रयत्न करु लागली. तेवढ्यात त्याने पुन्हा तिच्या डोक्यात लाकडी बॅटचे दोन वार केले. तिच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. दरम्यान झालेल्या आक्रोशामुळे मुलगा सिद्धेश जागा झाला. पप्पा तुम्ही हे काय केले असे तो संतोषला विचारु लागला. आता मुलगा आरडा ओरड करणार आणि आपला कारनामा जगजाहीर होणार असे त्याच्या लक्षात आले. त्याने निष्पाप बालक सिद्धेषच्या देखील डोक्यात बॅट हाणली. बॅटच्या हल्ल्यात निष्पाप सिद्धेष घायाळ झाला व खाली पडला. तो उठू नये म्हणून त्याच्यावर संतोषने पुन्हा वार केला. दरम्यान लहान मुलगा कल्पेश हा देखील जागा झाला. त्यामुळे संतापलेल्या संतोषने निष्पाप कल्पेशला देखील बॅटने मारले. तो लागलीच बेशुद्ध झाला. बेशुद्ध कल्पेशला संतोषने उचलून पाण्याच्या ड्रम मधे बुडवले. धुणे धुण्याचा दगड उचलून पत्नी संगीताच्या डोक्यात हाणला. पत्नी मयत झाल्याचे लक्षात येताच त्याने तेथून पळ काढला. घराचा दरवाजा लावून सकाळीच तो बहिणीच्या घरी जावून पुन्हा झोपून गेला. सकाळी आठ वाजता उठून चहापान आटोपून त्याने थेट पेठ बिड पोलिस स्टेशन गाठले. झाला प्रकार त्याने न सांगता मागील तक्रारीचे काय झाले अशी विचारणा करु लागला. त्यानंतर त्याने पुन्हा बहिणीच्या घराची वाट धरली. वाटेत त्याला त्याचा भाऊ संदिप भेटला. भाऊ भेटताच त्याला रडू आले. भावाला त्याने रडत रडत सर्व पकार कथन केला. भावाने त्याला पोलिस स्टेशनला आणले. त्याने केलेल्या तिहेरी हत्याकांडाची माहिती त्याने कथन केली. या प्रकरणी त्याच्या विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. संतोषचा पत्नीवर राग होता. त्या रागातून त्याने पत्नीची हत्या केली. मात्र यात त्याच्या दोन निष्पाप मुलांची विनाकारण हत्या झाली. त्याचा एक मुलगा त्याच्यासोबत त्याच्या बहिणीकडे मुक्कामी होता. त्यामुळे तो बचावला. या गुन्हयाचा पुढील तपास पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपअधीक्षक भास्करराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. विश्वास पाटील, पो.उ.नि.बनकर, पोलिस नाईक सुनिल हलगट आदी करत आहेत.

### पतीला जेंव्हा सहन नाही झाले...

असल्याचे त्याला समजले होते. या एकच कारणामुळे नारायण चित्ते त्रासला होता. आपल्या घराची इज्जत झाकण्यासाठी नारायण याने पत्नी निता हिस वेळोवेळी समजावून सांगितले. मात्र त्याचा फारसा उपयोग झाला नाही. पत्नी निता हिस चुकीचे वळण लागले होते. ते वळण दुरुस्त होण्याचे नाव घेत नव्हते. निता चित्ते चाळीशी गाठण्याच्या बेतात होती. नारायण व निता या दांपत्यास एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये असून ती शिक्षण घेत आहेत. या दांपत्याचा मुलगा दहावीला तर मुलगी बारावीला आहे. घरात सर्व प्रकारच्या सुख सोयी असतांना निता चित्ते हिस चुकीचे वळण लागले होते. त्यामुळे नारायण चित्ते मनातल्या मनात मोठ्या प्रमाणात वैतागला होता. घरातील इज्जत बाहेर जावू नये त्यासाठी नारायण चित्ते याने पत्नी निता हिस खुप समजावले. घरातील सुख शांतीसाठी त्याने शांत राहण्याचा प्रयत्न देखील केला. मात्र त्याची शांत राहण्याची परिसिमा कधी कधी संपून जात होती. तो घरात पत्नी नितावर चिडचिड करत होता. कितीही समजावले तरी निताचे परपुरुषांसोबत असलेले संबंध संपुष्टात येण्याची चिन्हे दिसून येत नव्हती. त्यामुळे या कटकटीला कायमचा रामराम देण्याचे त्याने मनाशी ठरवले. नाशिक म्हसरुळ येथे त्याचा एक मित्र राहतो. विनय निंबाजी वाघ असे त्याचे नाव आहे. विनयच्या मदतीने नारायण याने पत्नी निता हिस या जगातून कायमचे संपवण्यासाठी तयारी सुरु केली. हे काम एकट्याकडून होणार नाही हे विनय वाघ याने ओळखले. विनय वाघ याचा उल्हासनगर येथे राहणारा एक मित्र आहे. भरत देवचंद मोरे असे त्याचे नाव आहे. या कटात विनय वाघ याने भरत मोरे यास सामिल करुन घेतले. नारायण चित्ते याच्या वतीने विनय वाघ याने भरत मोरे यास निता चित्ते हिस जिवे ठार करण्याची सुपारी दिली. या कामाचे भरत मोरे यास दहा लाख रुपये देण्याचे ठरले. पर पुरुषांसोबत अनैतीक संबंध ठेवण्यात पारंगत झालेली निता चित्ते कुणाच्याही कॉलला प्रतिसाद देत असे. कॉलनुसार ती संबधिताला भेटण्यासाठी देखील जात असे. हाच धागा पकडून विनय वाघ याने भरत मोरे यास निताचा मोबाईल क्रमांक दिला. उल्हासनगर येथील रहिवासी भरत मोरे याने नितासोबत मोबाईलवर संपर्क सुरु केला. भरतने तिच्यासोबत मोबाईलवर प्राथमिक स्वरुपात चॅटींग सुरु केली. भरतच्या चॅटींगला निताने चांगला प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. हळूहळू त्याने तिला कॉल करण्यास सुरुवात केली. कॉलवर दोघांचे बोलणे सुरु झाले व त्यातून दोघांची चांगली ओळख झाली. ठरल्यानुसार भरत मोरे याने तिच्यासोबत प्रेमाचे नाटक सुरु केले. एके दिवशी तो तिला म्हणाला की आपण दोघे कुठेतरी बाहेर फिरायला जावू. त्याच्या या प्रस्तावाला ती लागलीच तयार झाली. उल्हासनगर येथून भरत मोरे याने तिला म्हटले की तु १४ जूनच्य रात्री नाशीक शहरातून जाणाऱ्या महामार्गावर थांब. मी उल्हासनगर येथून तुला भेटायला चारचाकी वाहनातून येतो. तेथून आपण सोबत फिरायला जावू. अशा प्रकारे निता चित्ते हिस या जगातून संपवण्याचे नियोजन सुरु झाले. ठरल्यानुसार १४ जून रोजी ती माहेरी उत्तम नगर सिडको भागात जाण्याच्या बहाण्याने तयार झाली. १४ जून रोजी निता घरातून बाहेर पडली ती कायमचीच. रात्रीच्य वेळी महामार्गावरील उड्डाण पूल संपल्यानंतर के.के.वाघ महाविद्यालयाच्या समोर ती चालत चालत आली. काहीवेळातच लाल रंगाची स्विफ्ट कार (एमएच ०१ पीए ५६३२) तिच्यासमोर येवून थांबली. कार थांबताच ती भरतसोबत पटकन बसली. ती कारमध्ये बसताच भरतने पटकन गियर बदलत रेस करत आपल्या ताब्यातील वाहन वेगाने पळवले. भरत मोरे याने त्याच्यासोबत त्याचा साथीदार वाहिद अली शराफत अली याला आणले होते. तो देखील उल्हासनगर येथील रहिवासी होता. आपण तिघे जण सोबत मौजमजा करु असे भरत तिला म्हणाला. भरतच्या बोलण्यामुळे निता खुश झाली. मात्र पुढे काय संकट येणार आहे हे तिला ठाऊकच नव्हते. भरत व वाहिद या दोघांनी तिला राहुड घाट परिसरात निर्जन ठिकाणी नेले. रात्रीच्या वेळी निर्जन ठिकाणी दोघांनी मिळून तिच्याच साडीने तिचा गळा आवळून तिला जिवे ठार केले. काळ्या रंगाची साडी व काळे ब्लाऊज परिधान करुन नटून थटून मौजमजा करण्याच्या बहाण्याने आलेल्या निताचा करुण अंत झाला. रात्रीच्या अंधारात काळे कारनामे करतांना आपल्याला कुणी ओळखू नये यासाठी तिने काळी साडी परिधान केली होती. मात्र तिच्यासाठी ती काळरात्र ठरली. काळी साडी आणि काळरात्र यांचा संयोग एकप्रकारे जुळून आला. तिचा मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून दोघांनी तेथून पलायन केले. दुसऱ्या दिवशी १५ून रोजी भरत मोरे याने विनय वाघ याच्याकडून विल्होळी येथे पाच लाख रुपये घेतले. उर्वरीत रक्कम नंतर आणून दे असे म्हणत भरत याने त्याचा निरोप घेतला व दोघे पुन्हा उल्हासनगरला निघून गेले. दोन दिवस निताचा मृतदेह निर्जन ठिकाणी बेवारस पडून होता. तिच्या मृतदेहाकडे कुणाचे लक्ष देखील गेले नाही. मात्र १६ जून रोजी तिच्या मृतदेहाची दुर्गंधी परिसरात पसरु लागली. चांदवड पोलिस स्टेशन हद्दीतील राहुड घाट परिसरात मुंबई आग्रा महामार्गावरील नाल्यात अज्ञात महिलेचा मृतदेह पडून असल्याची माहिती चांदवड पोलिसांना समजली. पोलिसांच्या दृष्टीने तिचा बेवारस मृतदेह अनोळखी होता. माहिती मिळताच नाशिक ग्रामीण जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. आरती सिंग, अप्पर पोलिस अधिक्षक (मालेगाव) संदिप घुगे, उप विभागीय अधिकारी (मनमाड विभाग) समीर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. के.के.पाटील यांनी तपासाची समांतर सुत्रे हाती घेतली. या प्रकरणी चांदवड पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न.१०६/२० भा.द.वि. ३०२ व २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पो.नि.के.के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अज्ञात मारेकऱ्यांची माहिती संकलीत करण्याचे काम सुरु झाले. मयत महिलेच्या वर्णनानुसार नाशिक शहर व नजीकच्या जिल्हयातील बेपत्ता महिलांचा शोध सुरु करण्यात आला. या घटनेतील मयत महिलेच्या अंगावरील कपडे व घटनास्थळावरील वस्तूंशी मिळत्याजुळत्या वर्णनाची मिसींग अंबड पोलिस स्टेशनला दाखल असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार मयत महिलेचे नाव निता नारायण चित्ते (वय ३९) असल्याचे निष्पन्न झाले. सदर महिला म्हसरुळ, नाशिक येथील असल्याची माहिती तपासात पुढे आली. मयत निता चित्ते ही १४ जून रोजी सकाळी तिच्या माहेरी उत्तम नगर सिडको येथे जाण्याच्या निमित्ताने घराबाहेर पडली होती. त्यादिवशी ती कुणाकुणाला भेटली याबाबत गुप्त पद्धतीने माहिती संकलीत करण्याचे काम सुरु करण्यात आले. १४ जून रोजी ती के.के.वाघ कॉलेजपासून एका लाल रंगाच्या स्विफ्ट कार मधे बसून गेल्याची माहीती खबऱ्यांकडून पोलिसांना मिळाली. त्यानुसार तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. तिचा पती नारायण शामभाऊ चित्ते यास चौकशीकामी बोलावण्यात आले. त्याची कसून चौकशी करण्यात आली. सुरुवातीला आपल्याला काहीच माहिती नाही असा पाढा तो वाचत होता. मात्र पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्याने माहिती देण्यास सुरुवात केली. त्याने दिलेल्या माहितीनुसार त्याची पत्नी निता चित्ते ही परपुरुषांसोबत वारंवार अनैतीक संबंध ठेवत होती. तिच्या अशा वागण्यामुळे नारायण चित्ते हा वैतागून गेला होता. तिला त्याने वेळोवेळी समज देखील दिली होती. मात्र तिच्या वर्तनात फरक पडत नव्हता. त्यामुळे त्याच्या मनात पत्नी निता बद्दल अतिशय राग निर्माण झाला होता. मयत निताचा पती नारायण याने म्हसरुळ येथील त्याचा मित्र विनय निंबाजी वाघ याच्या मदतीने उल्हासनगर येथील भरत देवचंद मोरे यास पत्नी निता हिस जिवे ठार मारण्याची सुपारी दिली होती. त्यामुळे विनय वाघ यास म्हसरुळ गंजपथ परिसरातून अटक करण्यात आली. त्याने दिलेल्या माहितीनुसार उल्हासनगर येथून भरत देवचंद मोरे व त्याचा साथीदार वाहीद अली शराफत अली या दोघांना अटक करण्यात आली. जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. आरती सिंग, अप्पर पोलिस अधिक्षक संदिप घुगे, उप विभागीय पोलिस अधिकारी समीर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.के.के.पाटील यांनी आपले सहकारी स.पो.नि. स्वप्नील राजपूत, पो.उ.नि.मुकेश गुजर, सहायक फौजदार रविंद्र शिलावट, पो.हे.कॉ.संजय गोसावी, पोलिस नाईक हेमंत गिलबिले, पो.कॉ. सुशांत मरकड, पो.कॉ. मंगेश गोसावी,पो.कॉ. प्रदिप बहिरम यांच्या पथकाने या गुन्हयाचा तपास पुर्ण केला.

## पान ८ वरून...

### कुख्यात गुंडाला पकडण्यासाठी ...

येणारं बिकरू हे त्यांचं मूळ गाव. गावातलं त्यांचं घर एखाद्या किल्ल्यासारखं आहे. स्थानिक सांगतात की त्यांच्या मर्जीशिवाय कुणीही आत जाऊ शकत नाही. स्थानिकांचं म्हणणं आहे की २००२ साली जेव्हा राज्यात बहुजन समाज पक्षाची सत्ता होती त्यावेळी विकास दुबेंचा बराच दबदबा होता. बिकरूचे एक गावकरी नाव उघड न करण्याच्या अटीवर सांगतात की त्या काळात त्यांनी गुन्हेगारी जगतात चांगलाच जम बसवला. शिवाय गडगंज पैसा कमावला. चौबेपूर पोलीस ठाण्यात दाखल सर्व प्रकरणं जमीन गैरव्यवहारांची आहेत. भूखंडाच्या या कथित बेकायदेशीर खरेदी-विक्रीतूनच विकास दुबे यांनी कोट्यवधी रुपयांची माया जमवली. विठूरमध्येच त्यांची काही शाळा आणि महाविद्यालयं आहेत. बिकरूचे गावकरी सांगतात की फक्त गावातच नाही तर आसपासच्या गावातही विकास दुबेंचा दबदबा कायम होता. जिल्हा पंचायत आणि अनेक गावांमधल्या सरपंच निवडणुकीत विकास दुबे यांच्या आवडी-निवडीला फार महत्त्व होतं. गावातले एक वयोवृद्ध आजोबा सांगतात, बिकरू गावात गेल्या १५ वर्षांपासून संरपंचाची निवड बिनविरोध होत आहे. विकास दुबे यांच्या कुटुंबातील लोकच गेल्या १५ वर्षांपासून जिल्हा पंचायत निवडणूक जिंकत आहेत. गावकरी सांगतात की विकास दुबे यांचे वडील शेतकरी आहेत आणि ते तीन भाऊ आहेत. यातल्या एका भावाची जवळपास ८ वर्षांपूर्वी हत्या करण्यात आली होती. भावंडांमध्ये विकास दुबे थोरले आहेत. विकास यांच्या पत्नी रुचा दुबे सध्या जिल्हा पंचायत सदस्य आहेत. बिकरू गावच्याच एका गावकऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितलं की विकास दुबेंविरोधात पोलीस ठाण्यात कितीही तक्रारी दाखल असल्या तरी गावात त्यांच्याविषयी वाईट बोलणारं कुणीही सापडणार नाही आणि कुणी त्यांच्याविरोधात साक्षही देणार नाही. त्यांच्या मते २००० साली शिवलीचे तत्कालीन नगर पंचायत चेअरमन लल्लन वाजपेयी यांच्याशी झालेल्या वादानंतर विकास दुबे यांनी गुन्हेगारी जगतात पाऊल ठेवलं. गावकऱ्यांच्या मते विकास दुबे यांना दोन मुलं आहेत. यातला एक मुलगा लंडनमध्ये एमबीबीएसचं शिक्षण घेतोय. तर दुसरा मुलगा कानपूरमध्येच शिकतोय.

### गैरहजर कर्मचारी सुनावणीत ...

गटविकास अधिकारी यांनी कर्मचाऱ्याला दगड आणावयास सांगितले. प्रथम त्यांनी मोठे दगड आणले नंतर लहान दगड आणायला सांगितले. कार्यालया बाहेरून दहा ते बारा दगड आणून टेबलवर ठेवले. दगड जमा केल्यानंतर डाटा एंट्री कर्मचाऱ्यांना सुनावणीस बोलावण्यात आले. सदरील दगड टेबलवर ठेवल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. जे कर्मचारी कामावर जात नाहीत व ऐकत नाहीत अशांना आता दगडाशिवाय पर्याय नाही म्हणून त्यांनी चक्क दालनातच दगड जमा केले होते. डाटा एंट्री कर्मचाऱ्यांना आरोग्य विभागात काम करण्यासाठी आदेश देवूनही हजर होत नाहीत. कामावर का गेले नाहीत असे विचारणा केले असता बोलतही नाहीत. त्यांना बोलते करण्यासाठी दगड मारण्याशिवाय किंवा माझ्या डोक्यात मारून घेतल्याशिवाय पर्याय माझ्याकडे नाही, असे मत सोपान अकेले या गटविकास अधिकारी यांनी व्यक्त केले आहे.

### बाळासाहेब स्मार्ट योजना देणार ...

तब्बल दीड पट अधिक उत्पन्न मिळणार आहेप याच प्रयोगाला कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी गुरुवारी भेट देत पाहणी केली. प्रयोगशील शेतकरी हे आमच्यासाठी आदर्श असून त्यांचा आम्हाला अभिमान आहे अशा शब्दात भुसे यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले असून या शेतकऱ्यांचे मार्गदर्शन आम्ही सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणार आहोत. हे सरकार उत्पादन वाढ, उत्पादनात दर्जेदारपणा व कमी मेहनतीत अधिक नफा या त्रिसूत्रीचा अवलंब करत असून प्रयोगशील शेतकऱ्यांनी पुढे यावे त्यांना कृषी विभागाच्या माध्यमातून पाठबळ दिले जाईल असे आवाहन भुसे यांनी केले. मा. बाळासाहेब स्मार्ट योजनेद्वारे गटशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना व त्यांच्या नवनवीन उपक्रमांना सहकार्य केले जाईल, यात शीतगृह, प्रक्रिया प्रकल्प, गोडाऊन, वाहतून यासाठी सहकार्य केले जाईल असे भुसे यांनी आश्वाशीत केले. यावेळी भुसे यांनी बांधावर खत तसेच पुढील काळातील नियोजनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी पोशेरी येथील कोविड केअर सेंटर ला भेट देत तेथील व्यवस्थेची पाहणी केली त्यानंतर त्यांनी विक्रमगड तालुक्यातील कशिवली येथे काजू प्रक्रिया केंद्राला भेट दिली. यावेळी भुसे यांसोबत पालघर जिल्हाधिकारी कैलास शिंदे, पोलीस अधिक्षक दत्तात्रेय शिंदे यांसह अनेक अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### सुर्याचे पाणी चंद्रपाडा जलकुंभात ...

नागरीकांमार्फत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ६९ गावांच्या पाणी योजनेतून चंद्रपाडा वाकीपाडाच्या पाणी पुरवठ्यासाठी मागील ०२ वर्षापासून बहुजन विकास आघाडीच्या माध्यमातून लोकनेत्यांच्या मार्गदर्शनाखाली एमजेपी व वसई-विरार शहर महापालिकेकडे रितसर पाठपुरावा सुरू आहे. तसेच ही बाब समस्त नागरिकांनासुद्धा माहित आहे. सदर कामाअंतर्गत पाईपलाईन पुरवठा, जुचंद्र रेल्वे फाटक क्रॉसिंग व पाणी पुरवठा सुरू करणेकामी आमदार हितेंद्र ठाकूर तथा एम.जे.पी. यांच्याकडे, रस्ता क्रॉसिंगकामी परवानगीसाठी एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडे रितसर पाठपुरावा करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायत कार्यालयासही याकामी वेळोवेळी अवगत करण्यात आलेले होते. परंतु जलकुंभातून पाणी वितरणासाठी कुठलीच व्यवस्था न केल्याने पाणी असूनही नागरीकांना नाहक पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने ग्रामपंचायतीचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर आलेला आहे. याकामी ग्रामपंचायत सदस्य व बहुजन विकास आघाडी, चंद्रपाडा अध्यक्ष पुष्पराज म्हात्रे यांनी ग्रामपंचायतीस लेखी तक्रार केलेली असून आवश्यक पाईपलाईन तथा जोडणी व्यवस्था करून नागरीकांना तातडीने पाणी पुरवठा सुरू करणेबाबत मागणी केलेली आहे. जनतेच्या पाणी प्रश्नामध्ये घाणेरडे राजकारण करू नये, असे स्पष्ट मत जनसामान्यातून व्यक्त होत आहे.

### जालना येथील वैष्णवी ...

हातावर वार करून ठार मारले..आता पर्यंत कित्येक मुली हा लव्ह जिहादचा शिकार झालेल्या आहे लग्ना अगोदर मुली सुरक्षित नाही आणि लग्नानंतर पण मुली सुरक्षित नाही. सरकारने हैदराबाद प्रकरणासारख्या न्याय द्यावा किंवा सदरील प्रकरण हे फास्ट्रटॅक कोर्टात चालवण्यात यावे व लव्ह जिहाद करणारा आरोपीला फाशीची शिक्षा करण्यात यावी अशी मागणी सावता सेनेचे युवक आघाडीचे प्रदेश महासचिव अजय मगर यांनी ईमेल व्दारे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि गुहमंत्री अनिल देशमुख याच्या कडे केली आहे. हत्येचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालणार जालना जिल्ह्यातील मंठा इथल्या नवविवाहितेच्या हत्येचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालणार असल्याची माहिती राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली. पीडित कुटुंबाला न्याय मिळेल, असं आश्वासनही गृहमंत्र्यांनी दिली. या संबंधात अनिल देशमुख यांनी ट्वीट केलं आहे. वैष्णवी गोरे नावाच्या नवविवाहितेची ३० जून रोजी हत्या झाली होती. वैष्णवीवर एकतर्फी प्रेम करणाऱ्या आरोपीने भर बाजारात चाकूने गळा कापून तिची निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर मंठा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भिवंडीतील स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय सुसज्ज करणार - राजेश टोपे

भिवंडी/अभिजित हिरे

शहरातील स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय सुसज्ज करण्याकरता प्रयत्न करणार. हॉस्पिटलमध्ये अत्यावश्यक सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, स्टाफ नर्स, लॅब कर्मचारी यांची रिक्त पदे तातडीने भरून या हॉस्पिटल मधील पूर्ण क्षमता वाढवणार. हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने चालू राहील याची दक्षता घेताना. ऑरेंज हॉस्पिटल भाड्याने घेतले असून तेथे अन्य रुग्णावर उपचार सुरू आहे. त्याकडे देखील लक्ष देण्यात येईल त्या तिकडे अपुरा असलेला कर्मचारी वर्ग, वैद्यकीय अधिकारी यांची देखील व्यवस्था करण्यात याव्यात, अशा सूचना वैद्यकीय आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. वैद्यकीय आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी कोरोनाविषाणूच्या वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता भिवंडीत भेट देऊन कोरोना परिस्थिती बाबत बैठक घेतली. यावेळी महापौर प्रतिभा पाटील, ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, महापालिका आयुक्त डॉक्टर पंकज आशिया, भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख, आरोग्य विभागाच्या सहाय्यक संचालक गौरी राठोड, ठाणा सिव्हील सर्जन कैलास पवार, महापालिका



सभागृहनेते विलास पाटील, उपमहापौर इमरान खान, स्थायी समिती सभापती हलीम अंसारी, अन्य अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मंत्री टोपे यांनी कोरोना महामारीचा आढावा घेतल्यावर मंत्री राजेश टोपे यांनी भिवंडी शहरात कोरोना टेस्टिंग लॅब करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. तर शहरांमधील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक आहेत त्यांनी त्यांचे दवाखाने चालू राहतील याकरता प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या करता प्रत्येक दवाखान्याकरिता पी पी ई कीट उपलब्ध करून द्या त्या करिता पंधरा लाख रुपये खर्च मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. खाजगी वैद्यकीय व्यावसायिक त्यांचे सहकार्य घेणे आवश्यक असल्याचे नमूद करून जर त्यांचे सहकार्य मिळाले नाही तर त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना जिल्हा व पालिका प्रशासनास दिल्या आहेत. तसेच शहरातील युनानी व आयुर्वेदिक व्यावसायिक यांनादेखील या कार्यात सहभागी करून घेण्याचे सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. पालिकेच्या ज्या कर्मचारी वर्गांना पेमेंट कमी वाटत असेल त्या पेमेंट ची कमतरता भरून देण्यासाठी प्रस्ताव सादर करा. शहरांमध्ये एंटीजन टेस्ट करा अर्धा तासात कोरोना चा रिपोट देत असल्यामुळे टेस्ट सुरू करा, मोहल्ला क्लीनिक सुरू करा मोहल्ला क्लीनिक मध्ये साधारण रुग्णावर प्रथम उपचार होणे आवश्यक आहेत जेणेकरून रुग्णाची स्थिती खराब होणार नाही. कोरोना करता (covid-19) हॉस्पिटल चालू करताना आपण ऑरेंज हॉस्पिटल चालवायला घेतलेले आहे हे लक्षात घेऊन या हॉस्पिटलमध्ये देखील चांगल्याप्रकारे रूग्णांवर उपचार होणे आवश्यक आहे. गर्भवती महिलांना उपचार न करता दुसरीकडे पाठवले जाते हे योग्य नाही. सर्वावर उपचार होणे आवश्यक आहे. तसेच शहरातील किमान चार हॉस्पिटलचा समावेश महात्मा ज्योतिबा फुले योजनेचा समावेश करून रुग्णालयात सर्व रुग्णांना मोफत उपचार करा. ठाणा सिविल हॉस्पिटल मध्ये सर्व रुग्णांना दाखल करण्याची क्षमता आहे कोणत्या रुग्णाला उपचार न करता परत पाठवता येणार नाही शहरामध्ये नागरिकांमध्ये कोरोना बाबत जागरुकता निर्माण होणे आवश्यक आहे. नागरिकांनी मास्क लावणे व सामाजिक अंतर ठेवण्याचा यापूर्वी सूचना पूर्वी दिलेले आहेत त्याचे तंतोतंत पालन करावे त्यानुसारच आपण कोरोना आजारावर नियंत्रण मिळवू शकू, तरच कोरोनावर मात करू शकतो, यासाठी नागरिकांच्या देखील सहकार्य मिळणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या सूचना मंत्री राजेश टोपे यांनी सर्व प्रशासनाला दिलेल्या आहेत. या प्रसंगी राष्ट्रवादी महिला अध्यक्षा स्वाती कांबळे यांनी भिवंडीच्या विविध समस्या बाबत मंत्री टोपे याना निवेदन दिले.

# सहकाऱ्यांच्या मदतीमुळेच कोरोना रोखण्यात यशस्वी - स्वप्निल पवार





लातूर/प्रतिनिधी

कोरोना महामारीचा सामना करत असताना तहसीलदार म्हणून जे जे निर्णय घेतले ते वरिष्ठामुळे. पालकमंत्री नामदार अमित देशमुख,जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांचे आदेश व माझे सर्व नायब तहसीलदार व कर्मचारी यांच्यामुळेच कोरोनासारख्या महामारीवर यश मिळवता आले असे गौरवोद्गार लातूर तहसीलदार स्वप्निल पवार यांनी व्यक्त केले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर यांच्यावतीने कोरोना योद्धा म्हणून तहसीलदार स्वप्निल पवार यांचा सन्मान लातूर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक देडे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व गौरव पत्र देऊन करण्यात आला. यावेळी तहसीलदार यांनी आपल्या वरिष्ठांचे आदेश व सर्व सहकार्यामुळेच हे यश मिळवता आले असे ते म्हणाले. या सन्मान सोहळ्यास तहसील कार्यालयाचे निवासी नायब तहसीलदार राजेश जाधव, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, नायब तहसीलदार सुधीर देशमुख,एस.एस.उगले, रत्नाकर महामुनी,आंब्रे पाटील,संजय जाधव, महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महादेव पांचाळ, स्वस्त धान्य दुकान असो.विभागीय अध्यक्ष हंसराज जाधव, आधीच कर्मचारी बांधव उपस्थित होते. सत्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी लातूर जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष अशोक देडे, कार्याध्यक्ष रघुनाथ बनसोडे, जिल्हा संघटक महादेव डोंबे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, बालाजी फड, विनोद चव्हाण, नितीन भाले, हरून मोमीन, कलीम शेख, इस्माईल शेख, अमोल घायाळ तसेच जिल्हा पत्रकार संघाचे कायदेशीर सल्लागार रविकिरण गिरी, आसिफ पटेल उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इस्माईल शेख यांनी तर प्रास्ताविक जिल्हा अध्यक्ष अशोक देडे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सरचिटणीस अशोक हनवते यांनी मानले.

# वाढीव वीज बिला विरोधात भाजपाची, उपविभागीय कार्यालय बाहेर निदर्शने

भिवंडी/अभिजित हिरे

कोरोना विषाणूच्या जागतिक महामारीचा सामना करताना संपूर्ण जग त्रस्त असून, देशातील सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात आढळून आले असतानाच मृत्यूंची संख्या ही सर्वाधिक आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी राज्यात जाहीर केलेल्या लॉकडाऊन काळात तब्बल शंभर दिवस सर्व उद्योग व्यवसाय रोजगार बंद होता. यंत्रमाग व्यावसायावर अर्थ व्यवस्था अवलंबून असलेल्या भिवंडी शहरातील यंत्रमाग व त्यावर अवलंबून तत्सम व्यवसाय उद्योग बंद असल्याने शहरातील मजूर कामगार वर्गाची संख्या मोठी असलेल्या शहरात लॉकडाऊनमुळे उद्योग व्यास बंद असल्याने मजूर कामागरांसह त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. शहरातील वीज वितरण करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनी कडून मार्च एप्रिल महिन्यात सरासरी वीज बिल आकारणी करीत मे महिन्याच्या बिल तब्बल तीन ते चार पट अधिकचे देऊन गोरगरीब जनतेचे कंबरडे मोडले आहे. त्या सोबतच शहरातील शाळा महाविद्यालय, दुकान हॉटेल ही सर्व आस्थापने लॉक डाऊन काळात बंद असतानाही त्यांनाही अमानुष पणे बिल आकारणी केली असल्याने सर्व भिवंडीकर





जनतेच्या मनात टोरेंट पॉवर कंपनी व राज्य शासनाच्या प्रति तीव्र संताप खदखदत आहे. या वाढीव वीज बिल विरोधात भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष संतोष एम. शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय कार्यलयाच्या आवारात जोरदार निदर्शने करीत आपला संताप व्यक्त केला. शहराध्यक्ष संतोष शेट्टी, नगरसेवक शाम अग्रवाल, पदाधिकारी प्रेमनारायण राय, निष्काम भैरी, राजू गाजंगी, कल्पना शर्मा, ममता परमाणी यांसह भाजपा कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभाग घेत वाढीव वीज बिल विरोधात नागरिकांची खोटी घोषणा करून फसवणूक करणाऱ्या राज्य शासनासह भिवंडीतील वीज वितरण करणाऱ्या टोरेंट पॉवर कंपनी विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत आपला संताप व्यक्त केला. कोरोना संसर्गामुळे आर्थिक व सामाजिक घडी विस्कटलेल्या नागरीकांना दिलासा देण्याचे काम राज्य शासनाने करावयाचे असताना तस करताना राज्य शासन दिसून येत नसतानाच निवासी वीज ग्राहकांसह, बंद असलेल्या अस्थापनांना अव्वाच्या सव्वा वाढीव वीजबिल आकारणी करून नागरीकांची क्रूर चेष्टा केली असल्याचा आरोप करीत कोरोनाच्या नव्हे, तर वाढीव वीज बिलाच्या धसक्याने नागरिकांची रोग प्रतिकार शक्ती कमी होऊन ते मृत्युमुखी पडत असल्याची टीका भारतीय जनता पार्टी भिवंडी शहर जिल्हाध्यक्ष संतोष शेट्टी यांनी केला. या आंदोलन नंतर उपविभागीय अधिकारी डॉ.मोहन नळदकर याना आपल्या निषेधाचे निवेदन सादर केले. या प्रसंगी तहसीलदार शशिकांत गायकवाड, टोरेंट पॉवर कंपनीचे उप व्यवस्थापक संजय आष्टीकर यांना आपल्या वाढीव वीजबिल बाबतच्या समस्या सांगण्यात आल्या.

## सोलापूरात महिला वकीलेची गळफास घेवून आत्महत्या

सोलापूर/प्रतिनिधी,



मंगळवेढया कन्या असलेल्या अॅड.स्मिता धनंजय पवार (वय ३१) या महिलेने बुधवार दि.१ जुलै रोजी दुपारी २.५० वाजण्यापुर्वी अज्ञात कारणावरून सोलापूर येथील राहते घरात गळफास घेवून आत्महत्या केली.याबाबत अधिक माहिती अशी की,मंगळवेढा येथील विठ्ठल गोवे यांची कन्या अॅड. स्मिता हिचा विवाह सोलापूर येथील धनंजय पवार यांचे समवेत ६ मे २०१८ रोजी झाला असून त्या सोलापूर येथील न्यायालयात प्रॅक्टीस करत होत्या. बुधवार दि. १ जुलै रोजी दुपारी पावणेतीन वाजण्यापुर्वी सोलापूरातील जुनी पोलिस लाईन मुरारजी पेठ येथील राहते घरी पहिल्या मजल्याच्या बेडरूममध्ये अज्ञात कारणावरून नारंगी रंगाच्या साडीने छताच्या पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आली. उपचारासाठी तीला सिव्हील हॉस्पीटल सोलापूर येथे दाखल करण्यात आले. परंतू उपचारापुर्वीच ती मयत झाली. त्याची खबर डॉ.अनिकेत मानेकर यांनी पोलिसात दिली असून अधिक तपास हवालदार काझी हे करीत आहेत.

# दीड लाख कर्ज काढून लग्न करणाऱ्या तरुणाला वधूचा गंडा; दागिने घेऊन पसार

वाळूज/प्रतिनिधी

वाळूजमधील तरुणाशी विवाह करून त्याची दीड लाखाची फसवणूक करणाऱ्या वधूसह तिच्या चौघा नातेवाइकांविरुद्ध वाळूज एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल झाला. विवाहेच्छुक तरुणांना शोधून त्यांची आर्थिक फसवणूक करणारे मोठे रॅकेट असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिस निरीक्षक मधुकर सावंत यांनी वर्तवला.

राहुल विजय शेळके (२६, रा. रांजणगाव शेणपुंजी) वधूच्या शोधात होता. सुमन गणेश जाधवने (रा. जांभोरा, ता. अंबड) त्याला जालन्यात बोलावून पाच-सहा मुलींचे फोटो दाखवले. त्यातून राहुलने पूजा पवार नावाच्या मुलीला सिंदखेडराजा येथे जाऊन पसंत केले. तेथे सुमनने पूजाची आई आरती व काका राधाकिसन जावळे यांची ओळख करून दिली. लग्नासाठी मुलीच्या आईने दीड लाख मागितल्याचे सुमनने सांगितले. राहुलने ६ ऑक्टोबरला एका फायनान्स कंपनीकडून २ लाख रुपये कर्ज घेतले. १९ ऑक्टोबर २०१९ रोजी लग्नासाठी जालना येथील सुवर्णकारनगर गणपती मंदिरात राहुल आई व नातेवाइकासोबत पोहोचला. पूजाचे नातेवाइक तेथे होते. पण वधूची आई आजारी असल्याने आली नसल्याचे सांगण्यात आले. राहुलने सव्वा लाख पूजाच्या नातेवाइकांकडे दिले. तसेच, २५ हजारांचे दागिने घातले व तसे बाँड पेपरवर तसे नातेवाइकांकडून शपथेवर लिहून घेतले. विवाह झाल्यावर राहुल वधुसह रांजणगावात आला होता. लग्नाच्या दोनच दिवसांनंतर आईची प्रकृती अचानक बिघडल्याचे सांगत पूजा ही सुमन व तिच्यासोबत आलेल्या राधाकिन जावळेसोबत कारमधून निघून गेली. पण नंतर आली नाही. राहुल सिंदखेडराजाला गेल्यावर सासूने त्याला ओळख दाखवली नाही. शिवाय सुमनही भोकरदन तालुक्यातील तपवन येथील असून तिचे खरे नाव गोदावरी जगदाळे असल्याचे कळाले.

# लॉकडाऊनच्या काळात १७५ शस्त्रक्रिया, विवेकानंद रुग्णालयाची अनोखी कामगिरी

लातूर/प्रतिनिधी

कोरोनामुळे सामान्य जनजीवन प्रभावित झाले.आरोग्य क्षेत्राला आणि पर्यायाने कोरोनाव्यतिरिक्त इतर आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांनाही याचा फटका बसला. लॉकडाऊनच्या या काळात कर्करोगाशी झुंजणाऱ्या रुग्णांवर उपचार करत आपला रुग्णसेवेचा वसा जोपासण्याचे काम विवेकानंद रुग्णालयाने केले.लॉकडाऊनच्या काळात विवेकानंद रुग्णालयात १७५ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. कोरोनामुळे डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचारीही धास्तावलेले असताना विवेकानंद रुग्णालयाने ही किमया साध्य करत रुग्णांना दिलासा दिला.

मार्च महिन्यात लातूर जिल्ह्यासह देशभरात लॉकडाऊन झाले. कोरोना, लॉकडाऊन, संचारबंदी नेमके काय होत आहे हेच त्याकाळात समजत नव्हते. पण कर्करोगावर उपचार घेणाऱ्या रुग्णांना तर थांबून चालणार नव्हते.कर्करोगाशी झुंजत असताना शस्त्रक्रिया करण्यास उशीर झाला तर आजार वाढण्याचाही धोका असतो. याकाळात अनेक रुग्णालयांनी उपचार करण्यास नकार दिला पण आपली बांधिलकी जपणाऱ्या विवेकानंद रुग्णालयाने उपचार थांबवले नाहीत. नियमित उपचार घेणाऱ्या रुग्णांसह इतर शहरात उपचार घेणाऱ्या पण लॉकडाऊनमुळे तेथे जाऊ न शकणाऱ्या रुग्णांवरही विवेकानंद रुग्णालयाने उपचार केले. २२ मार्च पासून आजवर रुग्णालयात कर्करोगावरील १७५ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. दररोज तीन ते चार शस्त्रक्रिया, जवळपास ८० रुग्णांवर रेडिएशन आणि २५ ते ३० रुग्णांवर किमोथेरपी करण्यात आली. रुग्णालयाच्या ओपीडीला दररोज साधारणपणे २५ ते ३०



नवे रुग्ण येत असत. त्यांच्यावरही उपचार करण्यात आले. डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ.प्रमोद टिके, डॉ. ललिता नेलोरे, डॉ. करिश्मा जॉर्ज, वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी कुलकर्णी यांनी रुग्णांसह स्वतःचीही काळजी घेत या शस्त्रक्रिया पार पाडल्या. भूलतज्ज्ञ डॉ.आरती झंवर, डॉ.श्रीकृष्ण कुलकर्णी, डॉ.कल्याणी सास्तुरकर यांनीही आपली जबाबदारी पार पाडत डॉक्टरांच्या या टीमला सहकार्य केले.आजही शस्त्रक्रियेसाठी विवेकानंद रुग्णालयात दोन आठवड्यांचे वेटींग आहे.२ शिफ्टमध्ये किमोथेरपी केली जाते. शहरातील रुग्णालयात २५ बेडचा एक वॉर्ड आणि एमआयडीसी मधील रुग्णालयात १५ असे एकूण ४० बेड असून ते सर्व दररोज किमोथेरपीसाठी येणाऱ्या रुग्णांसाठी राखीव आहेत. कोरोनापासून बचाव करण्यासाठी शारीरिक अंतर ठेवणे,मास्क आणि सॅनिटायझरचा वापर यासह सुरक्षिततेचे सर्व निकष पाळून या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. विशेष म्हणजे जवळपास ९५ टक्के रुग्णांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार करण्यात आले. ज्या रुग्णांना योजनेचा लाभ मिळाला नाही अशा रुग्णांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च विवेकानंद रुग्णालयाने उचलल्याचे डॉ.ब्रिजमोहन झंवर यांनी सांगितले.

लातूर येथे अत्याधुनिक पद्धतीचे उपचार उपलब्ध आहेत परंतु याची माहिती नसल्याने काही रुग्ण इतर शहरात उपचारासाठी जातात. पुणे, मुंबई अशा शहरात उपचारासाठी जाणाऱ्या या रुग्णांना लॉकडाऊनमुळे प्रवास करणे शक्य नव्हते. त्यामुळे असे रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी विवेकानंद रुग्णालयात आले.त्यांच्यावरही उपचार करण्यात आल्याचे ते म्हणाले.

पद्मभूषण डॉ.अशोकराव कुकडे काका, डॉ. गोपीकिशन भराडिया, डॉ.अरुणा देवधर, प्रशासकीय अधिकारी अनिल अंधोरीकर, डॉ.राधेशाम कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात विवेकानंद रुग्णालयाचे कामकाज चालते. डॉ. कुकडे काका आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरु केलेल्या या रुग्णालयात आज डॉक्टरांची तिसरी पिढी कार्यरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत मागील ५० वर्षापासून रुग्णालयाची वाटचाल सुरु असून विवेकानंद रुग्णालय हे रुग्णांसाठी आशेचा किरण ठरले असल्याचेही डॉ. झंवर यांनी सांगितले. कोरोनामुळे सर्वाच्याच मनात संभ्रम होता. डॉक्टरांसह सहकारी कर्मचाऱ्यांनाही भीती होती. त्यांच्या मनातील ही भीती काढून टाकण्याचे काम केले. त्यांना विश्वास दिला, धाडस दिले. कोरोनाबाबत असणारा संभ्रम दूर केला. स्वतःची काळजी घेत, सुरक्षाविषयक सर्व निकष पाळत रुग्णांवर उपचार केले असे ते म्हणाले.

**लाईव्ह उपचार...**

पहिल्या टप्प्यात लॉकडाऊन अतिशय कडक होते. उपचारासाठीही रुग्णांना येणे अशक्य होते.त्याकाळात फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून रुग्णांना दिलासा देण्याचे काम केले. अनेकवेळा रुग्णाला उपचार करण्याची गरज असताना स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने व्हिडीओ कॉल करून उपचारांबाबत मार्गदर्शन केले. रुग्णांना त्यांच्या समस्यांबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातूनही मार्गदर्शन केल्याची माहिती त्यांनी दिली.

**टर्शरी कॅन्सर केअर सेंटर...**

भारत सरकारने मागील वर्षी विवेकानंद रुग्णालयाला टर्शरी कॅन्सर केअर सेंटरचा दर्जा दिला आहे. या माध्यमातून रुग्णांवर अत्याधुनिक पद्धतीने उपचार केले जात आहेत.याशिवाय विवेकानंद रुग्णालयात अद्ययावत सिटी स्कॅन मशीन असून रुग्णांना अत्यल्प दरात त्याचा लाभ दिला जात आहे. अद्ययावत ३ टेस्ला एमआरआय मशीनद्वारे महाराष्ट्रात सर्वात स्वस्त उपचार विवेकानंद रुग्णालयात केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

# तरुणाची धारदार शस्त्राने वार करून हत्या

उल्हासनगर/किरण तेलगोटे



उल्हासनगरमधील मद्रासी पाडा परिसरात रात्रीच्या सुमारास काही अज्ञात टोळीने एका युवकाची धारधार हत्याराने निर्घृण हत्या केलीय.तर दोन जण गंभीर जखमी झाले आहे. या घटनेने मद्रासी पाड्यात खळबळ उडाली आहे. विल्सन जाधव असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. मध्यरात्रीच्या सुमारास उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील मद्रासी पाड्यात काही अज्ञात टोळीने विल्सन जाधव, अविनाश नायडू, स्वप्नील वाघ यांच्यावर हल्ला केला. यात विल्सन जाधव याच्या पोटावर गंभीर वार झाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. तर अविनाश नायडू आणि स्वप्नील वाघ हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर विठ्ठलवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून सूत्र फिरवली आणि काही तासातच आरोपी राहुल वाल्मिकी याला अटक केलीय तर काही आरोपी फरार असून त्यांचा शोध पोलीस घेत आहे. ही हत्या पूर्ववैमनस्यातून झाल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांना जुलैं अखेरपर्यंत लाभ - बाळासाहेब पाटील

मुंबई/प्रतिनिधी

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची रक्कम वितरीत करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून जुलै अखेरपर्यंत सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळेल, असे सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी सांगितले. सहकार मंत्री म्हणाले शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. या योजनेची अंमलबजावणी सुरू असतांना देशासह राज्यात कोविड-१९ चे महासंकट आले. त्यामुळे राज्यामध्ये लॉकडाऊन जाहीर झाला. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये काही अडचणी निर्माण झाल्या आणि तिसऱ्या यादीतील पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यास उशीर झाला. सध्या खरीप परेणीचा हंगाम सुरू झाला आहे. तिसऱ्या यादीतील राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळावा यासाठी ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी २ हजार कोटी रक्कम वर्ग करण्यात आली आहे. जुलै अखेरपर्यंत सव्वा आकरा लाख शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात रु. ८ हजार २०० कोटी रक्कम वर्ग करण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांना सदर योजनेचा अद्याप लाभ मिळाला नाही अशा शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असे सहकार मंत्री यांनी आवाहन केले. दरम्यान कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांच्या अंतिम यादीत नाव असलेल्या मात्र कोविड-१९ च्या संकटामुळे कर्जमुक्तीचा लाभ न मिळालेल्या कर्जदार शेतकऱ्यांना खरीप कर्ज द्यावे अशा सूचनाही शासनाने बँकांना दिल्या होत्या असेही श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

क्राईम Reporter
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, जळगाव, सांगलीतील बातम्या व गुन्हेकथा या क्रमांकावर पाठवा
9890718873

06 TO 12 JULY 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 04/07/2020 7:19 PM Page 1



# कुख्यात गुंडाला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर बेछूट गोळीबार

## एका वरिष्ठ अधिकाऱ्यासह ७ पोलीस ठार, तर ७ पोलीस गंभीर जखमी



आरोपी विकास दुबे



**वाराणसी/अजयकुमार उपाध्याय**

कानपूरमध्ये विकास दुबे यांना अटक करायला गेलेल्या पोलीस पथकावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात ८ पोलीस ठार तर ७ पोलीस गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये बिल्हौरचे पोलीस क्षेत्र अधिकारी देवेंद्र मिश्र आणि एसओ शिवराजपूर महेश यादव यांचाही समावेश आहे. ज्या विकास दुबेंना अटक करायला हे पोलीस पथक गेलं होतं त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत. इतकंच नाही तर अनेक खटलेही दाखल आहेत. राजकीय पक्षांमध्येदेखील त्यांची उठबस असल्याचं बोललं जातं. कानपूरमधल्या चौबेपूर पोलीस ठाण्यात विकास दुबेंविरोधात एकूण ६० गुन्ह्यांची नोंद आहे. यात खून आणि खुनाचा प्रयत्न असे गंभीर गुन्हेदाखील आहेत.

कानपूरचे पोलीस महासंचालक मोहीत अग्रवाल यांनी बीबीसीशी बोलताना सांगितलं की पोलीस एका खून प्रकरणातच विकास दुबेंना अटक करायला गेले होते. चौबेपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारींच्या आधारावर असं म्हणता येईल की गेल्या ३० वर्षांपासून गुन्हेगारी जगताशी विकास दुबेंचं नाव जोडलं गेलं आहे. त्यांना अनेकदा अटकही करण्यात आली. मात्र, अजूनतरी कुठल्याच प्रकरणात त्यांना शिक्षा झालेली नाही. कानपूरमधले स्थानिक पत्रकार प्रवीण मोहता सांगतात, २००१ साली विकास दुबे यांच्यावर पोलीस ठाण्यात घुसून भाजपचे राज्यमंत्री संतोष शुक्ला यांची हत्या केल्याचा आरोप लावण्यात आला. संतोष शुक्ला हत्याप्रकरण हायप्रोफाईल प्रकरण होतं. इतकी मोठी घटना घडूनही एकाही पोलीस कर्मचाऱ्याने विकास दुबेंविरोधात साक्ष दिली नाही. कोर्टात विकास दुबेंविरोधात कुठलेच पुरावे सादर न झाल्याने त्यांची सुटका झाली.

दरम्यान २००० साली कानपूरच्याच शिवली पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या ताराचंद इंटर कॉलेजचे सहव्यवस्थापक सिद्धेश्वर पांडेय यांच्या हत्या प्रकरणातही विकास दुबे यांचं नाव तक्रारीत नोंदवण्यात आलं होतं. पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारींनुसार, २००० सालीच विकास दुबे यांच्यावर रामबाबू यादव यांच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. विकास दुबे यांनी कारागृहातूनच हा कट रचल्याचं बोललं जातं.

२००४ साली एका केबल व्यावसायिकाच्या हत्येतदेखील विकास दुबे यांचं नाव आलं होतं. पोलिसांच्या माहितीनुसार यातल्या अनेक प्रकरणांमध्ये विकास दुबे यांना अटक झाली. मात्र दरवेळी ते जामिनावर सुटले. २०१३ सालीसुद्धा एका खून प्रकरणात विकास दुबे यांचं नाव आलं होतं. २०१८ साली त्यांच्यावर चुलत भाऊ अनुराग यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचाही आरोप ठेवण्यात आला. त्या प्रकरणात अनुराग यांच्या पत्नीने विकाससह चार लोकांविरोधात एफआयआर दाखल केली होती. प्रवीण मोहता सांगतात, प्रत्येक राजकीय पक्षात विकास दुबेंचा दबदबा आहे आणि त्यामुळेच त्यांना आजवर अटक होऊ शकलेली नाही आणि अटक झाली तरी ते काही दिवसातच ते बाहेर आले. कानपूरजवळ विठूरच्या शिवली पोलीस ठाण्यांतर्गत ...पान ६ वर

# जालना येथील वैष्णवी गोरे हत्या प्रकरणी

## लव जिहादच्या आरोपीला फाशीची शिक्षा द्या!





**हिंगोली/प्रतिनिधी**

जालना जिल्हातील मंठा तालुका येथील हिंदु धर्मातील गरीब रिक्षा चालक नारायण गोरे यांची २० वर्षीय मुलगी वैष्णवी गोरे हिची भरदुपारी बाजारपेठेत धारदार शस्त्राने गळ्यावर, पाठीवर व हातावर सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. याप्रकरणी आरोपी शेख अल्ताफ शेख बाबू याला पोलीसानी पाच तासात अटक केली असुन पोलीसा पासुन वाचण्यासाठी सदरील आरोपीने औषध घेतल्यामुळे दवाखानात ॲडमिट आहे. आरोपी शेख अल्ताफ शेख बाबू हा एकतर्फी प्रेमातून गेल्या अनेक महिन्यांपासून वैष्णवीला त्रास देत होता, शाळेत जाताना-येताना छेड काढणे, जबरदस्तीने लग्न कर म्हणून सांगणे यासारखा त्रास वारंवार देत होता. या त्रासाला कंटाळून वैष्णवीच्या आई-वडीलांनी तिला शाळेत पाठविणे बंद केले होते.

रिक्षा चालवुन उदरनिर्वाह करणारे गोरे कुंटुबातील वैष्णवी ही एकुलती एक मुलगी होती. अठराविश्व दारिद्र्य तसेच हालाकीच्या परिस्थितीशी दोन हात करत वडिलांनी वैष्णवीचा विवाह मागील आठवड्यात जवळच्या नात्यातील मुलासोबत लग्न लावून देण्यात आले होते. लग्ना नंतर पाच दिवसानी वैष्णवी मांडव परतणीला व सत्यनारायण पुजेसाठी माहेरी आली होती. मंगळवारी चार वाजेच्या दरम्यान वैष्णवी तिची आई आश्विनी गोरे आणि तीची एक मैत्रीण बाजारात खरेदीसाठी गेल्या होता. साडी आणि अन्य खरेदी झाल्यावर वैष्णवी आणि तिच्या मैत्रिणीस आईने घरी जाण्याचे सांगितले, त्याच वेळी वैष्णवी आणि तिची मैत्रीण घरी जात असताना अचानक आरोपी शेख अल्ताफ शेख बाबू यांने त्यांना रस्तामध्ये थांबुन तु माझी नाही झाली तर कोणाचीच होऊ देणार नाही म्हणत पाठीमागुन धारदार शस्त्राने वैष्णवीच्या गळ्यावर, पाठीवर, ...पान ६ वर

# आपसातील समन्वय याच्यामुळेच कोरोनावर नियंत्रण राखू शकलो - हिम्मत जाधव



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांचा कोरोना योद्धा म्हणून आज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर यांच्यावतीने गौरवपत्र देऊन जिल्हा अध्यक्ष अशोक देडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव म्हणाले की पालकमंत्री, राज्यमंत्री, सर्व आमदार व माझे सर्व वरिष्ठ अधिकारी तसेच माझे सर्व सहकारी पोलीस बांधव यांच्यात व माझ्यात समन्वय असल्यामुळेच आपण कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यात यशस्वी होऊ शकलो आहे. जोपर्यंत कोरोनावर लस निघत नाही तोपर्यंत आटोक्यात येणार नाही असेच वाटते याचा प्रसार रोखण्यासाठी स्वतः रूग्णांनी स्वतःला विलगीकरण करून घेणे गरजेचे वाटते याकडे लोक मात्र गांभीर्याने घेत नसल्याचे चित्र आज जिल्ह्यात दिसून आहे. यासाठी वारंवार लॉक डाउन करणे हा पर्याय होऊ शकत नाही. आम्ही पोलीसांनी थोडी कडक भूमिका घेतली की आमच्यावर अत्याचार केला जातो असेही बोलले जाते. पण आम्ही ही केवळ रोगराई वाढू नये म्हणून असे कठोर भूमिका घेत असतो हे जनतेने लक्षात घ्यावे, असे ते यावेळी म्हणाले. या रोगावर नियंत्रण आणण्याचा आम्ही प्रयत्नही केला आहे. आमच्यातील आपसात समन्वय असल्यामुळेच ही बाब करता आली असेही हिम्मत जाधव म्हणाले. पोलिसाच्या संयमाचा अंत पाहू नये नागरिकांनी स्वतःची जबाबदारी ओळखून घ्यावी व या रोगापासून मुक्तता करावी असे मला वाटते असेही हिम्मत जाधव मनाले. सोहळ्याला जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर स्वामी,लातूर जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रघुनाथ बनसोडे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, जिल्हा संघटक महादेव डोंबे, कोषाध्यक्ष अरुण जे कांबळे सदस्य अमोल घायाळ आदी उपस्थित होते.

# गैरहजर कर्मचारी सुनावणीत गप्प

## बीडमध्ये बीडीओंनी चक्क 'दगडांनी' सुनावले!



**बीड/प्रतिनिधी,** कोरोनाच्या काळातील कामावर गैरहजर राहणाऱ्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या सुनावणीमध्ये कर्मचारी काहीच बोलत नाहीत, हे पाहून बीडीओ यांनी चक्क दगड टेबलवर आणून ठेवले आणि आता तुम्हाला दगड धोंड्यांनी समजवावे लागेल का? असे सुनावले. हा प्रकार बीड जिल्ह्यातील धारूर पंचायत समितीमध्ये घडला आहे. कोरोना संकट काळात तालुका आरोग्य विभागामध्ये डाटा एंट्री ऑपरेटरची गरज होती. यासाठी तालुका आरोग्य अधिकारी यांनी गत दोन महिन्यांपूर्वी पंचायत समितीकडे संगणकावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मागणी पत्राद्वारे केली होती. त्यानुसार पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सोपान अकेले यांनी चार ग्रामपंचायत डाटा एन्ट्री कर्मचाऱ्यांची नेमणूक केली होती. आण्णासाहेब तिडके, सद्दाम सय्यद, अकबर पठाण यांची आदेशाद्वारे तालुका आरोग्य विभागास नेमणूक केली होती. परंतु सदरचे कर्मचारी हे गत दीड महिन्यापासून कामावर हजर झाले नाहीत. या कामचुकार कर्मचाऱ्यांची गटविकास अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती. सदर तीन कर्मचाऱ्यांना गटविकास अधिकारी यांच्या दालनात बोलावण्यात आले होते. त्याअगोदर ...पान ६ वर

# ग्रीन लातूर वृक्ष टिमच्या वतीने ५६० मोठ्या वृक्षांचे वृक्षारोपण



**लातूर/प्रतिनिधी**

शहराच्या पुर्वभागातील शिक्षक कॉलनी येथे स्थानिक रहिवाशी यांच्या मदतीने ग्रीन लातूर वृक्ष टिमने ५६० मोठ्या रोपांचे रोपण केले.कडुनिंब, तनिकरोजिया, सप्तपर्णी, बकुळ, गौरीचंदन, करंज अशा मोठ्या पर्यावरणपुरक रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. परिसरातील नागरीकांनी या झाडांचे संगोपन करु असा निर्धार घेतलेला आहे. गेल्या ५-६ दिवसापासून सुरु असलेले ५६० झाडांच्या वृक्षारोपण प्रकल्पाचा समारोप डॉक्टर्स डे निमित्ताने करण्यात आला. लातूर येथील प्रसिध्द श्र्वसनविकार तज्ञ डॉ. रमेश भराटे, क्षकिरण तज्ञ डॉ. अभय कदम, दंतरोग तज्ञ डॉ. संजीवनी कुलकर्णी, दंतरोग तज्ञ डॉ. गिरीष कुलकर्णी, जनरल फिजिशियन डॉ. विनोद कदम, सामाजिक कार्यकर्ते अविनाश बट्टेवार यांच्या हस्ते समारोपाची झाडे लावण्यात आली. यावेळी ग्रीन लातूर वृक्ष चे डॉ. पवन लड्डा, मनपा नगरसेवक इम्रानजी सय्यद, प्रमोद निपानीकर, मनमोहन डागा, नगरसेवक विजयकुमार साबदे, रुषिकेश दरेकर, जफर शेख, हितेश डागा, चैतन्य प्रयाग, सिताराम कंजे, सुलेखा कारेपुरकर, सार्थक शिंदे, रुषिकेश पोद्दार, शैलेश सुर्यवंशी, डॉ. मुश्ताक सय्यद, कल्पना फरकांडे, महेश गिल्डा, पुजा निचळे, स्वाती यादव, सौ. सिमा धर्माधिकारी, विकास कातपुरे, शिक्षक कॉलनी चे बालाजी शिंदे, लक्षमन केंद्रे, खंडू कलकते, जुकले सर, गवळी, कल्याणकर, सिरसाट, घटकर, शिंदगे, हटे ,भिगोले सर इत्यादी सर्वांनी वृक्ष लागवडीकरीता खड्डुए खोदणे, झाडे आणणे, काळी माती आणणे, झाडे लावणे, पाणी देणे याकरीता परिश्रम घेतले.

# बाळासाहेब स्मार्ट योजना देणार प्रयोगशील शेतकऱ्यांना बळ - कृषिमंत्री दादा भुसे



**वाडाः** आपल्या शेतात नवनवीन संशोधन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी हे सरकार भक्कम उभे असेल यासाठी मा. बाळासाहेब स्मार्ट योजना याद्वारे प्रयोगशील शेतकऱ्यांच्या हाताला सर्वतोपरी बळ दिले जाईल अशी घोषणा कृषी मंत्री व पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केली. कृषी संजीवनी सप्ताह निमित्त वाडा तालुक्यातील हमरापूर व सांगे येथील कार्यक्रमात ते बोलत होते. कृषी विद्यापीठ लॅब मध्ये संशोधन करतात मात्र अनेक शेतकरी स्वतः आपल्या शेतात राबून संशोधन करत आधुनिक शेती करतात. तालुक्यातील सांगे गावातील कृषीभूषण अनिल पाटील यांनी परिसरातील शेतकऱ्यांना मिळून गटाची स्थापना केली ज्या माध्यमातून त्यांनी प्लास्टिकच्या प्लेटवर भाताच्या वाणापासून रोपे तयार करीत ती यांत्रिकी पद्धतीने शेतात लावण्याचा प्रयोग केला आहे. यातून अतिशय कमी मेहनतीत भातशेती लागवड होऊन ...पान ६ वर

# सुर्याचे पाणी चंद्रपाडा जलकुंभात दाखल होऊनसुद्धा स्थानिकांचे पाण्यावाचून हाल



**वसई/प्रतिनिधी,** पाऊस वेळेवर दाखल होत नसल्याने पाझर तलावातील पाणीसाठा संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे चंद्रपाडा-वाकीपाडा गावांना होणारा पाणी पुरवठा दि.२३ जून २०२० पासून बंद करण्यात आलेला असून पाण्यावाचून नागरीकांचे हाल होत आहेत. चंद्रपाडा-वाकीपाडा गावांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (एमजेपी) ६९ गावांच्या पाणी योजनेत समावेश आहे. योजनेअंतर्गत चंडिका मंदिर पायथ्याजवळ, चंद्रपाडा येथे १ लाख १० हजार लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ बांधण्यात आलेला आहे. सदर जलकुंभाचे आमदार हितेंद्र ठाकूर शुभहस्ते उद्घाटन करण्यात आलेले होते. तसेच मुख्य पाईपलाईन अंथरणे कामाचा शुभारंभ तत्कालीन महापौर रूपेश जाधव यांच्याहस्ते एमजेपी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला होता. अविष्कार पाटील, पुष्पराज म्हात्रे यांच्यासह बविआ चंद्रपाडा वाकीपाडा टीममार्फत प्रत्यक्ष उभे राहून पाईपलाईन पुरवठा, अंथरणे व जुचंद्र रेल्वे क्रॉसिंगकामी विशेष मेहनत घेतलेली होती.

दि.१९ सप्टेंबर २०१९ रोजी जलकुंभामध्ये प्रत्यक्ष पाणी टाकीत दाखल होऊन चंद्रपाडा विभाग जळजोडणी शुभारंभ वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने लोकनेतेत्यांच्या शुभहस्ते करण्यात आलेला होता. परंतु ९ महिन्यांचा कालावधी उलटूनदेखील चंद्रपाडा ग्रामपंचायत प्रशासनामार्फत जलकुंभास पाणी वितरणासाठी आवश्यक पाईपलाईन जोडणी करण्यात आलेली नसल्याने पाणी उपलब्ध असूनही नागरीकांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे. वाढती लोकसंख्या व पाझरतलावाचा मर्यादीत पाणीसाठी लक्षात घेता ग्रामपंचायतीमार्फत पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक उपाययोजना न करण्यात आल्याने प्रशासनाविरूध्द ...पान ६ वर

# हिप्परसोगा येथे वृक्षारोपण



**औसा/प्रतिनिधी**

औसा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील हिप्परसोगा येथे वृक्षारोपण करण्यात आले. आपल्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व सामाजिक उपक्रम साजरे करावेत, असे आवाहन आ. पवार यांनी केले होते. त्या आवाहनास प्रतिसाद देत हिप्परसोगा येथे आंबा, चिकू, नारळ आदींची १०० झाडे लावण्यात आली. गावच्या सरपंच सविता कांबळे, ग्रामसेवक भुसे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष विठ्ठल सोमवंशी, हेमंत पाटील, अमोल सोमवंशी, सचिन पाटील, अतुल पाटील, अमर पाटील, मारुती चेवले, पोलीस पाटील बालाजी कांबळे, विठ्ठल संपते, सुहास पाटील, महादेव चिंचोले,तुकाराम सोमवंशी, समाधान कांबळे, यादवराव पाटील, शंकरराव आळंदकर, संभाजी यादव, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मदन सोमवंशी, जगदीश यादव, विनायक चेवले, अंगद गोरे, गोविंद सीतापुरे, सुनीता यादव, लतिका पाटील, सरिता चिंचोले, रुक्मिणबाई आळंदकर, सुरेखा सोमवंशी, तेजस्विनी पाटील आदींची यावेळी उपस्थिती होती. लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# श्री हरिहर गाथा या ग्रंथाचे प्रकाशन संपन्न



**औसा/प्रतिनिधी**

आषाढ शुद्ध एकादशीच्या पर्वकाळावर सद्गुरू श्री हरिहर महाराज यांच्या श्री हरिहर गाथा या ग्रंथाचे प्रकाशन परपूज्य गुरुवर्य गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या शुभ हस्ते नाथ संस्थान औसा येथे करण्यात आले.यावेळी औसेकर महाराज यांनी संत हरिहर बाबा महान योगी होते त्याच्या विषयी आपणाला कायम आदर राहिला आहे,त्यांच्या गाथे च्या ग्रंथाचे प्रकाशन आपल्या हस्ते होत आहे हे माझ्यासाठी भाग्य आहे अशी मनोकामना त्यांनी या वेळी व्यक्त केली. औसा येथील विरनाथ महाराज यांची गादी व हरिहर महाराज यांची गादी आम्ही एकच मानतो. आपण सर्वांनी संतानी दिलेली शिकवण जपली पाहिजे असे गुरूवर्य गुरूबाबा महाराज औसेकर यावेळी म्हणाले.यावेळी महाराजांनी ग्रंथ प्रकाशना निमित्त लेखक विजयराव चव्हाण यांना आशिर्वाद दिले. या छोटेखानी प्रकाशन सोहळ्याचे सुत्र सचंलन शाम कुलकर्णी यांनी केले. यावेळी बळीराम पानढवळे, दशरथ भगवंतराव जाधव, अविनाश शंकरराव चव्हाण, ज्ञानेश्वर हिंगें, दत्ता पवार, अनंत पाटील, हरीश विजयराव चव्हाण, दिपक पानढवळे यांची उपस्थिती होती. आपण आपल्या जीवन कार्यात सतत सत्य आणि संतांच्या कार्याचे अवलोकन करून चालण्याचा प्रयत्न केला. संत हरिदास यांचा मी उपासक त्यांच्या अभंगाने मला कायम प्रभावित केले त्याचे वारंवार अवलोकन केल्यामुळेच आपल्या हातून हे सत्कार्य घडले असून आज आषाढी निमित्त गुरुवर्य श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या आशीर्वचनाने याचे प्रकाशन होत आहे. हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण असल्याची भावना विजय चव्हाण यांनी या प्रकाशनानिमित्त व्यक्त केली आहे.